* नागपूर *
* वर्ष ५४ * अंक २३८ *
गुरुवार, दिनांक ५ डिसेंबर २०२४
किंमत रु. २/- + वितरण खर्च रु. १/-
एकूण किंमत रु. ३/-
पुरवणीसह पाने ८

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com





# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागर किनारी सिगल पक्ष्यांचे आगमन

**सावंतवाडी, दि. ४ : प्रतिनिधी**

मालवणसह सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सिगल पक्ष्यांचे आगमन झाले आहे. हजारो किलोमीटरचा प्रवास करून दाखल झालेल्या या परदेशी पाहुण्यांमुळे मालवण दांडी, देवबाग, भोगवे आदी समुद्रकिनारे गजबजून गेले आहेत.

थंडीचा हंगाम सुरु झाल्यावर युरोपमधून हजारो किलोमीटरचा प्रवास करत सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या समुद्र किनारपट्टीवर दाखल होतात. सध्या हे पक्षी मालवणसह दांडी, वायरी, देवबाग, भोगवे आदी किनाऱ्यांवर मोठ्या संख्येने दिसून येत आहेत. हे पक्षी निर्जन समुद्र किनाऱ्यांना पसंती देतात. समुद्र किनाऱ्यावर मिळणारे मासे, किडे, शिंपल्यातील जीव हे या पक्ष्यांचे अन्न आहे. हे पक्षी थव्याने उडत राहून किनारा बदलत राहतात किंवा पाण्यात बसून राहतात. किनाऱ्यावरील या पक्ष्यांच्या वावरामुळे विलोभनीय दृश्य निर्माण होत आहे.

जिल्ह्यातील समुद्रकिनारे हे सीगल पक्ष्यांनी गजबजून गेले असून या सिगल पक्ष्यांचा मुक्काम हा दोन ते तीन महिने राहणार आहे. सध्या सिंधुदुर्गात पर्यटकांची रेलचेल वाढली असतानाच सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर सिगल पक्ष्यांचे थवे उडताना दिसू लागल्याने या दृश्याचा पर्यटक आंनद लुटत असतानाच थव्यांचे छायाचित्र आपल्या कॅमेऱ्यात टिपत आहेत. तर सिगल पक्ष्यांचे आगमन हे पक्षी प्रेमी व अभ्यासकांसाठी देखील एक पर्वणी ठरली आहे.


# न्यायालयात हजर राहण्यासाठी राहुल गांधी यांना मुदतवाढ

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य

**पुणे, दि. ४ : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी न्यायालयाने १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. गांधी हे लोकसभेच्या अधिवेशनात आहेत. त्यामुळे त्यांना न्यायालयात गैरहजर राहण्याची परवानगी मिळून व्यक्तीशः उपस्थित राहण्यास मुदतवाढ मिळावी, असा अर्ज न्यायालयात गांधी यांच्या वकिलांनी केला होता. त्यानुसार प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांनी याबाबतचे आदेश दिले.

गांधी यांना न्यायालयात हजर होण्याबाबत बजावलेले समन्स त्यांच्या घरी पोहोचले होते. यापूर्वी पाठवलेले समन्स तीस हजारी जिल्हा न्यायालयाऐवजी पतियाळा हाऊस न्यायालयात पोहोचल्याने ते पुन्हा पुण्याच्या विशेष न्यायालयात परत आले होते. त्यामुळे गांधी यांना विशेष न्यायालयाकडून पुन्हा समन्स बजावण्यात आले होते. गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद पवार यांनी गेल्या तारखेस अर्ज दाखल केला होता. गांधी हे विद्यमान खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते आहेत. देशातील विविध निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दौऱ्यावर होते. न्यायालयाचे समन्स त्यांना मिळाले आहे. गांधी दौऱ्यामध्ये व्यस्त असल्याने न्यायालयात हजर राहू शकत नाहीत, असे ॲड पवार यांनी दाखल केलेल्या अर्जात नमूद केले होते.



या अर्जावर सुनावणी झाल्यानंतर सोमवारी (२ डिसेंबर) गांधी यांनी न्यायालयात हजर रहावे, असे आदेश देण्यात आले होते. दरम्यान, गांधी सोमवारी न्यायालयात हजर झाले नाही म्हणून त्यांच्या विरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट काढावे, तसेच ते समन्स मिळाल्यानंतरही हजर झाल्याने त्यांना भारतीय दंड संहितेतील कलम १७४ तरतुदीनुसार त्यांना शिक्षा व्हावी, असा अर्ज स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी यांचे वकील ॲड. संग्राम कोल्हटकर यांनी न्यायालयात केला आहे. राहुल गांधी हे विद्यमान खासदार व लोकसभेचे विरोधीपक्ष नेते आहेत. सध्या हिवाळी अधिवेशन चालू आहे. अनेक महत्त्वपूर्ण विधेयके संसदेत चर्चेसाठी येणार आहेत. गांधी हे एका महत्त्वाच्या पदावर असल्याने त्यांना लोकसभेच्या अधिवेशनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे गांधी यांना न्यायालयात गैरहजर राहण्याची परवानगी मिळून न्यायालयात उपस्थित राहण्यास मुदतवाढ मिळावी, असा अर्ज न्यायालयात करण्यात आला होता. न्यायालायाने मुदतवाढ दिली आहे, असे राहुल गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद पवार यांनी सांगितले.

**दाव्याचा निकाल लागेपर्यंत अवमानकारक वक्तव्य करु नये**

गांधी यांनी एका भाषणात पुन्हा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केले, असे ॲड. कोल्हाटकर यांनी न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले. जोपर्यंत या दाव्याचा निकाल लागत नाही तोपर्यंत गांधी यांनी अवमानकारक वक्तव्य, तसेच वादग्रसत विधान करू नये, असे त्यांना सांगावे, असे न्यायालयाने गांधी याचे वकील ॲड. पवार यांना सूचित केले. ॲड. पवार यांनी दाखल केलेला अर्ज मान्य करत न्यायालयाने मुदतवाढ दिली. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जानेवारी २०२५ रोजी होणार आहे.

# ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डाच्या बुद्धीबळ स्पर्धेत महापारेषणने पटकाविले कांस्यपदक

**मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी**

बडोदा (गुजरात) येथे ४६ व्या ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डातर्फे घेण्यात आलेल्या बुध्दीबळ व बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) महिला बुध्दीबळ संघाने कांस्यपदक मिळविले. या यशाबद्दल महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी महिला संघाचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला.



यामध्ये ४०० के. व्ही. लोणीकंद-२ पुणे येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता मनिषा देसाई, सांघिक कार्यालय, मुंबईच्या सहायक अभियंता श्रध्दा वर्डीकर, अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, पुणे येथील विदुला देवकते, २२० के. व्ही. शेंद्रा उपकेंद्र, छत्रपती संभाजीनगर येथील सहायक अभियंता हर्षदा जाधव, नागपूर येथील ममता भोयर यांनी महिला बुध्दीबळ स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले.

महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले,`` महापारेषण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी नेहमीच स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपले `टीम स्पिरीट` दाखवितात. विशेषतः महिला अधिकाऱ्यांनी केलेली ही कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. घर, कार्यालय सांभाळून त्यांनी मिळविलेले हे यश अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. भविष्यातही दैनंदिन कामकाज सांभाळून महिलांनी मोठे यश प्राप्त करावे.``

प्रारंभी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर सर्व महिला अधिकाऱ्यांचा सत्कार महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी करून त्यांना भेटवस्तू दिली. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर, रेणुका नाटके उपस्थित होते. पुण्याचे अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संदीप हाके, प्रशिक्षक श्री. किशोर चौधरी यांचे महिलांना विशेष मार्गदर्शन लाभले.

# भिवंडीत 60 हरविलेल्या मुलांपैकी 18 मुले सापडली, इतरांचा शोध सुरु

**भिवंडी, दि. ४ : प्रतिनिधी**

ठाणे परिमंडळ - २ असलेल्या भिवंडी पोलीस उपायुक्तांच्या कार्यक्षेत्रात एकूण सहा पोलीस ठाणे असून या सहा पोलीस ठाण्यांतर्गत गेल्या ११ महिन्यात एकूण ६० अल्पवयीन मुले हरविली असून त्यापैकी १८ मुले तपासाअंती मिळून आल्याची माहिती पोलीस उपायुक्त डॉ. मोहन दहीकर यांनी दिली.भिवंडीत विधानसभा निवडणुकीच्या काळात शहरातील शांतीनगर भागात एका शेजाऱ्याने खेळणाऱ्या मुलास उचलून मुंबईतील दोघांना विकल्याची घटना घडल्याने शहरातील हरविलेल्या लहान मुलांची माहिती समोर आली.शांतीनगर रामनगर भागात राहणारा साडेतीन वर्षांचा मोहम्मद अन्सारी हा (१८ नोव्हेंबर रोजी) रस्त्यावर खेळत असताना बेपत्ता झाला होता. कुटुंबीयांनी बराच शोध घेतला, मात्र तो सापडला नाही. याबाबत कुटुंबियांनी शांतीनगर पोलिस ठाण्यात मुलाच्या अपहरणाचा गुन्हा दाखल केला.या मुलाच्या शोधासाठी पोलिसांची दोन पथके तैनात करण्यात आले होते. दरम्यान,पोलिसांना एक सीसीटीव्ही फुटेज सापडला ज्यामध्ये मुलाच्या शेजारी राहणारा मोहम्मद युनूस शाह त्याला हॉटेलमध्ये घेऊन जात आहे,असे दिसून आले. तेव्हा पोलिसांनी त्या शेजाऱ्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. तेंव्हा अपहरण केलेल्या मुलाचे मुंबईहून आलेल्या दोघांना ६० हजार रुपयांना विकल्याचे आरोपीने सांगितले.आरोपीच्या माहितीवरून शांतीनगर पोलिसांनी मूल विकत घेणाऱ्या दोघांसह एकूण तीन आरोपींना अटक केली आहे.भिवंडीत मोठ्या संख्येने कामगार वर्ग राहत असून घरातील पुरुष तर कधी दांपत्य मजुरी अथवा नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर जाताना घरातील भावंडांच्या हाती लहान मुले सोपवून लोक कामधंद्याच्या निमित्ताने जातात. हे निमित्त साधून चोरी करणारे अथवा नशा करणारे चोर मुलांना फसवून नेतात. तर काही रस्ता चुकून हरवून जातात. गेल्या ११ महिन्यात शहर व परिसरातील १६ वर्षाखालील ६० मुले हरविली असून त्यापैकी १८ मुले पोलिसांना तपासाअंती मिळाले आहेत.तर ४२ हरविलेल्या मुलांचा शोध पोलीस घेत आहेत.

# सरत्या वर्षात अवकाशात फिरत्या चांदणीची पर्वणी

**अकोला, दि. ४ : प्रतिनिधी**

आकाशातील विविध घटना, घडामोडी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत असतात. मानव निर्मित महाकाय आकाराचे 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' अर्थात अंतराळ अभ्यास व संशोधन केंद्र सलग तीन दिवस लक्ष वेधून घेणार आहे. हे केंद्र ज्या भागातून जाते, त्याठिकाणी ते पाहता येते. येत्या ४, ५ आणि ७ डिसेंबरला महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी या केंद्राचे दर्शन अवकाशात घडणार आहे. एक तेजस्वी चांदणी आकाशात सरकताना दिसेल, हे अनोखे आकाश दृश्य अवकाश प्रेमींनी अवश्य अनुभवावे, असे आवाहन विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी केले.

१६ प्रगत देशांच्या संयुक्त विद्यमाने अंतराळ अभ्यास व संशोधन केंद्राचा भव्यदिव्य प्रकल्प मानवी कल्याणार्थ व नव संशोधनार्थ शून्य गुरुत्वाकर्षणात कार्यरत आहे. हे केंद्र दिवसाला १५ पृथ्वी प्रदक्षिणा घालते. दर सेकंदाला सुमारे साडेसात कि.मी.वेगाने हे केंद्र पुढे सरकते. सध्या स्थितीत दहा वैज्ञानिक या केंद्रात असून पृथ्वीपासून सुमारे चारशे कि.मी दूर हे केंद्र कार्यरत आहे. अंतराळ संशोधन केंद्राचा आकार हा फुटबॉल मैदाना पेक्षाही खूप मोठा आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी या केंद्राचे दर्शन होणार आहे. ४ डिसेंबरला रात्री ७.१६ ते ७.२० या वेळेत वायव्य ते दक्षिण पश्चिमेस सुमारे ४७° उंचीवरुन हे केंद्र जाईल. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.२८ ते ६.३४ या वेळेत वायव्येकडून आग्नेयेकडे सुमारे ६९° उंचीवरुन पाहता येणार आहे. ७ डिसेंबरला सायंकाळी ६.२७ ते ६.३३ या वेळेत क्षितिजापासून २४° वरुन पश्चिम-उत्तरकडून शूक्र ग्रहा जवळून दक्षिणेकडे जाताना दिसणार आहे.

महाराष्ट्रातील बहुतेक ठिकाणी या अनोख्या आकाश नजाऱ्याचा आनंद घेता येईल. मात्र, स्थानपरत्वे मुंबई ते नागपूरकडे जाताना वेळेत किंचित वाढ तर उंची, दिशा, तेजस्वीतेत काही बदल होताना दिसणार आहे, अशी माहिती प्रभाकर दोड यांनी दिली.

**⏭ फिरत्या चांदणीसोबतच ग्रह दर्शनाचा अलौकिक योग**

अवकाशात फिरत्या चांदणीची पर्वणीसोबतच ग्रह दर्शन देखील घडणार आहे. पश्चिम आकाशात तेजस्वी शुक्र, दक्षिण आकाश मध्याशी वलयांकित शनी ग्रह आणि सध्या स्थितीत पृथ्वीच्या जवळ येत असलेला गुरु ग्रह पूर्व क्षितिजावर दिमाखात दर्शनास सज्ज आहे. अवकाशातील अलौकिक नजाऱ्याचा आनंद घेण्याचे आवाहन प्रभाकर दोड यांनी केले.

# भिवंडीत विविध मागण्यांसाठी बांधकाम कामगार संघटनेचा कामगार कार्यालयासमोर मोर्चा

**भिवंडी, दि. ४ : प्रतिनिधी**

राज्य सरकारने बांधकाम कामगारांच्या लाभा विरोधी घेतलेला सरकारी निर्णय त्वरित रद्द करण्यासह बांधकाम कामगारांची ऑनलाईन वेबसाईट व बंद असलेली पोर्टल सेवा सुरू करून विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशन आयटक संघटनेच्या वतीने कार्याध्यक्ष कॉ.विजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो बांधकाम कामगारांच्या उपस्थितीत भिवंडी शहरातील वेताळ पाडा येथील बांधकाम कार्यालयासमोर सोमवारी मोर्चा काढण्यात आला. शासनाने बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापित केले



असतानाही ऑनलाईन सेवा बंद केल्याने कामगारांच्या वतीने रोष व्यक्त करण्यात आला.तत्पूर्वी कामगारांना ऑनलाईन कुठूनही त्यांचा फॉर्म भरत येत होता.परंतु सद्यस्थितीत कामगारांना फॉर्म भरण्यासाठी कामगार कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असून राज्य सरकारने बांधकाम कामगारांसाठी असलेली ऑनलाईन वेबसाईट आणि लाभाच्या सोयीची पोर्टल सेवा बंद ठेवली आहे.त्यामुळे लाभार्थी बांधकाम कामगारांना सुविधांपासून वंचित रहावे लागत असून कामगारांची हेळसांड होत असल्याची प्रतिक्रिया कॉ.कांबळे यांनी यावेळी दिली आहे.त्यातच शासनाने मागील कॅबिनेटमध्ये कामगारांसाठी मंजूर केलेला पाच हजार रुपये दिवाळी बोनस कामगारांना तात्काळ वितरित करावा, ज्येष्ठ कामगारांना पेन्शन लागू करावे,बंद असलेली वेबसाइट - पोर्टल सेवा सुरू करावी या व अशा अनेक मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार फेडरेशन हायटेक यांच्या वतीने भिवंडी शहरातील वेताळ पाडा येथील बांधकाम कार्यालयासमोर मोर्चा काढण्यात येवून कामगारांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या ११ डिसेंबर रोजी मुंबई येथील कामगार सेक्रेटरी ऑफिसच्या बाहेर हजारो कामगारांच्या उपस्थितीत भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहितीही कॉ.विजय कांबळे यांनी शेवटी दिली आहे.तर भिवंडी पूर्वचे विद्यमान आमदार रईस शेख यांनी बांधकाम कामगारांचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्याचे आश्वासन यावेळी उपस्थित कामगारांना दिले आहे.

# टीएमटीची विना तिकीट प्रवास करणाऱ्यांवर कारवाई

## गेल्या अकरा महिन्यात 6 हजाराहून अधिक प्रवाशांवर कारवाई

**ठाणे, दि.४ : प्रतिनिधी**

ठाणे महापालिका परिवहन (टीएमटी) विभागाने विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या अकरा महिन्यांत ६ हजार ९७५ प्रवाशांवर कारवाई करून त्यांच्याकडून १२ लाख १४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. ठाणे परिवहन विभागाकडून विना तिकीट प्रवास करणाऱ्यांवर वारंवार कारवाई केली जात असल्याची माहिती ठाणे परिवहन विभागाकडून देण्यात आली.

ठाणे शहरातील विविध मार्गासह मुलुंड, बोरिवली, मिरा-भाईंदर अशा काही शहरांमध्ये ठाणे परिवहन विभागाच्या टीएमटी बस गाड्या धावतात. या बसगाड्यांमधून दिवसाला हजारोच्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. प्रत्येक मार्गाच्या अंतरानुसार तिकीट दर ठरलेले असतात. बसमधील वाहक प्रवाशांकडून भाडेदर आकारुन तिकीट देतात. परंतू, अनेकदा बसमध्ये गर्दी असल्यामुळे काही प्रवासी लबाडीने वाहकाची नजर चूकवून तिकीट काढत नाहीत. गेल्या वर्षभरात विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्याचे दिसत आहे. अशा प्रवाशांवर लक्ष ठेवण्यासाठी शहरातील विविध बस थांब्यावर तिकीट तपासणी करणारे अधिकारी उभे असलेले दिसतात. तर, अनेकदा तिकीट तपासणी करणारे अधिकारी बस मध्ये देखील चढतात. यांच्याकडून प्रवाशांच्या तिकीटांची तपासणी केली जाते. या तपासणी दरम्यान एखादा प्रवासी विना तिकीट आढळून आल्यास त्यावर ताटकाळ दंडात्मक कारवाई केली जाते. त्या प्रवाशाकडून प्रवासी भाडेदरासह २०० रुपये दंड आकारण्यात येतो. गेल्या अकरा महिन्यात विना तिकीट प्रवास करणाऱ्या ६ हजार ९७५ प्रवाशांवर ठाणे परिवहन विभागामार्फत कारवाई करण्यात आली असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. या प्रवाशांकडून ६८ हजार ५८४ रुपये भाडेदर वसूली करण्यात आली आहे. तर, १२ लाख १४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असल्याचे ठाणे परिवहन विभागाकडून आलेल्या अहवालातून समोर आले आहे.

# शेवगा 600 रुपये किलोवर

## दक्षिणेतील पावसामुळे दराचा उच्चांक

**पुणे, दि. ४ : प्रतिनिधी**

दक्षिणेकडील राज्यात झालेल्या पावसाचा शेवग्याच्या लागवडीला फटका बसला असून, बाजारात आवक कमी झाली आहे. मागणीच्या तुलनेत आवक घटल्याने किरकोळ बाजारात एक किलो शेवग्याला प्रतवारीनुसार ५०० ते ६०० रुपये किलो भाव मिळत आहे.

मुंबई, ठाणे, पुण्यासह अन्य शहरांतील बाजारात शेवग्याच्या दराने उच्चांक गाठला आहे. शेवग्याची सर्वाधिक लागवड तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशात होते. एरवी भाव १०० ते १२० रुपये किलोंच्या आसपास असणाऱ्या शेवग्याला दक्षिणेकडील परतीच्या पावसाचा फटका बसला असून घाऊक बाजारात १० किलोचा दर ३५०० ते ४००० रुपयांपर्यंत गेला आहे. नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्येही शेवग्याची आवक घटली आहे. डिसेंबरअखेरीस आवक वाढल्यानंतर दरात घट होईल, असे व्यापारी रामदास काटकर यांनी सांगितले.

**'भाव' खाणाऱ्या शेंगांकडे ग्राहकांची पाठ**

शेवगा उष्ण असल्याने थंडीत मागणी वाढते, अशी माहिती किरकोळ बाजारातील भाजीपाला व्यापारी प्रकाश ढमढेरे यांनी दिली. मात्र किरकोळ बाजारात पावशेर शेवग्याचा दर १२० ते १५० रुपये असल्याने ग्राहकांनी पाठ फिरविल्यामुळे मागणीही घटल्याचे काही व्यापारी सांगत आहेत.

# डोंबिवलीत गरीबाचा पाडा येथे सिमेंट काँक्रीट रस्ता रुंदीकरणातील व्यापारी गाळे जमीनदोस्त

**डोंबिवली, दि. ४ : प्रतिनिधी**

येथील पश्चिमेतील महात्मा फुले रस्त्यावरील गरीबाचापाडा येथील श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोलनगरी प्रस्तावित सिमेंट काँक्रीटच्या १५ मीटर रस्त्याला बाधित होणारे २५ व्यापारी गाळे कल्याण डोंबिवली पालिकेच्या ह प्रभागाच्या तोडकाम पथकाने साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी तोडून टाकले.

या रस्त्यावरील गाळे तोडून टाकल्याने सिमेंट काँक्रीटचा रस्ता प्रशस्त होण्यास साहाय्य होणार आहे. गरीबाचापाडा येथील श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोलनगरी रस्ता पालिकेच्या टिटवाळा येथून येणाऱ्या वळण रस्त्याचा पोहच रस्ता आहे. आताचा श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोल नगरी रस्ता दोन्ही बाजुच्या अतिक्रमणांमुळे २५ ते ३० फूट रूंदीचा आहे. या रस्त्यावर अवजड वाहन आले की नेहमीच या रस्त्यावर वाहन कोंडी होते. गेल्या तीन महिन्यापूर्वी एमएमआरडीएच्या ठेकेदाराने पालिकेकडून अतिक्रमणे काढून मिळाली नाहीत म्हणून आहे त्या रस्त्यावर खोदकाम करून सीमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सुरू केले होते.

आताच्या ३० फुटाच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण केले तर येणाऱ्या काळात हा रस्ता वाहतूक कोंडीत अडकेल. श्रीधर म्हात्रे चौक ते अनमोल नगरी रस्त्याचे रुंदीकरण झालेच पाहिजे, अशी ठाम भूमिका घेत सामाजिक कार्यकर्ते बाळा म्हात्रे, ॲड. गणेश पाटील, मनोज वैद्य, अनमोल म्हात्रे, संजय म्हात्रे यांनी घेतली. ॲड. गणेश पाटील यांनी रूंदीकरण न करता या रस्त्याचे काँक्रिटीकरण केले तर या रस्ते कामाला उच्च न्यायालयात आव्हान देण्याची भूमिका घेतली.

नागरिकांचा होणारा विरोध लक्षात घेऊन ठेकेदाराने श्रीधर म्हात्रे चौकातील काँक्रिटीकरणासाठी खोदलेला रस्ता बुजवून टाकला. जोपर्यंत पालिका या रस्त्यावरील अतिक्रमणे काढत नाही, तोपर्यंत या रस्त्याचे काँक्रिटीकरण न करण्याचा निर्णय घेतला. पालिका शहर अभियंता अनिता परदेशी, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे यांनी या रस्त्याचे रूंदीकरण करूनच काँक्रिटीकरण केले जाईल, असे आश्वासन रहिवाशांना दिले.

फ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी या काँक्रीट रस्ते कामात अडथळा येणाऱ्या २५ गाळेधारकांना दोन महिन्यापूर्वी नोटिसा देऊन आपली अतिक्रमणे स्वताहून काढून घेण्याचे सूचित केले होते. सोमवारी साहाय्यक आयुक्त सावंत यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या आदेशावरून श्रीधर म्हात्रे चौक भागातील २५ व्यापारी गाळे जेसीबी, तोडकाम पथकाच्या साहाय्याने तोडून टाकले. या कारवाईच्यावेळी विष्णुनगर पोलिसांचा बंदोबस्त होता.

# मेजर विनित परेरा यांचा सन्मान

**वसई, दि. ४ : प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलात कार्यरत असलेले वसई येथील नंदाखाल (खिवणी) गावातील मेजर विनीत जॉन परेरा ह्याना भारताच्या स्वातंत्र्य अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या पार्श्वभूमीवर 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी राजपथ, दिल्ली येथे



झालेल्या परेडच्या वेळेला राष्ट्रपती, पंतप्रधान,तिन्ही संरक्षण दलाचे प्रमुख यांच्या उपस्थितीत आकाशात 75 विमाने कसरत करण्यासाठी सोडलेली होती. देशाच्या वेगवेगळ्या एअरपोर्टवरून ही विमाने आली होती. त्यांचे योग्य ते सिम्नलिंग करून भव्य असा परेडचा कार्यक्रम यशस्वी केला गेला. ह्याचे सपूर्ण आयोजन- नियोजन व जबाबदारी मेजर विनीत परेरा यांनी पार पाडली. अशी जबाबदारी सैन्यदलात मोठ्या मानाची समजली जाते. सद्या त्यांची पोस्टिंग काश्मीर खडतर अश्या कुपवाडा जिल्ह्यात हांडवाडा या ठिकाणी आहे जेथून जवळच पीओके बॉर्डर आहे. त्यांच्या ह्या कामगिरीबद्दल वसई ख्रिस्ती मराठी साहित्य संमेलनात त्यांचा मानसन्मान करण्यात आला. त्यांच्या आईवडील जॉन व वेरोणिका परेरा ह्यानी सदर सत्कार त्यांच्यावतीने स्वीकारला.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २३८ * * नागपूर * | गुरुवार, दि. ०५ डिसेंबर २०२४ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## सुखबीर बादल यांच्यावर गोळीबार

■ **वृत्तसंस्था, अमृतसर, दि. ४ :**
पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर बुधवारी सुवर्ण मंदिराबाहेर गोळीबार करण्यात आला. मात्र, ते थोडक्यात बचावले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी आरोपीला पकडले. त्याच्याकडून एक पिस्तूलही जप्त करण्यात आले आहे.

गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचे नाव नारायण सिंह चौडा असे असून तो गुरुदासपूर येथील डेराबाबा नानकचा रहिवासी आहे. तो दल खालसाचा सदस्य आहे. अकाल तख्त येथे शिक्षा भोगण्यासाठी बादल सकाळीच पोहोचले होते. ते क्लॉक टॉवरच्या बाहेर एक भाला धरून बसले होते. त्यानंतर त्यांच्यावर हल्ला करण्यात आला.

## महायुतीचा राज्यपालांकडे सत्ता स्थापनेचा दावा

# शपथविधी आजच !

■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :**
नव्या सरकारच्या शपथविधीसाठी वेळ लागत असल्यानं नव्या मंत्रिमंडळाबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर गुरूवारी मुंबईतल्या आझाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी सोहळा होणार आहे.

आज भाजपकडून विधीमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी सवार्नुमते देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली. १३२ जागा जिंकून भाजप हा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरल्यामुळे मुख्यमंत्री देखील भाजपचाच होणार हे जवळपास निश्चित झालं आहे. भाजप विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याने तेच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

महायुतीमधील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची एक महत्त्वाची बैठक वर्षावर पार पडली. या बैठकीनंतर राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा करण्यात आला आहे.




### फडणवीस घेणार मुख्यमंत्री पदाची शपथ

महायुती सरकारचा शपधविधी ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबईतील आझाद मैदानावर पार पडणार आहे. देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. या शपथविधी सोहळ्याची निमंत्रण पत्रिका समोर आली आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ११ दिवसांनी महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा झाली. भाजपच्या विधीमंडळ पक्षाचा नेता निवडीसाठी भाजपचे केंद्रीय



निरीक्षक विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विधीमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

या बैठकीत चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. तर पंकजा मुंडे, प्रवीण दरेकर आणि रवींद्र चव्हाण, संजय कुटे यांनी अनुमोदन दिले. मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीसांच्या नावाची घोषणा झाली.

संख्याबळासाठी आमदारांच्या सह्यांचे पत्र राज्यापालांना देण्यात आले आहे.

नव्या सरकारचा शपथविधी गुरूवारी आझाद मैदानावर होणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह केंद्रातील अनेक मंत्री उपस्थित राहणार आहेत. या शपथविधी सोहळ्यासाठी तब्बल २२ राज्यातील मुख्यमंत्री हजेरी लावणार आहेत. शपथविधी सोहळ्यासाठी तब्बल चाळीस हजार लोकांची उपस्थिती राहणार आहे.

दरम्यान महायुतीच्या नव्या सरकारामध्ये एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असा जुनाच पॅटर्न कायम राहणार आहेत. उद्या देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासोबत दोन उपमुख्यमंत्री देखील शपथ घेणार आहेत. दुसरीकडे, या सोहळ्यात महायुतीमधील तिन्ही घटक पक्षांचे काही आमदार शपथ घेणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी, त्याबाबत निश्चित अशी कोणतीच माहिती अद्यापपर्यंत हाती आली नाही.

## अडीच वर्षांपूर्वी माझ्यासाठी फडणवीसांची शिफारस

### एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया



■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :**
महायुतीच्या नेत्यांनी आज राज्यपालांकडे सत्ता स्थापनेसाठी दावा केला आहे. महायुतीकडून देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या सत्ता स्थापनेच्या दाव्यानंतर पत्रकार परिषदेत महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंद केले आहे तसेच पाठिंबा दर्शवला आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, डबल इंजिनचे सरकार आम्ही अडीच वर्ष चालवले आणि जनतेने आम्हाला पाठिंबा दिला. या निवडणुकीत सगळ्या एजन्सीचे अंदाज आम्ही बाद ठरवले. अडीच वर्ष आम्हाला देवेंद्र फडणवीस यांच्या अनुभवाचा फायदा झाला तसेच आता ते मुख्यमंत्री होणार आहेत त्याला आमचा पाठिंबा आहे. आम्ही फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत म्हणून शिफारस केली. देवेंद्र फडणवीस यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

महायुतीमध्ये अगदी खेळीमेळीचे वातावरण आहे. प्रचंड बहुमताने महायुतीने विजय मिळवला आहे. लाडकी बहीण आणि सर्वसामान्य जनतेने यांच्यावर प्रचंड मतांचा वर्षाव केला. राज्य चालवताना अनेक निर्णय आम्ही घेतले, जे विकासकामे महाविकास आघाडीने थांबवले होते, आमचे सरकार आल्यावर आम्ही ते मार्गी लावले. सरकार सर्वसामान्यांसाठी असते आणि आम्ही ते तंतोतंत पालन करण्याचे आम्ही अडीच वर्ष प्रयत्न केले. सरकारच्या माध्यमातून एक आधार म्हणून आम्ही भूमिका पार पाडली, असे शिंदे म्हणाले.

## अग्राग्रलेख
### खरीखरी..

## मी येणार, मी आलो !

२०१४ सालामध्ये मुख्यमंत्रीपदी तरुण तडफदार हजरजबाबी आणि धडाकेबाज नेते म्हणून देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर आरुढ झालेले होते. त्यानंतर 2019 च्या निवडणुकीत आपण 'पुन्हा येणार' अशी जबरदस्त घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. ते दुस?यांदा आले आणि त्यानंतर काही तासातच त्यांना राजीनामा द्यावा लागला. तेव्हा त्या परिस्थितीत काय झाले, याचे चर्वीतचर्वण करण्यापेक्षा आज पुन्हा तिसऱ्यांदा देवेंद्र फडणवीस त्याच मुख्यमंत्री पदावर आरुढ झालेले आहेत. देवेंद्र फडणवीस हेच आता पुढील पाच वर्षासाठी मुख्यमंत्री आहेत, हेही ठरलेले आहे. भारतीय जनता पक्षाचे मित्रपक्ष म्हणजेच शिंदे यांची शिवसेना आणि अजित दादांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांना सोडल्यास एकट्या भाजपाजवळ आज १३७ आमदारांची फौज आहे. म्हणजे जवळजवळ स्वबळावरच भाजपचे राज्य आलेले आहे. पण सोबत असलेल्या दोन पक्षांना नक्कीच सरकारमध्ये सामील केले जाईल. यात शंकाच नाही. कोणत्याही परिस्थितीत या तीन पक्षांची युती छोट्या-मोठ्या कारणासाठी तुटेल. याची जराही शक्यता नाही आणि शंका घेण्याचे कारणही नाही. याच मुख्यमंत्रीपदावर असताना आपल्या पहिल्या कार्यकाळात अनेक अभिनव कल्पना देवेंद्रजींनी राबवल्या. त्या योजनांचा डंका आजही भारतभर आहे. महाराष्ट्राचे गतिमान नेतृत्व म्हणून ते पहिल्यांदा जेव्हा मुख्यमंत्री पदावर आरूढ झाले. तेव्हापासून प्रत्येक विषयाची आकडेवारी सादर करण्यात त्यांचा हातखंडा होता. आताही राज्यातील प्रत्येक विषयांचा त्यांचा अभ्यास सर्वांनाच ठाऊक आहे. १९६० सालात झालेल्या महाराष्ट्राच्या राज्याच्या निर्मितीनंतर कोणत्याही सरकारला आजच्यासारखे प्रचंड बहुमत मिळाले नव्हते. १९६० सालामध्ये संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन यशस्वी झाल्यावर विरोधी पक्षातही अनेक दिग्गज नेते विधानसभेत होते. त्यामुळे तेव्हाची विधानसभा अनेक महत्त्वाच्या विषयांवर अत्यंत गंभीरपणे चर्चा करून निर्णय घेत होती. पुढील काही वर्षे काँग्रेसचे सरकार होते. त्यानंतर संयुक्त सरकारांचा जमाना आला. १९७७ सालात पहिल्यांदा दोन काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ अस्तित्वात आले होते. ते फार काळ टिकले नाही. पश्चिम महाराष्ट्राचे वसंतदादा त्यावेळी मुख्यमंत्री होते आणि तत्कालीन त्याच ठिकाणचे मंत्री असलेल्या शरद पवार यांनी त्या काळात अनेक पक्षांची आघाडी करून पुरोगामी लोकशाही दल अस्तित्वात आणले होते. त्यानंतर महाराष्ट्रात कोणत्याही एका पक्षाचे सरकार कधीच अस्तित्वात आलेले नाही. आता तर सध्याच्या विरोधी पक्षांचे सरकार भविष्य काळात येईल की नाही? याचीही जरा शंकाच वाटते. भारतीय जनता पक्षाजवळ जी यंत्रणा आहे, शिस्त आहे. तसेच बारकाईने अभ्यास करणारे नेतृत्व आहे. तशी परिस्थिती काँग्रेसमध्ये नाही. काँग्रेसमध्ये वरपासून खालपर्यंत प्रत्येकजण ज्याला जे वाटेल, तसा वागण्यास समर्थ असतो. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला आता महाराष्ट्रात क्रमांक एकचा पक्ष म्हणून स्थान मिळालेले दिसते. या क्रमांक एकच्या पक्षात क्रमांक एकचे पद स्वीकारणारे पहिले मुख्यमंत्री त्यानंतरच्या मधल्या काळात उपमुख्यमंत्री झालेले असले. तरी आता ते लोणकढी तूप खाऊन तयार झाल्याप्रमाणे सर्वशक्तीमान मुख्यमंत्री म्हणून मुख्यमंत्री पदावर आरूढ झालेले आहेत. मुख्यमंत्री नागपूरचे असल्यामुळे त्यांच्या संपूर्ण परिवाराला आम्ही अगदी जवळून ओळखतो. देवेंद्र फडणवीस यांचे पिताश्री गंगाधरराव फडणवीस आमदार होण्यापूर्वी नागपूरच्या महापालिकेत दमदार नेते होते. त्यावेळी आपला पुत्र आपल्या कुटुंबाची कीर्ती अगदी दिगंत अशा प्रकारे केवळ महाराष्ट्रातच नाही. तर संपूर्ण भारतात पसरवणार, याची त्यांना कल्पना असावीच. आज जर गंगाधरराव असते. तर आपल्या सुपुत्राचा आजच्या भव्यदिव्य अशा सोहळ्याचा त्यांना अत्याधिक आनंद झाला असता. पण त्यांच्या मातोश्री आजही चांगल्या आशीर्वादाने आपल्या सपुत्राचा हा भव्यदिव्य सोहळा बघत आहेत. ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. आजच्या प्रसंगी अधिक काही न बोलता देवेंद्रजींना आम्ही भरभरून शुभेच्छा देतो. महाराष्ट्राला या आगामी पाच वर्षात देशातील क्रमांक एकचे राज्य म्हणून महाराष्ट्राला आता पेक्षाही यशोशिखरावर नेण्याकरता ते कटिबद्ध होतील. याबद्दल आमच्या मनात जराही शंका नाही. देवेंद्रजींना पुनश्च शुभेच्छा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## त्यागासाठी तयार राहा !

### महायुतीच्या नेत्यांना फडणवीसांचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी भाजप विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. त्यामुळे तेच महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होणार आहेत. या निवडीनंतर सहकारी आमदारांना मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी भाजपसह महायुतीच्या सर्वच नेत्यांना '४ गोष्टी मनासारख्या व ४ गोष्टी मनाविरुद्ध होतील' असे नमूद करत आपल्या भविष्यातील कणखर निर्णयांचे स्पष्ट संकेत दिले.

फडणवीस म्हणाले, आपल्याला जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मोठा संघर्ष करावा लाणार आहे. आपल्याला जनतेच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत. हे करताना आपल्याला महायुतीमधील सर्वांना सोबत घेऊन पुढे जावे लागेल. काहीवेळा सर्वांच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. पण आपण एक मोठा विचार घेऊन राजकारणात आलो आहोत हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

भविष्यात काही गोष्टी आपल्या मनासारख्या होतील व काही गोष्टी मनाविरोधात होतील. पण त्यानंतरही आपण सर्वजण एकदिलाने काम करू. आपण आपली शक्ती दाखवून देऊ.

आमचे सराकर महाराष्ट्राच्या सर्वांगिन विकासासाठी, प्रगतीसाठी २४ तास काम करेल व सामान्य माणसांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल. देवेंद्र फडणवीस यांनी या विधानाद्वारे एकप्रकारे महायुतीमधील मंत्रीपदासाठी इच्छुक असणाऱ्या नेत्यांना स्पष्ट संदेश दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

फडणवीस यांनी यावेळी महाविकास आघाडीवरही निशाणा साधला. ते म्हणाले, २०१९ मध्येही जनतेचा कौल आपल्याला मिळाला होता. पण जनतेसोबत बेईमानी झाली. आपण एक नवी सुरूवात करत आहोत. सुरूवातीच्या अडीच वर्षात आपल्याला त्रास देण्यात आला. मात्र, एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही. आज पुन्हा एकदा स्पष्ट बहुमताने महायुतीचे सरकार आले. हे एक अभूतपूर्व यश आहे.

## विदर्भातून कुणाला संधी?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**
महायुती सरकारचा मुख्यमंत्री कोण होणार, हा सस्पेन्स अखेर आज संपला. उद्या सरकार स्थापन होणार असून मुख्यमंत्र्यांसह दोन उपमुख्यमंत्री शपथ घेतील. यासोबतच काही आमदार देखील मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. तथापि, विदर्भातून कोणाला संधी? याविषयी उत्सुकता आहे.

भाजपकडून चंद्रशेखर बावनकुळे व सुधीर मुनगंटीवार या दोघांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याचे वृत्त असून, राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे विदर्भातील धर्मरावबाबा आत्राम यांना संधी दिली जाणार आहे . भाजपातून राष्ट्रवादीत गेलेले राजकुमार बडोले यांना तूर्त वेटिंगवर ठेवण्यात येईल. पहिल्या टप्प्यात शिवसेनेकडून विदर्भातील एकालाही संधी मिळणार नसल्याचे समजते.

दरम्यान, विदर्भाच्या ११ जिल्ह्यातील महायुतीचे आमदार मुंबईत डेरेदाखल असून, अनेकांनी आपापल्यापरिने मंत्रीमंडळात स्थान मिळावे म्हणून प्रचंड लॉबिंग चालविली आहे . काहीजण परिवारासह ठाण मांडून आहेत.

## शिंदेंचे माहित नाही पण मी तर...

■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :**



एकनाथ शिंदेंचे माहित नाही, पण मी तर मंत्री म्हणून गुरूवारी शपथ घेणारच, असे सांगत अजित पवार यांनी फिरकी घेण्याचा प्रयत्न केला. सत्ता स्थापनेचा दावा केल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

अजित पवार यांनी त्यांच्या दिल्ली दौऱ्याबाबतही खुलासा केला . ते म्हणाले की, मी माझ्या वेगळ्या कामासाठी दिल्लीला गेलो होतो. मी अमित शाह यांना भेटायलाच गेलो नव्हतो, सुनेत्रा पवार या राज्यसभेच्या सदस्य असून, त्यांना देण्यात आलेल्या बंगल्यामध्ये काय बदल करता येतील, हे बघण्यासाठी आर्किटेक्टला घेऊन गेलो होतो.

सर्वोच्च न्यायालयात आमच्या काही केसेस सुरू आहेत. या सर्व खटल्यांचे काम प्रफुल पटेल पाहत होते. मी वकिलांना कधी भेटलो नव्हतो. त्यामुळे आमच्या खटल्यांचे काम पाहणाऱ्या वकिलांबरोबर भेट घेतली. तसेच नातेवाईकाचे लग्न होते. यासाठी दिल्लीला गेल्याचे ते म्हणाले.

## चौकशी आयोगाला ३ महिन्यांची मुदतवाढ

### कोरेगाव भीमा हिंसाचार

■ **वृत्तसंस्था
पुणे, दि. ४ :**



कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ परिसरातील हिंसाचार प्रकरणी नियुक्त निवृत्त न्यायमूर्ती पटेल यांच्या चौकशी आयोगास आणखी ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

या घटनेसंबंधी आणखी काही जणांच्या साक्षी नोंदवायच्या आहेत. आयोगाची मुदत ३० नोव्हेंबर २०२४ रोजी संपल्याने आयोगाने किमान ४ महिने मुदतवाढ देण्याची विनंती केली होती.

त्यानुसार राज्य सरकारने आता २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. पटेल आयोगाला दिलेली ही १५ वी मुदतवाढ आहे. आतापर्यंत चौकशी आयोगाने ५० पेक्षा अधिक जणांच्या साक्षी नोंदवल्या आहेत. कोरेगाव भीमा येथे सात वर्षांपूर्वी हिंसाचार झाला होता.

## गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात

# भूकंपाचे धक्के

### तेलंगणातील मुलुगु येथे भूकंपाचा केंद्रबिंद रिष्टर स्केलवर ५.३ तिव्रतेची नोंद

■ **महासागर प्रतिनिधी
गडचिरोली / चंद्रपूर, दि. ४ :**
तेलंगणा राज्यातील मुलुगु येथे आज सकाळी ७ वाजून २७ मिनिटांनी भूकंप झाला. याचे सौम्य धक्के गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात जाणवलेत. या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केल वर ५.३ अशी नोंदविण्यात आलेली आहे.

अशा प्रकारचे धक्के पुन्हा जाणवल्यास नागरिकांनी दक्षता घ्यावी व घाबरून न जाता इमारती बाहेर मोकळ्या जागेत सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजय दैने, विनय गौडा यांनी केले आहे.

तेलंगणामध्ये बुधवारी पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंप इतका जोरदार होता की महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या काही भागातही त्याचे धक्के जाणवले. सकाळी या धक्क्यांमुळे लोक घाबरले आणि घराबाहेर पडले.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, तेलंगणातील मुलुगु जिल्ह्यात सकाळी ५.३ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. हैदराबादमध्येही भूकंपाचे धक्के जाणवले. सकाळी ७.२७ वाजता भूकंप झाला. त्याचे केंद्र जमिनीपासून ४० किलोमीटर खोल होते.

छत्तीसगडमधील बिजापूर, सुकमा आणि जगदलपूर या तीन जिल्ह्यांमध्येही सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. या धक्क्यांनी येथील लोक भयभीत झाल्याचे दिसून आले. काही सेकंदांच्या या धक्क्यांमुळे लोक घाबरून आपापल्या घराबाहेर पडले. सध्या कोणत्याही जीवित वा वित्तहानीचे वृत्त नाही.

## ज्याने वाचविले अनेकांचे प्राण..

# त्याचाच अपघाती मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नांदुरा, दि. ४ :**
अपघातात जखमी किंवा आजारी व्यक्तीचा जीव वाचविता यावा म्हणून तातडीने रूग्णवाहिकेच्या कॅबिनमध्ये दाखल होत गाडी दामटणाऱ्याने अनेकांना जीवदान दिले. परंतु, त्याच रूग्णवाहिका चालकाला अपघातात प्राण गमवावे लागल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. अक्षय उकंडा असे त्याचे नाव.

लोणार तालुक्यातील किनगाव जट्टू (आईचा तांडा) येथील रहिवासी अक्षय रुग्णवाहिका चालक होता . तुटपुंज्या मानधनातून अक्षय आणि त्याच्या परिवाराचा उदरनिर्वाह चालायचा. मंगळवारी रात्री उशिरा तो चालवित असलेल्या रुग्णवाहिकेला एका भरधाव मालवाहू वाहनाने धडक दिली. बीबी दुसरबीड मार्गावरील पेट्रोल पंपाजवळ हा अपघात झाला. या अपघातात चालक अक्षय जागीच दगावला.

या अपघातात त्याचा साथीदार , रुग्णवाहिकेचा वाहक राजेश्वर वाकळे (३०) रा. वाशी हा गंभीर जखमी झाला आहे. रुग्णवाहिका बीबी कडून दुसरबीड कडे जात होती. यावेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या भरधाव ट्रकने रुग्णवाहिकेला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.



घटनेची माहिती मिळताच बीबी (ता.लोणार) पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदीप पाटील आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. जखमी वाहक राजेश्वर वाकळे याला जालना येथे हलवण्यात आले. या घटनेचा पुढील तपास बीबी पोलीस करीत आहेत.

## सत्ताकेंद्राचा नवा पत्ता 'सागर बंगला'

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
महाराष्ट्रात नव्या मुख्यमंत्र्याच्या शपथविधीची तारीख जाहीर झाल्यानंतर सत्ता स्थापनेच्या घडामोडींना वेग आला आहे. त्यातच मुख्यमंत्री शिंदेंनी आजारपणाचं कारण देत आमदार-खासदारांच्या बैठका रद्द केल्या. त्यामुळे शिंदे गटाच्या आमदारांनी देवेंद्र फडणवीसांचं सरकारी निवासस्थान असलेल्या सागरवर धाव घेत फिल्डिंग लावल्याची चर्चा रंगली आहे.

याआधीच्या सरकारमध्ये ज्या नेत्यांना मंत्रिपद दिलं होते, अशा तीन नेत्यांना यावेळी मंत्रिपद दिले जाणार नाही. म्हणजेच मंत्री राहिलेल्या तीन बड्या नेत्यांचा पत्ता कट होणार आहे. त्याऐवजी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे.

अकार्यक्षम, भ्रष्टाचाराचे आरोप आणि वाचाळवीर मंत्र्यांना नारळ देण्याची शक्यता आहे. म्हणजेच त्यांना घरचा रस्ता दाखवला जाणार आहे. यामुळे यामध्ये आपले तर नाव नाही ना? या धास्तीने काही माजी मंत्री तर नव्यांना संधी दिली जाणार असल्याने काही शिंदे गटाचे आमदार सागर बंगल्यावर भेटीगाठी घेताना पहावयास मिळत आहेत. त्यामुळेच आता राज्यातील सत्तेचं केंद्र वर्षा बंगला नसून सागर बंगला झाला आहे.

सागर बंगल्यावर जावून देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणाऱ्यांमध्ये उदय सामंत, शंभुराज देसाई, दादा भुसे, दीपक केसरकर, राजेंद्र गावित, तानाजी सावंत, संजय शिरसाट, प्रकाश सुर्वे, सुहास कांदे, गुलाबराव पाटील ही नाव समोर आली आहेत. तर काहींनी अंधाऱ्या रात्री देखील भेटीगाठी घेतल्याचे सूत्रांकडून कळते.

निकालानंतर भाजप आणि शिंदे गटात आधी मुख्यमंत्रिपद आणि त्यानंतर खातेवाटपावरून रस्सीखेच रंगलीय. त्यातच शिंदेंकडून आमदारांच्या बैठका रद्द करण्यात आल्याने शिंदे गटाचे आमदार हवालदिल झाल्याची चर्चा रंगली. मात्र शिंदे गटाच्या आमदारांनी मंत्रिपदासाठी फडणवीसांची भेट घेतलीय की शिंदेंचा निरोप घेऊन तिढ्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला याबाबत चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# बाबा आढावांच्या झेंड्यावर विरोधकांचं पंढरपूर!

**सत्यशोधक विचाराच्या क्रांतिकारक व ९५ वर्षाच्या बाबा आढाव ज्या व्यवस्थेविरोधात आत्मक्लेश उपोषण करताय ते खरं तर विरोधकांचं काम होतं. विरोधी पक्षांचे नेते मात्र त्या उपोषणाला पाठींबा देताय. पाठिंबे देण्याऐवजी त्यांनी पण उपोषण करायला पाहीजे. निवडणुकित घोटाळा झालाय हे जर विरोधकांना वाटत असेल, तर त्यांनी एक तर तो घोटाळा उघड केला पाहीजे कींवा त्याचे पुरावे जगजाहीर केले पाहीजे. ज्यांचा फक्त एकच खासदार आहे, त्यांचे ४१ आमदार निवडून येतात, ज्यांचे सीत खासदार आहेत त्यांचे ५७ आमदार निवडून येतात, ज्या बीजेपीची महाराष्ट्रात सर्वात बेकार कामगिरी आहे म्हणजे नऊ खासदार आहेत, त्यांचे १३३ आमदार निवडून येतात आणि ज्या महाविकास आघाडीचे ३२ खासदार आहेत, त्यांचे फक्त ४५ आमदार निवडून येतात, याचे काय कारण असावे? या शंकेला जरूर वाव आहे.**



महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मतांमध्ये घोटाळा झालाय. त्यामुळे दिवसेंदिवस नवनविन पुरावे आणि खुलाशातुन ईव्हीएम विरोधातील आंदोल्न तीव्र होत आहे. सरकार आणि प्रशासन भेदरलेल आहे की, पाश्चमात्य देशात उभ्या राहिलेल्या जनआक्रोशा नंतर भारतात पण इसेच काही निर्माण होणार नाही ना? आज भारतभर ईव्हीएम विरोधात प्रचंड असा जनआक्रोश वाढलेला आहे. लोकांची गावागावात साखळी उपोषणे सुरू झालेली आहेत. लोक मोर्चे काढून ईव्हीएमची प्रतिकृती जाळत आहेत आणि आपला विरोध प्रदर्शित करत आहेत.

वेगवेगळ्या मतदान बूथ वरील गंभीर असे खुलासे उघड होत आहेत. ना भुतो ना भविष्यती असे वातावरण गावो गावी सामान्य लोकांत इव्हीएम विरोधात निर्माण झालेले आहे. या आंदोलनातूनच एक दबाव गट तयार होऊन लांडीलबाडी करणारे लोक उघड होतील आणि ईव्हीएमचे गौडबंगाल आणि सत्य बाहेर येईल. ही झाली ईव्हीएमच्या विरोधातील बाजू. दुसरी बाजूही समजून घेणे गरजेचे आहे. अनेक लोकांच्या मते कसलं ईव्हीएम आणि कसलं काय अशा प्रतिक्रियाही ऐकू येत आहे. महायुतीने भरघोस यश मिळवले आणि अपेक्षेप्रमाणे ईव्हीएमच्या नांवाने खडे फोडणे चालु झाले. खरं तर यात कसला ईव्हीएमचा काय दोष? निवडणूकीपूर्वी महायुतीचे संख्याबळ हे २०५ एवढे होते. त्यात भाजप १०५ व समर्थक दहा होते. जोडीला एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ४१ आणि ९ अपक्ष होते.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ४० मिळून असे हे २०५ चे संख्याबळ भगव्या लाटेमुळे वाढून २४२ वर पोहोचले. त्यामुळे कसले ईव्हीएम फिक्सिंग आले? उलट पक्षी शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या पाच जागा वाढल्या आहेत. एकनाथ शिंदे गट त्यांना सोडून गेल्यानंतर त्यांच्याकडे पंधराच आमदार होते आणि आता त्यांचे वीस आमदार निवडून आले आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे निवडणूकीपूर्वी तेरा आमदार होते, तर आता त्यांचे दहा निवडून आले म्हणजे फक्त तीन कमी झाले. हिंदू लाट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पद्धतशीर नियोजन आणि मुद्द्यावर आधारित प्रचार याचा सर्वाधिक फटका हा काँग्रेसला बसला. त्यांच्या जागा मागच्या वेळे पेक्षा २७ ने कमी झाल्या आणि त्या जागा महायुतीच्या पारड्यात पडल्या. मग कसले आले ईव्हीएम फिक्सिंग. आता जळगांव जिल्हात युतीचे मागच्या वेळी दहा आमदार होते. ते दहाच्या दहा तर निवडून आलेच शिवाय रावेरची काँग्रेसची जागाही जिंकली. अकराच्या अकरा जागा पटकाविल्या म्हणजे का हे आमदार ईव्हीएम फिक्सिंगने निवडून आले? अशाच प्रकारे महायुतीच्या दिग्गजांनी आपापले गड राखले.



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

उलट ईव्हीएम वर शंका घेऊन विरोधकांना हे म्हणायचे आहे का, की हे जे आमदार मागच्या निवणुकीत जेव्हा तुमच्याकडून निवडून आले होते, तेव्हा पण ते ईव्हीएम फिक्स करूनचं निवडून आले होते? जे पक्ष सोडून गेले होते ते सर्वच दिग्गज होते आणि ते पुन्हा निवडून आले एवढाच विषय आहे. फक्त जाती जातीतील मतांच्या ध्रुवीकरणाचा डाव राज्यातील सुज्ञ जनतेने लोकसभेच्या निवडणुकीनंतर ओळखला होता. 'बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है' ह्या नाऱ्याला जनतेने साथ दिली आणि एकगठ्ठा मतदान केले. त्यामुळेच हे अभूतपूर्व यश मिळाले. लाडकी बहीण, महिलांना बस मध्ये प्रवास सवलत, हिंदूत्व आणि इतर लोकाभिमुख योजना ह्या लोकप्रिय ठरल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार ह्यांच्या काळात झालेल्या गतिशील कामांमुळे महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा दिग्गजांना संधी दिली. त्यामुळे महायुतीच्या मागच्या संख्येत २७ ची भर पडून ही संख्या २०५ वरून २४२ वर पोहोचली. आता काही प्रश्न आपोआप निर्माण झाले आहेत. भारतीय जनता पक्षाची २०१४ मध्ये संपूर्ण देशभर प्रचंड अशी मोठी लाट निर्माण झाली होती. अनेक रथी महारथी त्या लाटेत भुईसपाट झाले. त्यावेळी एवढी मोठी लाट होती, तरी त्यांना महाराष्ट्रात असे यश मिळवता आले नव्हते, ते आता मिळाले. विशेष म्हणजे आता तर अशी कोणतीही लाट ग्राऊंडवर अस्तित्वात नसताना, महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी, महिला अत्याचार, शिवाजी महाराजांचा अपमान, महिला असुरक्षितता, मराठा समाजाचा तीव्र विरोध आणि यासारखे असे असंख्य मुद्दे असताना २२५+ जागा महायुती कशी जिंकू शकते? असा प्रश्न अनेक राजकीय पक्षांना पडला व म्हणूनच ईव्हीएमवर शंका सुरू झाल्या. मुंबईत सभेला माणसे नाहीत म्हणून सभा रद्द करून निघून जाणारे मोदी आणि त्यांची भाजप जिंकूच कशी शकते? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रकरणात सारेच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. तेच नव्हे तर सामान्य मतदार देखील चक्रावून गेले आहेत.

महायुतीला मिळालेले बहुमत म्हणजे १९६० ला संयुक्त महाराष्ट्र तयार झाल्यापासून आजपर्यंत मिळालेले सर्वात मोठे बहुमत आहे. म्हणजेच या इलेक्शनला सगळीकडे जसे की हॉटेल, चहाची दुकाने, बस स्टॉप, सरकारी कचेऱ्या, शेतकऱ्यांमध्ये, बेरोजगारांमध्ये, भाजी मार्केट, रेल्वे, मंदिर, मस्जिद, कॉलेज इत्यादी सर्व ठिकाणी फक्त आणि फक्त भाजप युतीचे गुणगान सुरू असायला हवे होते. विरोधी उमेदवाराला बघून जणू लोक नाक मुरडायला हवे होते, एवढे यश महायुतीला मिळाले आहे. आपल्या आजुबाजूला खरचं असे काही वातावरण होते? या यशाचे श्रेय लाडक्या बहिणींना दिले गेले. भाजपने 'लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ देवा भाऊ' अशी टॅगलाईनच तयार केली.

या महिलांना पैसे जरी मिळाले असतील तरी महाराष्ट्रीयन महिला आपले मत विकणार नाही, एवढे मात्र नक्की. एवढे मोठे यश राज्यभरात विरोधात वातावरण असताना असे कसे यश मिळाले? महाराष्ट्रात मविआचे सरकार आले असते किंवा विरोधी पक्षनेता जरी एखादा विरोधी पक्षाचा झाला असता तरी सरकारला धारेवर धरायला संधी होती. पण तीही आता राहीली नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्ष ईव्हीएमला दोष देतात आणि विरोध करतात. जेव्हा त्यांना एखाद्या राज्यात यश मिळते तेव्हा हे मागच सर्व विसरून जातात. त्यामुळे एकतर देशातील सर्व विरोधी पक्षांनी ईव्हीएमच्या विरोधात शेवटपर्यंत लढावे किंवा त्याला दोष देणे बंद तरी करावे. कारण त्याशिवाय दुसरा उपाय नाही. म्हणून देशव्यापी चळवळ उभी करून इलेक्शन कमिशन जोपर्यंत बॅलेट परत आणत नाही, तोपर्यंत हा लढा विरोधी पक्षांना लढावाच लागेल. बाबा आढावांनी सुरूवात केली आहे. विरोधक त्याचा पाठपुरावा कशा पध्दतीने करतील, याकडे फक्त महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे लक्ष लागले आहे.

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंचे विचार जिंकले, पुत्र हारला!



नुकत्याच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पार धुव्वा उडाला.महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, वर्धा, गोंदिया, नांदेड, हिंगोली, जालना छ. संभाजीनगर, कोल्हापूर अशा एकूण अकरा जिल्ह्यातून मविआवर लत्ताप्रहार करीत जनतेने हकालपट्टी केली. त्यातही छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राने जनाब उध्दवभाई ठाकरे यांचे तर पार पानिपत केले .

या निवडणूकीत हिंदुत्व विरुध्द तथाकथित सेक्युलर पुरोगामी असा सामना दिसला. साधुसंत महंत विरुध्द मुल्लामौलवी असा सामना रंगला.भगवा की हिरवा हा प्रचाराचा प्रमुख मार्ग दिसला. या प्रचारात मतदारांनी महायुतीला प्रचंड प्रतिसाद दिला. यात खरी गोची आणि पच्ची झाली ती उबाठाची.

महायुतीने हिंदूहृदयसम्राट वं.बाळासाहेब ठाकरेंचे हिंदुत्वाचे विचार जनतेत प्रक्षेपित केले. ते जनतेच्या हृदयात शिरले.लोकांनी महायुतीला मतदान केले. उबाठा मात्र मुस्लिम मतदारांना सांभाळण्याच्या नादात हिंदुत्वाला तिळांजली देत राहिला. हिंदू विचारापेक्षा लांगूलचालण केले तर लोकसभेप्रमाणे विधानसभेतही मुस्लिम मते आपल्याला मिळतील हा त्यांचा फाजिल विश्वास. त्यामुळे त्यांनी भगव्या ऐवजी हिरवी वस्त्रे परिधान केली. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्र उध्दव यांच्यावर चिडून होता.

उद्धवसह उबाठा नेत्यांच्या उपस्थितीत मविआच्या प्रचारसभात नारे तकबिरचे नारे, हिरवे झेंडे यामुळे हिंदू समाजात प्रचंड रोष उत्पन्न झाला. ज्यांच्या भाषणाची सुरुवात जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो... ने व्हायची, जय भवानी जय शिवरायने आसमंत निनादायचा हे सारं बंद होऊन मिळमिळीतपणा आला. हे महाराष्ट्र उघड्या डोळ्यांनी पहात होता.

पुत्र म्हणून उध्दव वं.बाळासाहेबांच्या संपत्तीचे वारस जरूर आहेत पण हिंदुत्वाचे खरे वारस मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच आहेत हे मतदारांनी ठरविले आहे. अयोध्येतील श्रीराम मंदिरावर उलटसुलट वक्तव्ये, ३७० वर अद्वातद्वा बोलणे, जय श्रीराम या घोषणेला हरामखोर म्हणणे, टिपू सुलतानचे गोडवे, औरंगजेबाला दिलेले मोठेपण, योगी आदित्यनाथांना अपमानित करणे हे सर्व वंदनीय बाळासाहेबांच्या तत्वांच्या विपरीत असूनही त्यावर उबाठा ठाम राहणे. हिंदू जनमानसात याबद्दल प्रचंड रोष उत्पन्न झाला.

उबाठाचा हिंदुत्वाला गाडून पुरुन त्यावर हिरवळ उगवण्याचा प्रयत्न म्हणजे वं. बाळासाहेबांच्या आत्म्याला किती त्रास होत असेल हे उबाठाला कळलेच नाही. याउलट एकनाथ शिंदे यांच्या हिंदुत्वाला प्रचंड बहुमत म्हणजे पूजनिय बाळासाहेबांच्या पिंडाला काकस्पर्श होय. महाराष्ट्राने हे हिंदुत्वाला प्राधान्य देण्याचे पुण्यकर्म या निवडणूकीत करुन हिंदूहृदय सम्राट वं. बाळासाहेबांना खरी श्रद्धांजली दिली आहे.

मविआतील इतर घटक आधीपासूनच हिंदू विरोधी आणि लांगूलचालण भूमिकेत असायचे.पण उध्दवजी ठाकरे तर आयुष्यभर हिंदुत्वाचे सुर्य असणाऱ्या वं. बाळासाहेबांचे पुत्र. पण त्यांनी पुत्रधर्म न पाळता सत्तेसाठी असंगाशी संग केला. महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस सांगत होता की संजय राऊतपासून सावध रहा. पण यांना विनाशकाले विपरीत बुद्धी. उबाठाचे चालक राउतांना बनवले.
चांगल्या बाबींना विरोध, स्थगिती यातच त्यांना मर्दुमकी वाटायची. लाडकी बहीण योजना बंद व्हावी म्हणून न्यायालयात जाणे, गोमातेला राज्यमाता दर्जा दिला तेंव्हा उलटसुलट प्रतिक्रिया, आदित्य ठाकरेंचे मुख्यमंत्र्यावरची वक्तव्ये म्हणजे उंचीपेक्षा आगाऊ बोलणे, संजय राऊत यांचे नित्याचे बरळणे याला महाराष्ट्र विटला होता.
खरं म्हणजे हिंदुत्व आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हिंदू अर्थशास्त्र भारताला परम् वैभवाला नेणारे आहे. हे लोकसभेत भारताने मान्य केले तसेच आता विधानसभेत महाराष्ट्राने मान्य केले. सर्वसामान्य मतदारांना महाराष्ट्राचे हित हिंदुत्वातच आहे हे समजले. जे सर्वसामान्यांना कळले ते वं. बाळासाहेबांच्या सुपुत्राला कळू नये ही बाब तशी गंभीरच आहे.
म्हणूनच त्यांचा सुफडा साफ झाला. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांना प्रचंड जागा देवून खरी शिवसेना कोणाची हे जनतेच्या न्यायालयात स्पष्ट झाले. महायुतीतही निवडून येण्याची सर्वाधिक टक्केवारी शिंदे सेनेचीच आहे. हा हिंदूहृदयसम्राट वं. बाळासाहेबांच्या विचारांचा विजय आहे.

महाराष्ट्रातील मतदार कायम सुज्ञ आहे. केवळ वं.बाळासाहेबांचा पुत्र असणे एव्हढीच पात्रता जनतेला मान्य नाही. म्हणूनच या निवडणूकीत मतदारांनी हिंदूहृदयसम्राट वं. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुत्राला हद्दपार केले आणि वं. बाळासाहेबांच्या विचारांना जिंकवले. हे उद्धवना आतातरी कळायला हवे. पाच वर्ष आराम न करता प्रायश्चित्त करा. वं. बाळासाहेबांचे विचार अंगीकारा.वाट चुकलो म्हणून हिंदूहृदयसम्राटांची माफी मागा. वं.बाळासाहेब उदार आहेत ते माफ करतील तुम्हाला!

-------------

प्रा. दिलीप जोशी
वाशिम.
९८२२२६२७३५

# काँग्रेसच्या पराभवाची मालिका

हरियाणाच्या पराभवातून काँग्रेसने कोणताही बोध घेतला नाही, हे महाराष्ट्राच्या निकालाने दाखवून दिले. हरियाणात काँग्रेसने चुकीचे उमेदवार निवडले होते, तसेच महाराष्ट्रात घडले. हरियाणात प्रदेश काँग्रेसचे नेते आपण सत्तेवर येणारच असे गृहीत धरून वागत होते, तसेच महाराष्ट्रातही प्रदेश नेते अहंकारात दंग होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बटेंगे ते कटेंगे या दिलेल्या घोषणेला आक्षेप घेण्यातच काँग्रेस गुंतून राहिली, पण मोदींनी दिलेल्या 'एक है तो सेफ है', या घोषणेने मतदारांवर जादू केली हे काँग्रेसला समजलेच नाही.

**इंडिया कॉलिंग**

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे देशभरातून शंभर खासदार निवडून आले. सोनिया गांधींची कन्या व राहुल गांधींची बहीण प्रियंका गांधी वड्रा यासुद्धा केरळमधील वायनाड मतदारसंघातून साडेचार लाखांचे मताधिक्य घेऊन लोकसभेवर निवडून आल्या. गांधी घराण्यातील आता हे तिघेहीजण संसदेत विरोधी बाकांवर आहेत. लोकसभेत गेली दहा वर्षे कोणी विरोधी पक्षनेता नव्हता.

विरोधी पक्षनेता म्हणून पक्षाला सभागृहाच्या एकूण संख्येच्या किमान दहा टक्के संख्याबळ लागते ते काँग्रेसकडे दोन टर्म नव्हते. आता राहुल गांधी यांच्याकडे विरोधी पक्षनेते पद चालून आले आहे. पण ते खरोखरच या पदाला न्याय देतात का, पक्षाचा विस्तार व्हावा यासाठी त्यांचे नेतृत्व पुरेसे पडते का? चार राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी काही बोध घेणार आहेत का? हा कळीचा मुद्दा आहे.

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भाजपाची रणनिती विविध राज्यांत यशस्वी होताना दिसत आहे व दुसरीकडे राहुल गांधी व मल्लिकार्जुन खरगे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष सातत्याने कमजोर होताना दिसतो आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष भाजपाला टक्कर देऊ शकत नाही. हे जम्मू-काश्मीर, हरियाणा, झारखंड व महाराष्ट्र या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट झाले आहे.

राहुल यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्ष भाजपाला देशात आव्हान देऊ शकत नाही आणि राज्याराज्यांत स्थानिक मुद्द्यांवर आवाजही उठवत नाही. राहुल गांधी लोकसभेचे विरोधी पक्षनेते झाल्यापासून काँग्रेस पक्षाला उत्साह प्राप्त होणे साहजिक आहे. पण ते केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींवर संसदेत आणि संसदेबाहेर हल्ले करीत राहतात.

लोकसभा आणि राज्यसभेचे दैनंदिन कामकाज बंद पाडणे यात काही मर्दुमकी नव्हे. लोकांचे प्रश्न मांडण्याऐवजी कॉर्पोरेट समूहांच्या उद्योगपतींवर रोज प्रहार करणे म्हणजे विरोधी पक्ष शक्तिमान आहे, असे नाही. दोन-चार उद्योग समूहांचा गैरव्यवहार असेल, तर सर्व कॉर्पोरेट जगताला दोषी धरणे बरोबर नाही. त्याचा परिणाम गुंतवणूक व अर्थव्यवस्थेवर होतो याचे भान राहुल व खरगे यांनी ठेवणे गरजेचे आहे.

गेली दहा वर्षे राहुल गांधी कॉर्पोरेटमधील भ्रष्टाचार हा विषय घेऊन मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्यामागे भक्कम पुरावे नाहीत, केवळ हवेत बाण मारले जात आहेत. अमेरिकेतील न्यायालयाने गौतम अदानींना नोटीस काढली या मुद्द्यावरून राहुल गांधी संसदेत व बाहेर सरकारला जाब विचारत आहेत. अजून अदानी जेलबाहेर कसे, असा त्यांनी प्रश्न विचारला.

मुळात अदानी यांना देशातील किंवा विदेशातील कोणत्याही न्यायालयाने दोषी ठरवलेले नाही, त्यांना सजा सुनावलेली नाही, मग राहुल आणि काँग्रेस पक्ष त्यांच्या विरोधात थयथयाट का करीत आहेत? भाजपा विरोधात स्थापन झालेल्या इंडिया आघाडीत डझनावारी प्रादेशिक पक्ष आहेत, त्यांना अदानींच्या विरोधातील काँग्रेसची भूमिका मान्य आहे का, याचाही राहुल व खरगे विचार करीत नाहीत.

महाराष्ट्रात तर अदानींच्या विरोधात केवळ उबाठा सेना व काँग्रेस रान उठवत आहे पण महाआघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार हे वेगळी भूमिका मांडताना दिसत आहेत.

अनेक राष्ट्रीय मुद्द्यांवर इंडिया आघाडीतील घटक पक्षांची भूमिका काँग्रेसपेक्षा वेगळी आहे, त्याची किंमत काँग्रेसला राज्याराज्यांत मोजावी लागते आहे. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी काँग्रेसपासून नेहमीच अंतर राखून असतात. त्यांचा भाजपाच्या अजेंड्याला विरोध आहे पण त्या कधी प. बंगालमध्ये काँग्रेसशी निवडणुकीत जागा वाटपाचा समझोता किंवा आघाडी करीत नाहीत.

अदानींच्या मुद्द्यावर ममता यांनी काँग्रेसला साथ दिलेली नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे. केरळमध्ये कम्युनिस्टांचे सरकार आहे पण तेथे बंदराच्या विकास प्रकल्पासाठी त्या सरकारने अदानी उद्योग समूहाशी करार केला आहे. तेलंगणामध्येही अदानी समूहाशी सरकारने करार केले आहेत. राजस्थानमध्ये अदानी समूहाला गुंतवणूक करण्यास तेथील काँग्रेस सरकारनेच हिरवा कंदील दाखवला आहे. आपल्या मित्रपक्षांना कमी लेखून काँग्रेस मुळीच मजबूत होणार नाही. ओडिसामध्ये काँग्रेस पक्ष संपल्यातच जमा आहे.

प्रत्येक राज्यात निवडणूक लढवताना भाजपाची रणनिती वेगळी असते. स्थानिक मुद्दे व स्थानिक नेते यांना महत्त्व दिले जाते, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते यांना महत्त्व देऊन त्यांना योग्य दिशा दाखवली जाते. मोदींची सर्वत्र भाषणे होतात पण त्या राज्यांचा इतिहास, भूगोल, राजकीय परिस्थिती याचा ते अभ्यास करून बोलतात. राहुल गांधी वगळता काँग्रेसकडे सर्व राज्यात फिरणारे राष्ट्रीय नेते आहेत तरी कोण?

निवडणुका आल्या की काँग्रेस कार्यकर्ते एकत्र दिसतात पण तेही सत्तेसाठी जमतात. भाजपाचे केडर वर्षभर कार्यरत असते. भाजपाच्या पाठीशी संघाच्या निःस्वार्थी स्वयंसेवकांची फौज उभी असते. तसे काँग्रेसच्या मागे सेवादल, महिला, युवक, विद्यार्थी किंवा अन्य आघाड्यांची फौज राबताना दिसत नाही. सन २०१४ मध्ये काँग्रेसचे लोकसभेत ४४ खासदार निवडून आले, २०१९ मध्ये ५२ खासदार विजयी झाले, पण या दोन पराभवांपासून काँग्रेसने बोध घेतला नाही.

आता काँग्रेसचे १०० खासदार लोकसभेत आहेत. काँग्रेसचे पुनरुज्जीवन होते असे वाटत असतानाच महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड व जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसला पाठोपाठ मोठा पराभव पत्करावा लागला. एकीकडे राहुल गांधी संसदेत मोदी सरकारवर रोज हल्लाबोल करीत आहेत, पण राज्याराज्यांत काँग्रेसचा पराभव होतो आहे.

महाराष्ट्रात काँग्रेस, ठाकरेंची उबाठा सेना, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महाआघाडी बॅनरखाली एकत्र येऊन विधानसभा निवडणूक लढवली. काँग्रेसने सर्वाधिक १०१ जागा लढवल्या. प्रत्यक्षात काँग्रेसचे केवळ १६ आमदार निवडून आले. विधानसभेच्या इतिहासात काँग्रेसच्या आमदारांची एवढी कमी संख्या प्रथमच असावी.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला साफ नाकारले. हरियाणाच्या पराभवातून काँग्रेसने कोणताही बोध घेतला नाही, हे महाराष्ट्राच्या निकालाने दाखवून दिले. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत, तेथे भाजपाने १३२ (महायुतीने २३५) जिंकून काँग्रेसची वाट लावली. हरियाणात अंतर्गत कलहामुळे काँग्रेसचे नुकसान झाले, तर महाराष्ट्रात ओव्हर कॉन्फिडन्स नडला. सत्ता नसेल, तर काँग्रेस खिळखिळी होते, हे महाराष्ट्रातल्या निकालाने दाखवून दिले.

## जगावर आता नव्या व्हायरसचं संकट



नव्या विषाणूने जगाच्या चिंता वाढवल्या आहे. यामुळे डोळ्यांतून रक्तस्त्राव होतो. या विषाणूचा संसर्ग झाल्यानंतर रक्ताच्या गुठळ्या तयार होतात. हा एक गंभीर आजार मानला जात आहे. रवांडामध्ये आतापर्यंत या गंभीर विषाणूमुळे 15 लोकांचा मृत्यू झालाय तर शेकडो लोकांना याची लागण झाली असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या विषाणूनला ब्लिडिंग आय व्हायरस असेही म्हणतात. याला वैज्ञानिक भाषेत हेमोरेजिक कंजक्टिवाइटिस असेही म्हणतात. हे एक प्रकारचे व्हायरल इन्फेक्शन आहे. या विषाणूची लागण झाल्यानंतर डोळ्यांमध्ये तीव्र जळजळ आणि खाज सुटणे, डोळ्यांच्या पांढऱ्या भागात लालसरपणा किंवा रक्ताची गुठळी तयार होते. त्यामुळे वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे.

# रोज एक गाजर खा, आजार पळणार लांब



गाजरच्या भाजीसोबत गारजचा हलवा, लोंच, मुरब्बा, पाक, सलाद, ज्यूस असे विविध प्रकाराच्या माध्यमातून गाजर खाता येतो. गाजरमध्ये मुबलक प्रमाणात बीटा कॅरोटीन आणि एंटीऑक्सीडेंट आहे. अर्धा कप गाजरमध्ये 25 ग्रॅम कॅलरीज, 6 ग्रॅम कार्बोहाइड्रेट, 2 ग्रॅम फायबर, 3 ग्रॅम साखर आणि 0.5 ग्रॅम प्रथिने असतात.

गाजरात बीटा कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. हे डोळ्यांसाठी खूप फायदेशीर आहे. यामुळे गाजर खाल्याने वाढत्या वयामुळे डोळ्यांच्या निर्माण होणाऱ्या आजारांपासूनही सुटका मिळते. बीटा-कॅरोटीनसोबतच व्हिटॅमिन सी देखील गाजरात मुबलक प्रमाणात आहे.

गाजरात आढळणारे कॅरोटीन नावाचे पोषक तत्व रातांधळेपणाच्या समस्येपासून सुटका मिळते. गाजरचे सेवन केल्यामुळे हृदयाला त्याचा फायदा होतो. त्यामुळे हृदयविकार होण्याचा धोका कमी होतो. गाजरात आढळणारे पोटॅशियम हे खनिज शरीरातील सोडियमचे प्रमाण संतुलित करते.

रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास गाजर मदत करतो. यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. गाजर खाल्ल्याने शरीरातील अँटिऑक्सिडंट्सचा प्रभाव वाढू शकतो.

गाजरामध्ये मुबलक प्रमाणात फायबर असतात. त्यामुळे शौचाची समस्या निर्माण होत नाही. त्यामुळे तुमची पचनक्रिया सुधारते. याशिवाय ते अन्न पचण्यासही उपयुक्त आहे. गाजर खाल्ल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळतो.

## अशोकायन

### राजकीय फटाके

दिवाळीच्या फटाक्यांचा
आवाज गेलाय विरून
पण राजकीय फटाक्यांचे
प्रतिध्वनी येताहेत राहून राहून

राजकीय बॉम्ब स्फोटांनी
अर्थव्यवस्था हादरली
बळीराजाची दिवाळी
मात्र अंधारातच गेली ...

दिवाळीच्या फटाक्यांनी
तात्पुरते प्रदुषण वाढले
राजकीय फटाक्यांनी तर
मानवी सभ्यतेलाच
हद्दपार केले..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# स्कोडा ऑटो इंडियाकडून कायलॅक श्रेणीच्या किमतींची घोषणा

## आजपासून बुकिंगला सुरुवात लिमिटेड ऑफर: पहिल्या , ग्राहकांना कॉम्प्लीमेण्टरी १ वर्ष स्टॅण्डर्ड मेन्टेनन्स पॅकेज मिळणार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :




स्कोडा ऑटो इंडियाची सब-मीटर एसयूव्ही विभागातील पहिली वेईकल कायलॅक आता व्हेरिएण्ट्स व किमतींच्या संपूर्ण श्रेणीसह लॉंच करण्यात आली आहे. कायलॅक आता क्लासिक, सिग्नेचर, सिग्नेचर+ आणि प्रेस्टिज या चार व्हेरिएण्ट पर्यायांमध्ये उपलब्ध असेल. एसयूव्हीची सुरूवातीची किंमत कायलॅक क्लासिक ट्रिमसाठी . लाख रूपये आहे. टॉप-ऑफ-द-लाइन कायलॅक प्रेस्टिज एटीची विक्री ,, रूपयांमध्ये करण्यात येईल. तसेच, पहिल्या , ग्राहकांना कॉम्प्लीमेण्टरी - वर्ष स्टॅण्डर्ड मेन्टेनन्स पॅकेज (एसएमपी) मिळेल. कायलॅकसाठी बुकिंग आज सायंकाळी वाजल्यापासून सुरू होत असून डिलिव्हरीजना जानेवारी रोजी सुरूवात होईल. कायलॅकला आधीच उत्तम प्रतिसाद मिळाला आहे, जेथे कायलॅक हँड-रेझर्सक्रायलॅक क्लब सदस्यांकडून १६०.००० हून अधिक एक्स्प्रेशन्स आणि डिलर चौकशी मिळाल्या आहेत. स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा म्हणाले, ''नवीन कायलॅक भारतातील स्कोडा ब्रँडसाठी न्यू एराच्या आगमनाला सादर करते. स्कोडा कायलॅक आमच्यासह विभागासाठी देखील गेम-चेंजर ठरेल आणि ग्राहक अनुभवाला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासोबत भारतीय रस्त्यांवर युरोपियन तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करेल. आम्ही पहिल्या ३३,३३३ ग्राहकांसाठी बेस्ट-इन-सेगमेंट मालकीहक्क अनुभवाची घोषणा केली आहे. कायलॅकने संपूर्ण २०२४ दरम्यान मोठा उत्साह आणि चर्चा निर्माण केली आहे, जी नोव्हेंबरमधील वर्ल्ड प्रीमियरसह अधिक वाढली. या एसयूव्हीमध्ये जागतिक डिझाइन पैलू, अद्वितीय ड्रायव्हिंग गतीशीलता, तडजोड न करणारी सुरक्षितता, अनेक वैशिष्ट्ये, ऐसपैस व कार्यक्षम इंटीरिअर आहे, ज्याला पूरक श्रेणीमधील किंमत आहे. आम्हाला विश्वास आहे की कायलॅक नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याच्या, नवीन ग्राहकांना स्कोडा कुटुंबामध्ये आणण्याच्या आणि भारतातील आमची ब्रँड उपस्थिती प्रबळ करण्याच्या ध्येयाला अधिक दृढ करेल.''

# अवनीच्या भूमिकेसाठी तयारी करताना मी अनेक गृहिणीचे आयुष्य जवळून पाहिल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

झी टीव्हीवरील नवीन मालिका बस इतना सा ख्वाब ही एक भावस्पर्शी कथा असून त्यातून गृहिणींचा दैनंदिन त्याग आणि आपल्या परिवाराच्या भविष्याला आकार देण्यासाठी त्या शांतपणे करत असलेली मेहनत पाहायला मिळेल. राजश्री ठाकूर साकारत असलेली कानपूरमधील ४२ वर्षीय गृहिणी अवनी त्रिवेदीची ही कथा असून यातून आपल्या परिवाराच्या मोठे घर घेण्याच्या स्वप्नामध्ये सक्रियपणे योगदान देण्यासाठीच्या तिच्या असाधारण प्रवासावर ही मालिका प्रकाश टाकेल. ही मालिका एक शक्तिशाली संदेश देते: जो घर संभाल सकती है, वो घर चला भी सकती है और बना भी सकती है. मोठे घर घेण्याच्या आपल्या परिवाराच्या स्वप्नाला समर्थन देण्यासाठी अवनीने निर्धार केला असून त्यासाठी आपल्या एका जुन्या कलेला जोपासण्याचा निर्णय ती घेते आणि या मोठ्या जगामध्ये पाऊल ठेवते. नवीन प्रयत्नामध्ये काय तिचा परिवार तिच्यामागे खंबीरपणे उभा राहील?



आपल्या भूमिकेबद्दल राजश्री सांगत आहे -

१. १५ वर्षांनंतर झी टीव्हीसोबत बस इतना सा ख्वाब मधून पुनरागमन करत आहेस. परत येताना कसं वाटतंय आणि या प्रोजेक्टकडे तू कशी आकृष्ट झालीस?

१५ वर्षांच्या दीर्घ काळानंतर झी टीव्हीवर पुन्हा येताना खूप छान वाटतंय. जणू मोठ्या सुट्टीनंतर मी घरी परत येत आहे. एवढ्या महत्त्वाच्या मालिकेसाठी त्यांनी माझी निवड केली याबद्दल मी धन्य आहे. भावस्पर्शी आणि सगळ्यांना आपलीशी वाटेल अशा या कथेने मला बस इतना सा ख्वाबकडे खेचून घेतले.

# सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत शूर आणि सदाचरणी राजा कृष्णदेवरायाच्या भूमिकेत दिसणार अभिनेता आदित्य रेडिज

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ४ :



सोनी सबवरील बहुप्रतीक्षित मालिका तेनाली रामा १६ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता सुरू होत आहे. या मालिकेत महान राजा कृष्णदेवरायाची व्यक्तिरेखा साकारण्यासाठी आदित्य रेडिज या प्रतिभावान अभिनेत्याला घेण्यात आले आहे. अभिनयातील बारकावे जाणणारा आणि पडद्यावर आपली ठसठशीत उपस्थिती नोंदवणारा आदित्य रेडिज यावेळी भारताच्या इतिहासातील एका अत्यंत लोकप्रिय आणि पराक्रमी राजाची भूमिका करणार आहे आणि आपली मोहकता या भूमिकेला आणि मालिकेला बहाल करणार आहे.

राजा कृष्णदेवराय हा भारताच्या इतिहासातील एक महान शासक म्हटला जातो. आपल्या विजयनगर सम्राज्याचे सर्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी हा निडर आणि न्यायनिष्ठ राजा निरंतर प्रयत्नशील राहिला. सचोटी, नैतिकता ही मूल्ये जपणाऱ्या या राजाच्या दरबारी अनेक प्रबुद्ध लोक होते, ज्यामध्ये अष्टदिग्गजांचा समावेश आहे. अष्टदिग्गज हे आठ पंडित आणि सल्लागार होते, ज्यापैकी एक होता तेनाली रामा. आपल्या प्रजेविषयीची आणि त्यांना न्याय मिळावा याबाबतची त्याची निष्ठा अत्यंत दृढ होती. त्याच्या या गुणांमुळे इतिहासात त्याचे अनन्य स्थान आहे आणि पडद्यावरील मालिकेतही ही भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

कृष्णदेवराय राजाचा एक आकर्षक



# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरची त्रिसूत्री

## रुग्ण केंद्रित उत्कृष्ट काळजी, सहानुभूती, टीमवर्क

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

**दैनिक प्रार्थनेतून जपली जाते समर्पणाची परंपरा**

वानाडोंगरी येथे १०२० खाटांच्या क्षमतेसह अद्ययावत मल्टी सुपर स्पेशालिटी दर्जाची सुविधा असलेल्या शालिनीतेताई मेघे रुग्णालय आणि संशोधन केंद्राशी संलग्न दत्ता मेघे मेडिकल कॉलजने दीर्घकाळच्या परंपरेत दैनिक प्रार्थनांचा समावेश करत रुग्णांविषयी असलेले समर्पण, सेवा आणि सहवेदना जपली आहे. नर्सिंग स्टाफ सदस्यांसह रुग्णालयातील प्रत्येक कर्मचारी आपल्या शिफ्टची सुरुवात प्रार्थनेने करतात. रुग्णालयाने जपलेली ही प्रथा संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात अनेक वर्षांपासून मुळ धरून आहे. त्यामुळे रुग्णांची काळजी घेणाऱ्यांमध्ये आत्मिक समाधान आणि स्थिरतेचा क्षण प्रदान करते. शिफ्ट सुरू होण्यापूर्वी नर्सिंग टीम दररोज प्रार्थनेसाठी एकत्र जमतात. यात दिवसाच्या आव्हानांना तोंड देताना रुग्ण सेवेसाठी सामर्थ्य, स्थिरता, करुणा, आणि समर्पणाचे मार्गदर्शन मिळावे, अशी प्रार्थना केली जाते. हा छोटासा पण अर्थपूर्ण सोहळा रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष वेधून घेण्यास मदत करतो. रुग्ण सेवेशी निगडीत कोणतेही काम करता असताना या प्रार्थनेतून महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार करण्यासाठी ठाम निष्ठा आणि निर्धार निर्माण करण्याचे आत्मिक समधान मिळते. आध्यात्मिक महत्त्वाशिवाय ही प्रथा रुग्णांची काळजी आणि त्यांच्या कल्याणासाठी एकत्रित कर्तव्यनिष्ठा आणखी मजबूत करते. सहानुभूती, टीमवर्क आणि समग्र काळजी ही त्रिसुत्री शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंचरच्या रुग्णसेवेची मूलतत्वे आहेत. त्यामुळे प्रार्थनेचा हा सोहळा याचे तंतोतंत प्रतीक आहे. त्यामुळे रुग्णालयात सेवा देणारा नर्सिंग स्टाफ समर्पणाच्या उद्देशाशी जोडला जातो. सोबत त्यांच्यात रुग्णांना दर्जेदर उपचार आणि काळजी प्रदान करण्याची क्षमता वाढवते. या प्रथेमुळे समविचार आणि उत्साह यांचे एक बंधन निर्माण होते, ज्यामुळे टीमचे मनोबलात वाढविण्यास मदत होते. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरने जपलेल्या या परंपरेचा प्रभाव अधोरेखित करताना संस्थेचे संचालक डॉ. अनुप मारार म्हणाले,

# आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सच्या मोबाइल ॲप आयप्रू एज

## ९८.१% इन्शुरन्स एजंटना दिले एकाच दिवशी कमिशन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ४ :



आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सने सल्लागारांसाठी खास तयार केलेला आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या सल्लागारांच्या उत्पादकतेत मध्ये ३७% वाढीचा अनुभव आला. ज्यामुळे त्यांच्या कमाईतही वाढ झाली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या ९८.१% एजंटना एकाच दिवशी त्यांचे कमिशन प्राप्त झाले. आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्स ही पहिली जीवन विमा कंपनी आहे, जी निवडक वितरकांना एकाच दिवशी कमिशन देते. कंपनीकडे २ लाखांहून अधिक इन्शुरन्स सल्लागारांचे भक्कम जाळे आहे. कंपनीचे ६१% प्रमुख सल्लागार आता ॲपचा सक्रियपणे वापर करत आहेत. ज्यामुळे त्यांना व्यवसाय वाढवण्यास मदत मिळते. हे मोबाइल ॲप एजंटसाठी एक कार्यालयासारखे कार्य करणारे टूल आहे. जे त्यांना नवीन व्यवसायाच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. यात प्रत्येक कामासाठी इन्शुरन्स एजंटना प्रशासकीय कार्याच्या वेळखाऊ कामात गुंतण्याची गरज नाही. आयप्रू एज ॲप रिअल-टाइम्के. वाय. सी. प्रमाणीकरण सुलभ करते आणि ओसीआर तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना कागदपत्रांरहित खरेदीचा अनुभव मिळतो. हे ॲप लहान शहरे आणि गाव खेड्यांमध्ये विखुरलेल्या गुंतवणूक सल्लागारांसाठी उपयुक्त आहे. आपल्या एजन्सी चॅनेलकडून प्राप्त झालेल्या रिटेल वेटेड प्रिमियममध्ये ४९% ची वार्षिक वाढ नोंदवली, जी ॲपद्वारे दिलेल्या सुविधेमुळे शक्य झाली. याविषयी आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सच्या विपणन विभागाचे प्रमुख (प्रॉपायटरी चॅनेल) श्री. शोबी सॅम म्हणाले, आमचा आयप्रू एज मोबाइल ॲप इन्शुरन्स एजंटना व्यवसाय वाढवण्यास सक्षम करत आहे. ३७% ची उत्पादकता वाढ याचेच एक उदाहरण आहे. त्याचबरोबर आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या ९८.१% सल्लागारांना एकाच दिवशी कमिशन मिळाले. या उपक्रमांमुळे आम्हाला देशातील सर्वात सल्लागार-मैत्रीपूर्ण जीवन विमा कंपनी बनण्यास मदत झाली आहे.

आम्ही बदलत्या तंत्रज्ञानाचे पर्याय राबवले आहेत. ज्यामुळे बचत व्यवसाय क्षेत्रातील ५०% पॉलिसी एकाच दिवशी इश्यू केल्या गेल्या, असेही ते पुढे म्हणाले. आयप्रू एज ॲप सल्लागारांना प्रशासकीय कामांपासून मुक्त ठेवून नवीन व्यवसाय विकासावर लक्ष केंद्रित करण्यास सक्षम करते. या ॲपच्या मदतीने सल्लागार नवीन व्यवसायासाठी लॉग इन करू शकतात. आम्ही सल्लागारांना नवीन व्यवसायाच्या संधी, मागणी निर्माण करणे यासारख्या सेवा देखील प्रदान करतो. हे सल्लागारांना त्यांच्या ग्राहकांची प्रभावीपणे सेवा देण्यास मदत करते. हा मोबाइल ॲप आमच्या सल्लागारांना त्यांच्या व्यवसायाची आणि कमाईची तपशीलवार माहितीही देते.

# हिवाळ्यात शरीर उबदार ठेवणाऱ्या पदार्थांचा करा आहारात समावेश

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :



**स्वाती अवस्थी,**
मुख्य आहारतज्ज्ञ,
वोक्हार्ट हॉस्पिटल्स

हिवाळा म्हटले, की ओठ फाटणे, त्वचेवर कोरडेपणा, पायातील टाचेला पडलेल्या भेगा, असे चित्र समोर येते. या दिवसांत सकाळी रजाई, दुलई सारखे उबदार अंथरूण सोडण्याची इच्छा होत नाही. त्यामुळे हिवाळ्यात घरी आराम करत असतानाही अनेकदा फ्लू किंवा सर्दी सारख्या लक्षणांचा सामना करावा लागतो. तसे पाहिले तर हिवाळा हा गरम अन्न पदार्थ, हेल्दी फूड आणि गरम कपड्यांचा काळ आहे. या हंगामात मानवी शरीराची चयापचय आणि उर्जा पातळी बदलते. आहार बदलतो आणि हिवाळ्यात उबदार वाटण्यासाठी अधिक खाण्याची इच्छा निर्माण होते. या थंड महिन्यांत शरीराला आजाराचा सामना करण्यासाठी अतिरिक्त संरक्षणाची आवश्यकता असते. त्यामुळे हिवाळ्यात आतून उबदार ठेवणाऱ्या आहाराची शरीराला गरज असते.

आपल्या शरीराला आवश्यक पोषक घटकांकडे लक्ष देण्यासाठी हिवाळा हा अत्यंत योग्य ऋतू आहे. या दिवसांत आपल्याला मजबूत रोगप्रतिकारक प्रणाली विकसित करता येते. जी आपल्याला पुढील ऋतूंचा सामना करण्यासाठी मदत करते. हिवाळ्यात वातावरणात गारवा असल्याने या दिवसांत खोकला आणि सर्दी सहज होत असते. आणि आपण या हंगामात फळांचे आणि भाज्यांचे भरपूर सेवन करू शकतो. हिवाळ्यात काही असे सुपरफूड्स आहेत जे केवळ आरोग्यदायीच नाहीत, तर चवदार आणि शरीर आतून उबदार ठेवण्यासोबतच शरीराला आवश्यक पोषण घटक पुरविण्यास मदत करतात.

१. बाजरा गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्राच्या आहाराचा महत्त्वाचा घटक असलेले बाजरा हे गहू किंवा तांदळापेक्षा कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले धान्य आहे. यामध्ये मॅग्नेशियम, हृदयासाठी उत्तम कोलेस्ट्रॉल नियंत्रित करणारा आणि शरीराला उपयुक्त असलेले धान्य आहे. बाजरा ग्लूटेन फ्री असतो. यात लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम, झिंक आणि तांबे सारखी खनिजे पदार्थ असतात. बाजरा खिचडी, कढी आणि बाजरा रोटले हिवाळ्यातील आवडते पदार्थ आहेत.

२. रताळी चवदार असलेल्या रताळ्यांमध्ये इतर प्रकारच्या कंदमुळापेक्षा दुप्पट फायबर्स असतात. यामध्ये व्हिटॅमिन ए, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन बी ची महत्त्वाची पोषणतत्त्वे असतात. ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवून मळमळ कमी करण्यास मदत करतात. हिवाळ्यात शरीर उबदार राहण्यासाठी रताळे भाजून, बेक करून किंवा इतर कोणत्याही प्रकारे खाल्ले जाऊ शकतात.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** व्यवसायात सरकार सत्तेचे समर्थक बनू शकते. लोकप्रियतेचा आलेख उंचावेल. पत आणि सन्मान वाढेल. तुमच्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वजण प्रभावित होतील. महत्त्वाचे प्रस्ताव प्राप्त होतील.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी खूप व्यस्त राहिल्यामुळे शारीरिक आणि मानसिक थकवा जाणवेल. परिस्थितीनुसार वागावे. तयारीसह पुढे जा. सल्ले आणि सूचनांकडे लक्ष द्या.

**मिथुन :** कामाच्या ठिकाणी अशी काही घटना घडू शकते ज्यामुळे वर्चस्व वाढेल. कोर्टाच्या कामात यश मिळेल. व्यवसायात प्रगती होईल. महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण करा.

**कर्क :** महत्त्वाच्या कामाची जबाबदारी इतरांवर देऊ नका. नाती गोड होतील. प्रियजनांसाठी त्याग आणि त्यागाची भावना असेल. कामाच्या चर्चेत सावध राहाल. व्यवहारात स्पष्टता वाढेल.

**सिंह :** भाग्यवान वेळेचा फायदा घ्याल. श्रद्धा आणि अध्यात्म वाढेल. धार्मिक कार्यात रुची राहील. लांबचा प्रवास करावा लागू शकतो. धोरणात्मक नियमांकडे दुर्लक्ष करू नका.

**कन्या :** आर्थिक लाभाच्या संधी वाढतील. जबाबदार व्यक्ती आणि वरिष्ठांशी बैठक होईल. परोपकार आणि धर्मात पुढे राहाल. गुंतवणुकीत रस घ्या. कुटुंबातील सदस्यांचे सहकार्य मिळेल.

**तुळ :** धैर्य आणि संपकार्चा फायदा घ्याल. व्यवस्थापन व प्रशासनाची कामे होतील. विस्ताराच्या कामात यश मिळेल. कामाच्या संधी वाढतील. यशाची टक्केवारी जास्त असेल. विरोधक शांत राहतील.

**वृश्चिक :** लोकांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी राहू शकतो. आर्थिक आघाडीवर अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी कराल. करिअर व्यवसायात वाढ होईल. इच्छित परिणाम साध्य होतील.

**धनु :** आध्यात्मिक कायार्तून आर्थिक लाभ होईल. राजकारणाशी संबंधित लोक चांगले काम करतील. बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळतील. वैयक्तिक बाबींमध्ये शुभता राहील.

**मकर :** मालमत्तेच्या वादात न्यायालयात जाण्याची परिस्थिती येऊ शकते. महत्त्वाच्या कामाची जबाबदारी इतरांवर देऊ नका. नाती गोड होतील. प्रियजनांसाठी त्याग आणि त्यागाची भावना असेल.

**कुंभ :** नोकरीत तुमच्या कामाचे कौतुक होईल. तुमच्या प्रिय व्यक्तीकडून तुम्हाला चांगला संदेश मिळेल. बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत लोकांना काही नवीन जबाबदारी मिळू शकते.

**मीन :** कामाच्या चर्चेत सावध राहाल. व्यवहारात स्पष्टता वाढेल. परोपकार आणि धर्मात पुढे राहाल. व्यवस्थापनाच्या कामात सक्रिय भूमिका बजावाल. धर्म आणि श्रद्धेने सर्व काही शक्य होईल.


# आज का अंदाज

## गुरूवार ५ डिसेंबर २०२४

## पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| १२० | ११४ | ४७८ | १२७ | २३८ | २६६ | १६० | १८९ |
| ३०० | २७७ | ५५८ | २८० | ५८० | ७७० | ३५९ | ३७८ |
| २२९ | ३३० | ३६० | ५६९ | ३३७ | ५९० | २७८ | २२४ |
| ३१ | ६१ | ९२ | ०२ | ३० | ४० | ७१ | ८१ |
| ३५ | ६५ | ९७ | ०७ | ३६ | ४६ | ७५ | ८५ |
| ३८ | ६८ | ९४ | ०५ | ३२ | ४२ | ७९ | ८९ |


**५ डिसेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६० | ९० |
| २३ | ५३ | ६७ | ९७ |
| २४ | ५४ | ६८ | ९८ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल. १०० टक्के खात्रीशीर . फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# शब्दकोडे क्रमांक १९८८



**आडवे शब्द :-**
१) धान्य वगैरे
४) सर्वत्र
८) दक्षतेचा शब्द
११) वध करणे
१३) बरोबर, ठिक
१५) विळाखा
१६) किंमत
१८) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
१९) नगर
२१) नाला
२२) पाणी उकळतानाचा आवाज
२५) चिंचेची चव
२७) कार्य
२८) नवाकोरा
३१) टीका करणारा
३४) असुर
३५) तृण
३७) अलमारी
३९) प्रवासीगाडी
४०अ) धातूचा धागा
४१) जिवंत असे तोवर
४४) एक चर्मवाद्य
४५) केर
४६) पायापासून डोक्यापर्यंत
४८) अनुत्तीर्ण
५०) मधुमक्षिका
५२) कडक (केस)
५४) आनंद
५५) गाय
५६) मैत्रीण
५७) तूप,
५८) ढग
६०) कारस्थान
६२) चौक
६४) अपशकुन
६६) कावळा
६७) तास
६८) बारीक दगड
६९) दुलई
७०) प्रमाणपत्र
७१) सहाय्यक
७२) स्वच्छ
७३) रेशीमाचे जाडसर कापड
७५) करणारा, जबाबदार
७७) मावा
७९) वाळा गवताचे मूळ
८०) कबूतर
८१) जमीन
८२) आश्रय, थारा

**उभे शब्द :-**
१) दावा सांगणारा,
२) गाई-म्हशीचे घर
३) चटोर, फाजील
४) पावसाची झड
५) गणपती
६) मकबरा
७) रांजण
८) तात्पर्यार्थ
९) लहान (भाऊ)
१०) साहित्यातील नऊ भावना
१२) सामान
१४) मोठे डोळे,
१७) जुगाराचा एक प्रकार
२०) उपस्थिती
२३) खरकट्याची प्रचंड रास
२४) पुष्कळ
२६) बांगला देशाचे चलन
२८) कौशल्य
२९) मनाचा ओढा
३०) बिना वासाचे पांढरे फूल
३२) चिंता, फिकीर
३३) दु:ख
३६) लक्ष, अवधान
३८) मागोमाग
४०) रस्ता
४१) विश्रांती
४२) नवरदेवाची आई
४३) मृत्यू नसलेला
४५) सत्वांश
४६) प्रार्थना, उपासना
४७) स्तुती करण्याचे जोगे
४८) आवाज, छंद
४९) स्वयंपाकाचे शास्त्र
५१) मनाने घेतलेली भीती
५४) हर्ष
५९) रसाळ
६१) डोंगराचा उभा कडा
६२) नावात केलेला बदल
६३) एकटा, शेणपाण्याचे शिंपण
६५) फळाचे साल
६६) खराब
६७) कलावंत
६८) अफूचे बी
७२) लहान
७४) मित्र
७६) गव्हाचे जाडसर पीठ
७८) वाहणारी हवा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# पाचशेच्या नकली नोटा जप्त

## एक लाखाच्या बदल्यात देणार होते पाच लाख

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ४ :** चलनी नोटांच्या बदल्यात पाचशे रुपयांच्या नकली नोटा देणारे रॅकेटचा एमआयडीसी पोलिसांनी पर्दाफाश केला. बाळापूर तालुक्यातील लोटनापूर येथील एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून असली आणि नकली अशा लाखो रुपयांच्या नोटा जप्त केल्या आहेत. ही कारवाई मंगळवारी सायंकाळी सात वाजताच्या दरम्यान शिवणी येथे करण्यात आली.



नकली नोटांचा गोरखधंदा करणाऱ्या आरोपींमध्ये वाद सुरू असल्याची माहिती एमआयडीसी पोलिसांना मिळाली. माहितीवरून पोलिसांनी शिवणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक गाठला. त्यावेळी तेथे अमरावती येथील दोघे-तिघे आणि बाळापूर तालुक्यातील लोटनापूर येथील अब्दुल अकील अब्दुल अनीस (३०) दिसून आला. यावेळी अमरावती येथील पैसे घेणारे आणि अब्दुल अकील यांच्यात तू तू-मै मै सुरु होती. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे पाचशे रुपयांच्या बनावट नोटांचे बंडल दिसून आले.

# संततत्व ही न बदलणारी प्रक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ४ :** माणसाच्या जीवनात नेहमी बदल होत असतात. या बदलाच्या प्रक्रियेतून माणूस आपले जीवनयापन करत असतो. हे बदल कामाच्या निमित्ताने, आपल्या पदाच्या निमित्ताने, धनाच्या, वास्तव्य आदी बाबींच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्वरूपात वेगवेगळ्या परिस्थितीत कालपरत्वे होत असतात. सामान्य माणसाचे जीवन हे बदलांचे जीवन म्हटले जाते. मात्र, या पलीकडे संत तत्व हे कधीच बदलत नाही. संत हे निश्चल असतात. प्रभूप्राप्ती हे एकमेव ध्येय, उद्देश मनी बाळगून ते वाटचाल करत असतात. आपल्या या मार्गात ते अढळ होऊन भगवंताची अनुकंपा प्राप्त करत असतात. त्यामुळे संतांची कास व त्यांचा अनुग्रह ही शाश्वत सुखाची अनुभूती असल्याचा हितोपदेश संजय महाराज पाचपोर यांनी केला. ते गायगाव रस्त्यावरील बारा खोली परिसरातील श्रीराम कथा उत्सवात बोलत होते. तृतीय पुष्प गुंफताना संजय महाराज पाचपोर यांनी संताबाबत विवेचन केले. मोठी माणसं कधी बदलत नसतात. ही मोठी माणसे म्हणजे संत संप्रदाय होय. संततत्व बहाल करणारा वारकरी संप्रदाय प्रभूप्राप्तीसाठी जीवन जगण्याची एक प्रक्रिया होय. ज्या पंथात वा संप्रदायात देव नाही. तो पंथ निरर्थक आहे. सर्वांना सोबत घेऊन चालणारा व जगाचे कल्याण चिंतणारा वारकरी संप्रदाय हा थोर व सनातनी संप्रदाय असल्याचे संजय महाराज पाचपोर म्हणाले. कथेची पूर्णाहुती डिसेंबर रोजी होत असून सकाळी ते सायंकाळी वाजेपर्यंत रक्तदान शिबिर व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांनी यात सहभागी होण्याचे आवाहन यजमान डॉ. मनोज अग्रवाल यांनी केले. सत्र प्रारंभ प्रसंगी संजय महाराज पाचपोर यांचे अशोक अग्रवाल, संजय अग्रवाल, मुन्ना भुसावलवाले, मीना अग्रवाल, पंकज अग्रवाल, अनुप अग्रवाल, प्रकाश टेकाडे, जितेंद्र अग्रवाल, आदींनी स्वागत केले. ज्ञानेश्वर महाराज वाघ, पंढरी महाराज दिघोळे, भानुदास महाराज यांचे स्वागत डॉ. मनोज अग्रवाल यांनी केले. या कथेचा महिला पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन बद्रीलाल अग्रवाल, हरीकिसन अग्रवाल, लक्ष्मीकांत अग्रवाल, निखिल अग्रवाल, यश अग्रवाल आदींनी केले आहे.



आई कदापि बदलता येऊ शकत नाही माणसाला मित्र, धन, स्थावर मालमत्ता आदी भौतिक बाबी बदलता येऊ शकतात. अगदी पत्नीही बदलता येऊ शकते. मात्र या सृष्टीतलावर एक मात्र अशी आई आहे जी कदापि बदलता येऊ शकत नाही, असेही महाराज म्हणाले. कथा उत्सवात श्री रामचंद्राचा जन्मोत्सव मोठ्या भक्ती भावात साजरा करण्यात आला. कथेच्या अनुषंगाने आयोजित या जन्मोत्सवात रामललाचा सुंदर देखावा सजवण्यात आला होता. राम जन्म होताच कथा उत्सवात महिला पुरुष भाविकांनी जल्लोष साजरा केला.

# अंचरवाडीतील शेतात आढळले कोरियन भाषेमधील हवामान यंत्र

■ **महासागर प्रतिनिधी,**
**बुलढाणा, दि. ४ :** चिखली तालुक्यातील अंचरवाडी येथे शेतात आढळलेले कोरियन भाषेतील हवामान यंत्र हे प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांचे असून हवामानाच्या अभ्यासाकरता नियमितपणे परीक्षणासाठी सोडण्यात आले होते. सदर यंत्रामुळे कोणत्याही प्रकारची वित्त व जीवितहानी झाली नसल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सोमवार, दि. २ डिसेंबर रोजी अंचरवाडी ता. चिखली येथील व्दारकाबाई सीताराम परिहार व संजय सीताराम परिहार यांच्या शेतामध्ये कोरियन भाषेमध्ये लिहिलेला फुगा व दोरा अशा प्रकारचे हवामान यंत्र आढळून आले होते. हे यंत्र सापडल्यामुळे अंचरवाडीतील ग्रामस्थांमध्ये एकच खळबळ उडाली. या यंत्राबाबत अनेक तर्क-वितर्कांनाउधाण आले होते. ग्रामस्थांमध्ये या विषयी चर्चांना उधाण आले होते. या घटनेचा पंचनामा तहसीलदार चिखली यांनी केला असून हे यंत्र प्रादेशिक हवामान केंद्र नागपूर यांचे असल्याचे निदर्शनास आले. या यंत्रामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, असा अहवाल तहसीलदार चिखली यांनी दिला आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SHREYAS SHRIKRISHNA PATIL.** NOW MY NEW NAME IS **SHREYES SHRIKRUSHNA PATIL.**
**ADD :** JOGDI FAIL, SHEGAON, BULDHANA -444203

MY OLD NAME WAS **RIZWANA BEGUM ABDUL RASHID.** NOW MY NEW NAME IS **RIZWANA ATIQUE ANSARI.**
**ADD :** 566, NEAR PATEL LODGE, KABRASTAN ROAD, NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **RITESH ASHOKKUMAR KRIPLANI.** NOW MY NEW NAME IS **RITESH ASHOK KRIPLANI.**
**ADD :** BLOCK NO 11 NEAR MAHATMA GANDHI SCHOOL ROAD JARIPATKA NAGPUR 440014

# रास्तभाव दुकानात धान्याचा अवैध साठा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पातूर , दि. ४ :** चोंढी येथील रास्तभाव दुकानात ८८ अवैध धान्य साठा आढळून आल्यानंतर मंगळवारी संबंधित दुकानदारावर चान्नी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मंगलसिंग सेवालाल जैन (रा. चोंढी) असे एफआयआरमध्ये आरोपीचे नाव आहे. सोमवारी यात दुकानाची पातूर तहसील कार्यालयातील निरीक्षण अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रथमदर्शनी तपासणीतून हा प्रकार उजेडात आला होता. त्यानंतर अधिकाऱ्यांनी लाभार्थींचे जबाबही नोंदवले. गरिबांसाठी असलेल्या धान्याचा काळा बाजार करणाऱ्या सर्वच रेशन माफियांच्या मुसक्या आवळण्याची मागणी या निमित्ताने ग्रामस्थांकडून होत आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या नागरिकांना शासनाकडून सवलतीच्या दरात धान्याचे वितरण करण्यात येते. विविध घटकांतील लाभार्थींना शिधापत्रिकांचे वाटप करण्यात येते. सोमवारी विभागीय आयुक्तांनी कार्यवाहीचा आदेश दिला होता. त्यामुळे पातूर तहसील कार्यालयातील निरीक्षण अधिकारी शीतल मोरखडे यांनी चोंढी येथील जैन यांच्या रास्तभाव धान्य दुकानाची तपासणी केली होती. अखेर याप्रकरणी मोरखडे यांनी चान्नी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी आरोपीविरोधात अत्यावश्यक वस्तू अधिनियम चे कलम ३,७, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पातूर येथील अधिकाऱ्यांनी चोंढी येथील दुकानाची पाहणी केली. यात ६७ क्विंटल तांदुळ, ज्वारी-१५क्विंटल ५० किलो व ६७६ क्विंटल गहू असा अतिरिक्त धान्यसाठा अवैधरीत्या आढळून आल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे. या मुद्देमालाची किंमत १५ लाख रुपये आहे.



### दीड लाखांचा मुद्देमाल

शासनाची फसवणूक केल्याची नोंद एफआयआरमध्ये काही महत्त्वाच्या बाबी नोंदण्यात आल्या आहेत. धान्यसाठा प्रथमदर्शनी अतिरिक्त स्वरुपात आढळून आला. त्या अनुषंगाने संबंधित दुकानदाराचे बयान नोंदवण्यात आले. त्यानुसार लाभार्थींचे पॉज मशीनवर अंगठे घेऊन धान्याचे वितरण दिल्याबाबत शासनाची फसवणूक केली आहे. लाभार्थींकडून धान्य खरेदी करून काळा बाजार करत असल्याचेही एफआयआरमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉरक्सग (पुरुष व महिला) स्पर्धेकरीता विद्यापीठाचे संघ घोषित

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. ४:** गुरू काशी विद्यापीठ, भटिंडा (पंजाब) येथे होणा-याअखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉरक्सग स्पर्धेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे महिला व पुरुष संघ घोषित करण्यात आले आहे. **पुरुष संघ**पुरुष संघाच्या स्पर्धा २६ डिसेंबर, २०२४ ते ०२ जानेवारी, २०२५ दरम्यान होणार असून चमूमध्ये श्री एस.एस.जी. आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, बोरगांव मंजूचा प्रशिक भालेराव, शिवाजी गेडाम, अमित ढबाले, विशाल नुपे, गौरव चव्हाण, मनिकुमार सिंह व शंतनु खाबळे, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीरचा वैभव जरवाल, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोलाचा मोहंमद राहील, अकोला विधी महाविद्यालय, अकोलाचा केतन सरोदे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा हर्ष संवाल, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शिटाकळीचा क्रिष्णा लोखंडे व आबासाहेब पारवेकर महाविद्यालय, यवतमाळचा ऋषिकेश भस्मे यांचा समावेश आहे.

**महिला संघ**महिला संघाच्या स्पर्धा १८ ते २४ डिसेंबर, २०२४ दरम्यान होणार असून चमूमध्ये महात्मा फुले कला व विज्ञान महाविद्यालय, पातुरची कु. रुणाली डोंगरे, श्रीमती आर.डी.जी. महिला महाविद्यालय, अकोलाची कु. घनिशा ढेवा, बी.एस. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगांव काळेची कु. जिज्ञासा जाधव, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची कु. मुमुक्षा भालकर व कु. पुनम कैथवास, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवची कु. जयश्री शेटऐ, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. गायत्री मेटे, कु. भक्ती ठाकरे, कु. विधी रावल व कु. प्रियंका खंडारे, मांगीलालजी शर्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. सिमरन गवई आणि श्री एस.एस.जी. आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, बोरगांव मंजूची कु. गौरी मुरुमकर हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. दोन्ही संघाचा प्रशिक्षण वर्ग जिल्हा क्रीडा कार्यालय, अकोला येथे होणार असून पुरुष संघाचा प्रशिक्षण वर्ग १३ ते २२ डिसेंबर, तर महिला संघाचा प्रशिक्षण वर्ग ०५ ते १४ डिसेंबर दरम्यान होणार आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे.

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works in two envelops system. These tenders can be Submitted by the registered contractor of NMC. The terms and conditions of tenders are available at the Office of Executive Engineer Zone 10 Office, NMC. The sale and purchase of tenders can be done through offline.

| Name of Work | BOQ Cost |
|---|---|
| Construction of Cement Concrete Road Near Hanuman Mandir Gayatry Nagar Zingabai Takli in Pra. No. 11 | 832813/- |
| Repairing & Jacketing of Nallah Wall Near Bharat Complex, Bharat Petrol Pump Vishwas Nagar in Pra. No. 01 | 408271/- |

**Note – 1.**Cost of Blank Tender form (Rs. 590/-), Time Limit : 4 Months, EMD : Rs. 9000/-, Rs. 5000/- Class of Contractor : I to VII, VIII. **2.**Sale Start / Submission Start Date : 03.12.2024. **3.**Submission End Date / Sales end upto at 5.00 p.m : 17.12.2024. **4.** Opening Date : 18.12.2024 at 5.00 p.m. **5.** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document. **6.**Tenderer shall have to submit Cost of Blank Tender form each Rs.590/- at the Office of Executive Engineer Zone 10 and should be submit the copy of these in Technical Bid Document Envelope.

**Advt No. 740 PR Date 04.12.2024**
**Sub-Divisional Engineer Zone 10**
**N.M.C.,Nagpur**
P/N/24/740

**निविदा सूचना क्र २०/२०२४-२५ प्रथम वेळ**

निविदा सूचना क्र.२०/२०२४-२५ प्रथम वेळ शिक्षण विभाग प्राथमिक समग्र शिक्षा बांधकाम शाखा जिल्हा परिषद नागपुरच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. या मध्ये अ.क्र. ०१ कामाचा समावेश आहे.


| अ.क्र. | तपशिल | निविदा विक्रिचा दिनांक | निविदा स्विकृती दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | ०५. जि.प.प्राथमिक शाळा रेबराल ता. मौदा येथे वर्गखोली दुरुस्ती करणे. | दिनांक ०५/१२/२०२४ ते | दि.१९/१२/२०२४ सायं-३.०० वाजेपर्यंत |

निविदेतील अटी व शर्ती शिक्षण विभाग प्राथमिक समग्र शिक्षा बांधकाम शाखा जिल्हा परिषद नागपुरच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. सदर कामाकरीता निविदा फार्मची किंमत व कामाच्या किमतीच्या १ टक्के अनामत रक्कम (समग्र शिक्षा अभियान जि.प. नागपुर) यांचे नावे डी. डी. स्वरुपात सादर करावी. निविदा दिनांक -२०/१२/२०२४ ला दु.०३.०० नंतर उघडण्यात येईल. यांची नोंद घ्यावी.

क्र.जिपना/शि/प्राथ/नि.सु./११८८९/२०२४

कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा
जिल्हा परिषद नागपूर

# नकुलला नोबेल विजेत्यांचे मार्गदर्शन
## बोस्टनच्या एमआयटी शिक्षणासाठी निवड



■ **महासागर प्रतिनिधी,**
**अकोला, दि. ४ :** जेईई परीक्षेतील टॉपर नकुल रांदड जगातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्था मानल्या गेलेल्या मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी एमआयटी या संस्थेत मास्टर्सची पदवी प्राप्त करण्यासाठी दाखल झाला असून, तेथेच त्याला नुकताच अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळालेले शास्त्रज्ञ सायमन जॉन्सन यांचा सहवास लाभणार असून त्यांच्यासोबत काम करण्याचीही संधी मिळाली आहे. नकुल हा अकोल्यातील प्रख्यात दंतरोग तज्ज्ञ तथा मुख शल्य चिकित्सक डॉ. राजेश रांदड आणि पॅथॉलॉजिस्ट डॉ. निर्मला रांदड यांचा मुलगा आहे.

ऑक्टोबर मध्ये सायमन जॉन्सन यांच्यासह डॅरॉन एसेमोग्लू आणि जेम्स ए. रॉबिन्सन यांना राष्ट्रांमधील समृद्धीतील तुलनात्मक अभ्यासासाठी अर्थशास्त्रातील नोबेल मेमोरियल पारितोषिक प्रदान करण्यात आले आहे. जॉन्सन हे सेंटर फॉर सोशल अँड इकॉनॉमिक रिसर्च येथील आंतरराष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य आहेत. जागतिक कीर्तीच्या सायमन जॉन्सन यांचा सहवास नकुलला लाभला आहे. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे अमेरिकेच्या मॅसेच्युसेट्स राज्यातील एक खाजगी संशोधन विद्यापीठ आहे. या संस्थेत मास्टर्सची डिग्री प्राप्त करण्यासाठी नकुलला संधी मिळाली आहे. आयआयटी मुंबई येथे शिक्षण घेत असताना गेल्याच वर्षी नकुलच्या नेतृत्वातील चमूने एअरोस्पेस क्षेत्रात केलेल्या संशोधनासाठी भारत सरकारने त्यांना तब्बल वीस वर्षाच्या कालावधीसाठी पेटेन्ट बहाल केले आहे.

जेईई मेन्स, ड्व्हॉन्समध्ये आला होता अव्वल अकोल्यात शिक्षण घेत असताना दहावी आणि बारावीच्या परीक्षा नकुलने विशेष प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण केल्या. एवढेच नव्हे तर जेईई मेन आणि ॲडव्हान्सच्या परीक्षेतही त्याने विदर्भातून अव्वल येण्याचा बहुमान मिळवला आहे. त्या बळावर त्याने मुंबईच्या आयआयटी या नामवंत संस्थेमध्ये प्रवेश मिळविला आणि तेथेही विशेष प्राविण्यासह त्याने एअरोस्पेस शाखेत इंजिनिअरींगची पदवी प्राप्त केली.

**कार्यालय, कांद्री (कन्हान) नगर पंचायत**

कमांक/आस्था/न.प.कांद्री (कन्हान)/कावि-3564/2024 दिनांक 04/12/2024

या सुचनाद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते कि, खालील दर्शविल्यानुसार धर/प्लाट क, वर नाव दाखल करण्याकरिता अर्जदार संबंधित धराचे कागद पत्र तसेच तहसील कार्यालय नझुल कार्यालयाचे रेकॉर्ड अर्जासह सादर केलेले आहे. नगर नंचायत रेकॉर्ड नुसार धर/प्लाट क. वर खालिल दर्शविल्याप्रमाणे नावाची नोंद आहे. तरी कुणास नाव दाखल खारीज करणेविषयी आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रसिद्धी झाल्यापासुन 07 दिवसाचे आत कांद्री कन्हान नगर पंचायत कार्यालयातील कर विभाग येथे लेखी आक्षेप व सोबत संबंधित कराची कागद पत्रे सादर करावे अन्यथा नगर पंचायत रेकॉर्डमध्ये संबंधित घर कमांकावर नाव दाखल करण्यात येईल.

| अनु क. | मालमत्ता क. | प्र. क. | जुन्या स्थावर मालमत्ता धारकाचे नाव विकणारा | नविन स्थावर मालमत्ता धारकाचे नाव खरेदीदाराचे | फेरफार घेण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ | २७३/२/३+४+५ | ६ | पुनम सुरेश उके | रमेश गिरिराज खंडेलवाल | विक्री पत्र |
| २ | ३११/२ड/ई२प/४ | २ | सारंगधर केशवराव चौकसे/अशोककुमार केशवराव चौकसे | संदिप रामेश्वर काळबांडे | विक्री पत्र |
| ३ | ३११/२ड/२प/४ | २ | सारंगधर केशवराव चौकसे व इतर | शीतल संदीप काळबांडे | विक्री पत्र |
| ४ | २७३/१४,१६,२७ | ५ | पुनम सुरेश उके | आशिष रमेश खंडेलवाल | विक्री पत्र |
| ५ | २२३/१,२/१९+ २२ | ५ | विजय रतनशी पटेल | कुलदिप जागेश्वर यादव | विक्री पत्र |
| ६ | २१८/२/११ | ५ | उमेश रामसुमेर यादव | भिमराव विश्वनाथ डोंगरे | विक्री पत्र |
| ७ | २४०/३० | ६ | राजेश दोकवडी यादव | बसंत बंसीलाल अग्रवाल | विक्री पत्र |
| ८ | २४०/३० | ६ | बसंत बंसीलाल अग्रवाल | प्रविण बसंत अग्रवाल व इतर | मृ. दा.व वारसान प्रतिज्ञा पत्र |
| ९ | ४६/१,३/५अ/६अ | ४ | चॉदमल निहालचंद जैन नंदबाला चॉदमल जैन | राकेशकुमार चॉदमल जैन व इतर | मृ. दा.व वारसान प्रतिज्ञा पत्र |
| १० | ५७२/३७ | ५ | मंगल दौलत बावने | मीराबाई मंगल बावने व इतर | मृ. दा.व वारसान प्रतिज्ञा पत्र |
| ११ | २१८/२/१४ | ५ | उमेश रामसुमेर यादव | दादाराव शामराव वानखेडे | विक्री पत्र |
| २ | २७३/२/२२ | ६ | पुनम सुरेश उके | परमानंद गजानन शेंडे | विक्री पत्र |
| | २७३/२/१३ | ६ | पुनम सुरेश उके | रमेश गिरिराज खंडेलवाल | विक्री पत्र |
| १४ | २७३/२/१९,९ | ६ | पुनम सुरेश उके | आकाश रमेश खंडेलवाल | विक्री पत्र |
| १५ | ४६/२,४,५/७५अ | ४ | नंदबाला चॉदमल जैन | वर्षा मुरलीधर यादव | विक्री पत्र |
| १६ | ४६/१,३/६१ | ४ | अनिल रामफेर पाली | प्रेमसागर लालजी सिंग | विक्री पत्र |
| १७ | २४९/१/३१ | ६ | नितीन बाबुरावजी शेंदरे | जितेंद्र विश्वनाथ यादव | विक्री पत्र |
| १८ | २४१/१क/१२ | ६ | नरेन्द्र हिरालाल सोलंकि | सोनु मिथुन देशमुख | विक्री पत्र |
| १९ | २६३/६९ | ५ | रानेही निवास भारव्दाज | लाखी रामसनेही भारव्दाज व इतर | मृ. दा.व वारसान प्रतिज्ञा पत्र |
| २० | ४३/२/२१ | ४ | ताज अहमद अब्दुल रसिद खान | तलविंदरसिंग मुल्ले | विक्री पत्र |
| २१ | ४१७ | १ | तुकडु दशरथ मेश्राम | कृष्ण तुकडु मेश्राम व इतर | मृ. दा.व वारसान प्रतिज्ञा पत्र |
| २२ | २१९/४/४५ | ५ | शांताबई आनंदराव वानखेडे | मोहन आनंदराव वानखेडे | बक्षीस पत्र |
| २३ | ४६/४,५/७ब | ४ | राधेश्याम इंद्रासन सिंग | रीता राधेश्याम सिंग | मृ. दा.व वारसान प्रतिज्ञा पत्र |
| २४ | २६८/३५ | ५ | कृष्णाबाई जयचंद गुप्ता/मनोज जयचंद गुप्ता व इतर | मोहम्मद अली मोहम्मद अलीम | विक्री पत्र |
| २५ | ५६८/४० | ६ | भगवान जैराम वानखडे | बाळु भगवान वानखेडे | बक्षीस पत्र |
| २६ | ५६८/४० | ६ | भगवान जैराम वानखडे | महेन्द्र भगवान वानखेडे | बक्षीस पत्र |
| २७ | ३००/१२ | ५ | सचिन रामप्रताप पाल | रमेश रामकृष्णाजी टाकळखेडे | विक्री पत्र |
| २८ | ४३/१/५६ | ४ | मोहम्मद वसिम मोहम्मद अहमद व इतर | सुनिल सुरेश प्रजापती | विक्री पत्र |
| २९ | २७४/१/२४ | ५ | श्रावण मारोती कुंभलकर व इतर | दुर्गाबाई गेंदलाल नागपुरे | विक्री पत्र |
| ३० | २६३/२३ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | भोगिन्द्र रूदल मुखिया | विक्री पत्र |
| ३१ | २६३/२१ | ५ | उमेश रामसुमेर यादव व इतर | सबुजदेवी शत्रुघन राय | विक्री पत्र |

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत, कांद्री (कन्हान)


मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## गरोदरपणात जपा आरोग्य

**लाईफस्टाईल**


गरोदर तसंच प्रजननक्षम वयातल्या महिलांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. त्यांनी बटाटा वेफर्स खाणं टाळायला हवं, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. गरोदर महिलांनी वनस्पती तेलाचं प्रमाणही कमी करायला हवं. अशा पदार्थांच्या सेवनामुळे गरोदरपणात गुंतागुंत निर्माण होऊ शकते आणि गर्भातल्या बाळाच्या वाढीवरही परिणाम होऊ शकतो, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. बटाटा वेफर्स आणि वनस्पती तेलामध्ये ओमेगा ६ फॅट्स असतात. यातल्या लायनोलिक ॲसिडमुळे बरेच धोके उद्‌भवू शकतात. या घटकाच्या अतिसेवनामुळे विविध प्रकारचे दाह निर्माण होतात. तसंच हृदयविकाराचा धोकाही वाढतो, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. गरोदर महिलांनी पोषक आहार घेण्याची गरज वारंवार अधोरेखित करण्यात आली आहे. आमच्या संशोधनामुळे ही बाब पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विशिष्ट घटकांच्या सेवनाचे बाळाच्या वाढीवर विपरित परिणाम होऊ शकतात. म्हणूनच गरोदर महिलांनी संतुलित आहारावर भर द्यायला हवा, असं शास्त्रज्ञ सांगतात.



## अविवाहित पुरुष लवकर होतात वृद्ध!

नाते हे एखाद्या रबराप्रमाणे असते. दोन्हीकडून ताणले, तर ते तुटते आणि एका बाजूने ते सैल सोडले तर टिकते. आजकाल घटस्फोटाच्या प्रमाणातही खूप वाढ होताना दिसत आहे. आपण अविवाहित लोकांकडे पाहतो, तेव्हा अधिक आनंदी असतात आणि ते त्यांचे जीवन मुक्तपणे जगतात. ते स्वत:ची योग्यरित्या काळजी घेऊ शकतात; मात्र एका नवीन संशोधनात धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यात असे आढळून आले आहे, की अविवाहित पुरुष लवकर वृद्ध होतात, तर विवाहित पुरुषांची वृद्धत्वाची प्रक्रिया अविवाहितांपेक्षा कमी असते. सोप्या भाषेत, अविवाहित लोकांमध्ये वृद्धपणा लवकर जाणवतो, तर विवाहित पुरुष दीर्घकाळ तरुण राहतात.

अलीकडेच एका अभ्यासात असे दिसून आले आहे, की विवाहित पुरुषांचे वय अविवाहित पुरुषांपेक्षा हळू वाढते. हा अभ्यास 'इंटरनॅशनल सोशल वर्क जर्नल'मध्ये प्रकाशित झाला आहे. यामध्ये शास्त्रज्ञांनी वर्षे ४५ ते ८५ वर्षे वयोगटातील प्रौढांचे आरोग्य आणि जीवनमानाचा अभ्यास केला. लग्नाचा आरोग्यावर काय परिणाम होतो आणि विवाहित लोक यशस्वीरित्या वयात येतात, की नाही हे जाणून घेणे हा त्यांचा उद्देश होता. या संशोधनात शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य, सामाजिक जीवन आणि वयाबद्दलची स्वत:ची धारणा यासारख्या गोष्टी लक्षात घेऊन मूल्यमापन करण्यात आले. या संशोधनात असे आढळून आले, की विवाहित पुरुष त्यांच्या कधीही लग्न न केलेल्या मित्रांच्या तुलनेत अधिक तरुण दिसतात; मात्र ते आयुष्यभर विवाहित राहिले तरच हे घडते. त्यांचे लग्न तुटले किंवा त्यांच्या जोडीदाराचा मृत्यू



झाला तर त्याचा त्यांच्या वृद्धत्वाच्या प्रक्रियेवर नकारात्मक परिणाम होतो. त्याच वेळी, विवाहित स्त्रिया आणि अविवाहित महिला वृद्धत्वाच्या बाबतीत जवळजवळ समान होत्या. ज्या स्त्रिया विवाहित होत्या; परंतु नंतर घटस्फोटित किंवा विधवा झालेल्या त्यांच्या विवाहित आणि अविवाहित स्त्रियांपेक्षा अधिक दुःखी होत्या. शास्त्रज्ञांच्या मते, स्त्रिया एकटे राहण्यात आनंद मानतात, तर पुरुषांसाठी ते कठीण असते. दुसऱ्या एका अभ्यासात असे आढळून आले, की स्त्रिया एकट्या राहण्यात अधिक समाधानी असतात आणि त्यांना रोमँटिक संबंधांची कमी गरज असते. याशिवाय महिला त्यांच्या 'सेक्स लाईफ'बाबत अधिक समाधानी असतात. तज्ज्ञांचे असे मत आहे, की महिलांना त्यांच्या मित्रपरिवाराकडून अधिक पाठिंबा मिळतो. अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे, की विवाहित लोक एकटे राहणाऱ्या लोकांपेक्षा अधिक निरोगी असतात. 'नेचर ह्युमन बिहेवियर जर्नल'मधील आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे, की विवाहित लोकांपेक्षा अविवाहित लोकांना मानसिक समस्या अधिक असतात. हेदेखील समोर आले आहे, की विवाहित लोकांपेक्षा अविवाहित लोकांना नैराश्याने ग्रासण्याची शक्यता ७९ टक्के जास्त असते. हा धोका विधवा महिलांमध्ये ६४ टक्के आणि घटस्फोटित महिलांमध्ये ९९ टक्क्यांपर्यंत वाढतो.

## मीठ जास्त खाल्ल्याने कर्करोग

जेवणात अनेक अन्नपदार्थ अगदी चवीने खाल्ले जातात. हे पदार्थ चविष्ट बनवण्यामागे एका पदार्थाचा मोठा वाटा असतो तो म्हणजे मीठ. पदार्थांमध्ये मीठ नसेल, तर त्याची चव चांगली लागत नाही; पण जास्त प्रमाणातही मीठ खाणे आपल्या शरीरासाठी हानिकारक ठरू शकते. अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे, की मीठाच्या सेवनाने शरीरावर वाईट परिणाम होतो. नुकत्याच आलेल्या एका संशोधनानुसार जेवणात जास्त मीठ खाल्ल्याने रक्तदाब वाढतो आणि कर्करोगाचा धोकाही वाढू शकतो.

'गॅस्ट्रिक कॅन्सर जर्नल'मध्ये प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टनुसार, एका संशोधनात जेवणात जास्त मीठ खाल्ल्याने कॅन्सर होऊ शकतो याची पुष्टी झाली आहे. या विषयी सविस्तर जाणून घेऊया. हे संशोधन यूकेमधील सुमारे ४,७१,१४४ लोकांवर करण्यात आले. अभ्यासात मिठाचे परिणाम सर्वांमध्ये दिसले, ज्यामध्ये वाईट लक्षणे अधिक दिसली. मिठापासून कर्करोगाचा धोकाही या अभ्यासात दिसून आला आहे. हा कर्करोग मुख्यतः प्रक्रिया केलेल्या पदार्थांच्या सेवनामुळे होतो, कारण या पदार्थांमध्ये मीठ जास्त असते. मिठामुळे होणाऱ्या कर्करोगाला गॅस्ट्रिक कॅन्सर म्हणतात.



गॅस्ट्रिक कर्करोग हा कर्करोगाचा एक प्रकार आहे, जो जगभरात वाढत आहे. दरवर्षी लाखो लोक या कॅन्सरला बळी पडतात आणि आपला जीव गमावतात. गॅस्ट्रिक कॅन्सरमध्ये पोटाच्या आत ट्यूमर पेशी तयार होतात. तसेच चेहऱ्यावर आणि त्वचेवर या गंभीर आजाराची लक्षणेही आपल्याला दिसतात. या प्रकारच्या कर्करोगाला पोटाचा कर्करोग किंवा स्टमक कॅन्सर असेही म्हणतात. संशोधनानुसार, जास्त मीठ खाल्ल्याने पोटातील आतड्यांवर परिणाम होतो. त्यामुळे पोटात सूज आणि जळजळ वाढते. ही जळजळ 'हेलिकोबॅक्टर पायलोरी' नावाच्या जीवाणूंचा संसर्ग वाढवण्यास मदत करते. त्यामुळे पोटात जखमा आणि अल्सर होऊ शकतात. 'हेलिकोबॅक्टर पायलोरी' बॅक्टेरिया हे पोटाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण मानले जाते. दुसऱ्या एका अहवालात असे म्हटले आहे, की जगातील दोन तृतीयांश लोक या जीवाणूमुळे विविध आजारांनी ग्रस्त आहेत.

## दम्यावर नवीन औषधाचा शोध

'बेनरालिझुमॅब' हे सध्या अस्थमाच्या गंभीर आजारावर वापरले जाणारे औषध आहे. याचा उपयोग आपत्कालीन परिस्थितीत हॉस्पिटलायझेशनची संख्या कमी करण्यासाठी आणि दमा आणि 'सीओपीडी' परिस्थिती टाळण्यासाठी केला जातो. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की एक नवीन उपचार जगभरातील दमा आणि 'सीओपीडी'ने ग्रस्त लाखो लोकांसाठी महत्त्वाचे ठरू शकते. 'द लॅन्सेट रेस्पिरेटरी मेडिसिन'मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष दर्शवतात, की आधीच उपलब्ध असलेले औषध आपत्कालीन परिस्थितीत पुढील उपचार आणि हॉस्पिटलायझेशनची गरज कमी करण्यासाठी पुन्हा वापरले जाऊ शकते. बेनरालिझुमॅब नावाचे औषध, एक मोनोक्लोनल अँटीबॉडी आहे, जे फुफ्फुसाचा दाह कमी करण्यासाठी इओसिनोफिल नावाच्या विशिष्ट पांढऱ्या रक्त पेशींना लक्ष्य करते. हे सध्या गंभीर दम्याच्या उपचारांसाठी वापरले जाते. 'एबीआरए' चाचणीमध्ये असे आढळून आले, की स्टिरॉइड गोळ्यांपेक्षा उत्तेजित होण्याच्या ठिकाणी इंजेक्शन दिल्यास एकच डोस अधिक प्रभावी असू शकतो. प्रोफेसर मोना बाफडेल, किंग्स सेंटर फॉर लंग हेल्थच्या चाचणीचे प्रमुख अन्वेषक म्हणाले, की पन्नास वर्षांत अस्थमा आणि 'सीओपीडी'च्या तीव्रतेच्या उपचारांमध्ये बदल झालेला नाही. जगभरात दरवर्षी ३.८ दशलक्ष मृत्यू होतात. बेनरालिझुमाब हे एक सुरक्षित आणि प्रभावी औषध आहे, जे आधीच गंभीर दम्याचे व्यवस्थापन करण्यासाठी वापरले जाते. सध्या उपलब्ध असलेल्या एकमेव उपचार असलेल्या स्टिरॉइड गोळ्यांपेक्षा ती अधिक प्रभावी असल्याचे दर्शवणारे पुरावे आहेत.




## धोका ऑटोइम्युन विकारांचा

**खास बात**

गेल्या काही वर्षांमध्ये ऑटोइम्युन प्रकारच्या विकारांमध्ये बरीच वाढ झाली आहे. याबाबत आरोग्यतज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित असणाऱ्या या विकारांची तीव्रता पुरुषांपेक्षा महिलांमध्ये अधिक प्रमाणात आढळते. या विकारांच्या लक्षणांमध्ये बरेच बदल पहायला मिळत असल्याने त्यांचं पटकन निदान होत नाही. निदान उशीरा झाल्यामुळे उपचारांचा प्रभावही कमी होतो.

शरीराला स्वत:च्या पेशी आणि परकीय पेशींमध्ये फरक करता न आल्याने ऑटोइम्युन विकार उद्‌भवतात. बाहेरच्या बॅक्टेरियांवर हल्ला करण्याचं काम शरीरातली रोगप्रतिकारक शक्ती करते. यामुळे विविध विकारांपासून आपला बचाव होतो. पण ऑटोइम्युन विकार असतील तर शरीरातलं ऑटो अँटिबॉडिज हे प्रथिन निरोगी पेशींवरच हल्ला चढवतं. यामुळे आपण जंतूसंसर्ग आणि विविध प्रकारच्या दाहांना लवकर बळी पडतो. शरीराचा असा गोंधळ नेमका कशामुळे होतो, हे अजूनही स्पष्ट झालेलं नाही. याचं नेमकं कारण जाणून घेण्यासाठी संशोधन सुरू आहे.



ऑटोइम्युन विकारांची काही लक्षणं दिसून येतात. या प्राथमिक लक्षणांवरून भविष्यातला धोका टाळता येऊ शकतो. या लक्षणांविषयी जाणून घेऊ. आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. शरीरात घडणाऱ्या घडामोडींचं प्रतिबिंब त्वचेवर उमटत असतं. त्वचेतला छोटासा बदलही एखाद्या विकाराकडे अंगुलीनिर्देश करू शकतो. शरीरावर कोणत्याही कारणाशिवाय उठलेलं पुरळ, लालसरपणा, खाज येणं अशा समस्या सातत्याने उद्‌भवत असतील तर हे ऑटोइम्युन विकारांचं लक्षण असू शकतं. मुरूमं आणि एक्झिमा ही सुद्धा काही विकारांची लक्षणं असू शकतात. व्यायाम किंवा कोणत्याही शारीरिक हालचालीशिवाय शरीरात तीव्र वेदना जाणवत असतील तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. अंगदुखीकडे दुर्लक्ष करू नये. स्नायूंना सूज येणं, सांधेदुखी अशा लक्षणांकडेही दुर्लक्ष करता येणार नाही.

आठ तासाच्या शांत झोपेनंतरही थकवा जाणवत असेल तर जागं होण्याची गरज आहे. ॲनिमिया किंवा एखाद्या गंभीर स्वरूपाच्या आजाराचं हे लक्षण असू शकतं. थकवा येण्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. डायरिया किंवा गॅसेसशी संबंधित समस्यांमुळे पोट दुखतं असा आपला समज असतो. पण प्रत्येक वेळी हेच कारण असेल असं नाही. सातत्याने पोटदुखी जाणवत असेल तर हे ऑटोइम्युन विकारांचं लक्षण असू शकतं. यामुळे पचनसंस्थेचं नुकसान होऊ शकतं.

वजन अचानक कमी होत असलं तरी तातडीने डॉक्टरांकडे जा. प्रत्येकालाच वजन कमी करायचं असतं. पण कोणत्याही कारणाशिवाय कमी होणारं वजन ऑटोइम्युन विकारांचं लक्षण म्हणता येईल. यामागे गंभीर स्वरूपाचं वैद्यकीय कारण असू शकतं. ताण किंवा पोषक घटकांचा अभावही याला कारणीभूत ठरू शकतो. डाएट, व्यायाम न करताही मोठ्या प्रमाणावर वजन कमी झालं तर आरोग्य तपासणी करून घ्या.

## पीपीआय ठरतात धोकादायक

**नवसंशोधन**

आम्लपित्त, छातीत जळजळ अशा समस्यांवर आपण एखादं औषध घेऊन मोकळे होतो. अनेकजण वारंवार अशी औषधं घेत असतात. मात्र ही कृती धोक्याची ठरू शकते, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. छातीत जळजळ, अल्सर आणि आम्लपित्त यावरच्या औषधांच्या सेवनामुळे अकाली मृत्यूची शक्यता वाढत असल्याचं समोर आलं आहे. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये याबाबतचं संशोधन प्रसिद्ध झालं आहे. या औषधांना प्रोटॉन पंप इनहिबिटर्स (पीपीआय) असं म्हणतात. अशा औषधांचा दीर्घकालीन वापर हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार तसंच गॅस्ट्रोइन्टेस्टिनल कॅन्सरला कारणीभूत ठरू शकतो. ही औषधं कमी प्रमाणात घेतली तरी त्यांचा दीर्घकालीन वापर धोक्याचा असतो, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.



## हार्मोन्समुळे बिघडतं तोंडाचं आरोग्य

**दंतारोग्य**

हार्मोनल बदल महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करतातच शिवाय यामुळे तोंडाचं आरोग्यही धोक्यात येऊ शकतं.



गर्भनिरोधक औषधांच्या वापरामुळे तोंडाच्या आरोग्याशी संबंधित बरेच बदल होतात. मासिक पाळीदरम्यान हिरड्यांना सूज येणं, लाळेच्या ग्रंथी सुजणं तसंच हिरड्यांमधून रक्त येणं अशा समस्या महिलांना भेडसावतात. या काळात महिलांच्या शरीरातल्या हार्मोन्समध्ये बरेच बदल होत असल्यामुळे दातांशी संबंधित तक्रारी उद्भवतात.

## तापमान अचानक बदलल्यामुळे...

**आपण कुठे चुकतो?**

कार्यालयांमध्ये सतत एसी सुरू असतो. दमून भागून घरी गेल्यानंतर पटकन एसी किंवा कूलर सुरू केला जातो. मात्र अशा प्रकारे उष्ण तापमानातून थंड वातावरणात जाणं आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकतं. त्यातही श्वसनाचे विकार, सर्दी-खोकल्याचा त्रास असणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यायला हवी.

उष्ण हवामानातून अचानक थंड वातावरणात गेल्यानंतर शरीरावर प्रचंड ताण येतो. शरीराला थंड वातावरणाशी अचानक जुळवून घ्यावं लागतं. या बदललेल्या तापमानामुळे तुमची त्वचा, डोळे आणि त्वचेवरचा पातळ थर कोरडे पडतात. उन्हातून लगेच ऑफिसमध्ये गेल्यानंतर डोळ्यांमध्ये खाज येणं, शिंका येणं अशा तक्रारी बरेचजण करतात. बाहेरच्या आणि आतल्या तापमानातल्या तफावतीमुळे असं होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे डोळे, श्वसनसंस्थेचा जंतूसंसर्गदेखील होऊ शकतो. तसंच स्नायूंमध्ये गोळे येऊ शकतात. तापमानात अशा पद्धतीने होणाऱ्या चढ-उतारांमुळे नाक गळणं, दम्याचा ॲटॅक, स्नायूंची दुखणी, सायनसिटीस, फ्लू, खोकला, सर्दी, घसा खवखवणं, अंगदुखी अशा समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे उन्हातून अचानक थंड वातावरणात जाऊ नये.



## उपयोग गुग्गुळचे

**आयुर्वेद आणि विकार**

गुग्गुळ ही आयुर्वेदातली अत्यंत महत्त्वाची औषधी वनस्पती आहे. आयुर्वेदात विविध विकारांवरील उपचारांसाठी गुग्गुळाचा वापर होतो. धमन्यांच्या बळकटीसाठी गुग्गुळ उपयुक्त ठरतं. यासोबतच आर्थ्रायटिस, कोलेस्टरॉल आणि वजन कमी करणं यासाठीही गुग्गुळचा वापर होतो. यातल्या विशिष्ट घटकांमुळे रक्तातले ट्रायग्लिसराइड्स आणि कोलेस्टरॉलचं प्रमाण कमी होतं. मुरूमांचा लालसरपणा आणि दाह कमी करण्याची क्षमताही या घटकांमध्ये असते. गुग्गुळाचा वापर दोन पद्धतींनी करता येतो. एक म्हणजे त्याचा लेप तयार करून अंगाला लावता येतो. सांधेदुखी, त्वचाविकार, दाह कमी करणं, टिश्यूंमधले विषारी घटक नष्ट करणं अशा कारणांसाठी तुम्ही शरीरावर गुग्गुळचा लेप लावू शकता. तोंडाच्या आरोग्यासाठी गुग्गुळाच्या गुळण्या करता येतील.

गुग्गुळाचे अनेक लाभ आहेत. रक्तशुद्धी, वजन नियंत्रणात रहाणं, सांध्यांची सुलभ हालचाल, रोगप्रतिकारकशक्ती सुधारणं, त्वचा नितळ होणं, मासिक पाळीच्या समस्या दूर होणं हे सगळं गुग्गुळच्या नियमित वापराने साधता येतं. मात्र काही विकार असतील तर गुग्गुळाचा वापर करू नये.


गरोदरपणात तसंच बाळंतपणानंतर लगेच गुग्गुळाचं सेवन करू नये. थायरॉइडच्या रूग्णांनीही याचा वापर टाळावा. रक्ताशी संबंधित विकारांमध्येही गुग्गुळ धोकादायक ठरू शकतं.



## लॅसिक शस्त्रक्रियेनंतर...

**डोळ्यांचं आरोग्य**

चष्म्याचा नंबर घालवण्यासाठी लॅसिक सर्जरीचा पर्याय निवडला जातो. या शस्त्रक्रियेचे बरेच लाभ असले तरी काही दुष्परिणामही होऊ शकतात. या शस्त्रक्रियेनंतर काहींना रात्रीच्या वेळी अंधूक दिसू लागतं. प्रखर प्रकाशाचा त्रास होऊ लागतो. अर्थात तीन महिने ते वर्षभराच्या कालावधीत या तक्रारी दूर होतात. काहींना डोळे कोरडे होण्याची समस्या जाणवते. काही आठवड्यांनंतर हा त्रास दूर होतो. यासोबतच या शस्त्रक्रियेनंतर डोळ्यांमधल्या पांढऱ्या भागावर लालसर ठिपके दिसू लागतात. हा या शस्त्रक्रियेचा सर्वसाधारण दुष्परिणाम आहे. त्यामुळे अशा समस्या जाणवल्या तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.




## लक्षणं मल्टीपल स्क्लेरॉसिसची

**व्याधी विचार**

मल्टीपल स्क्लेरॉसिस हा मेंदूशी संबंधित विकार आहे. सर्वसाधारणपणे प्रौढ युवांमध्ये हा विकार आढळतो. या विकाराचे जवळपास २.३ दशलक्ष रुग्ण आहेत. हजारो रुग्णांमध्ये या विकाराचं वेळेत निदानच होत नाही. आपल्याला मल्टीपल स्क्लेरॉसिससारखा विकार असल्याचं त्यांच्या गावीही नसतं. मेंदू, पाठीचा कणा आणि डोळ्यांच्या नसांच्या माध्यमातून हा विकार थेट मज्जासंस्थेवर हल्ला करतो. यामुळे तीव्र स्वरूपाचं अपंगत्व येण्याचा धोका वाढतो. कोणतीही एक चाचणी या विकाराचं निदान करू शकत नाही. त्यामुळे डॉक्टर विविध चाचण्या करून घेण्याचा सल्ला देतात. म्हणूनच मल्टीपल स्क्लेरॉसिसची लक्षणं आणि संकेतांबाबत माहिती घेणं गरजेचं आहे.

या विकारात रुग्णांना कधीही स्नायूंच्या कार्यात अडथळे जाणवू शकतात. नसांचं नुकसान झाल्यामुळे ही समस्या निर्माण होते. पाठीचा कणा आणि मेंदूतल्या क्षतीग्रस्त नसांमुळे विशेषत: पायांमध्ये वेदनादायी गोळे येतात. ही या विकाराची प्राथमिक लक्षणं आहेत. अंग लुळं पडणं आणि शरीरात सुया टोचल्यासारखं वाटणं हे या विकाराचं सर्वसाधारण लक्षण आहे. संपूर्ण शरीरात अशी जाणीव होते. दुसरं म्हणजे मान हलवताना अचानक विद्युत शॉक बसल्यासारखं वाटतं. हे या विकाराचं अत्यंत महत्त्वाचं लक्षण असल्याने अशा परिस्थितीत तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. या विकारात मूत्रावर आपलं नियंत्रण रहात नाही. सातत्याने थकवा येणं आणि भोवळ आल्यासारखं वाटणं याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. अशा रुग्णांचा तोल अचानक जातो. अवयवांच्या समन्वयावरही परिणाम होतो.



डोळ्यांची नस क्षतीग्रस्त झाल्यामुळे दृष्टिदोष निर्माण होतात. एका वेळी एका डोळ्यावर परिणाम होतो. दुहेरी दिसणं, अंधुक दिसणं या सर्वसाधारण समस्या आहेत. क्वचितप्रसंगी अंधत्वही येऊ शकतं. लाल आणि हिरवा रंग ओळखण्यात अडचणी येतात. मेंदूतल्या नसेवर परिणाम झाल्यामुळे विस्मरण होऊ शकतं. मन एकाग्र करता येत नाही. यामुळे अभ्यास तसंच कामावर परिणाम होतो. यासोबतच डोकेदुखी, खाज, मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग, बोलताना अडचणी येणं अशी लक्षणंही दिसून येतात.

## लाभदायी पनीर

**आजीबाईंचा बटवा**

भारतीयांच्या आहारात पनीरला महत्त्वाचं स्थान आहे. पनीरपासून चविष्ट पदार्थ बनवले जातात. पनीर आरोग्यदायीही असतं. यात भरपूर प्रथिनं असतात. तुमची दिवसभरातली प्रथिनांची गरज पनीरमुळे भागू शकते. यात कर्बोदकांचं प्रमाण कमी असल्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी पनीर वापरता येईल. गायीच्या दुधापासून बनवलेल्या १०० ग्रॅम पनीरमध्ये फक्त ७२ कॅलरी असतात. आरोग्यदायी फॅट्सचा हा अत्यंत चांगला स्रोत आहे. पनीरमधल्या प्रथिनांमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं रहातं. यामुळे अतिखाणं होत नाही. यातला संयुग्मित लिनोलिक ॲसिड हा घटक वजन कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. यामुळे स्नायूंनाही बळकटी मिळते.



# महायुतीच्या विजयाच्या शिल्पकाराचा राजकीय प्रवास

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले आहे. तर भाजप 132 जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. 5 डिसेंबर रोजी महायुती सरकारचा शपथविधी होणार आहे. यात आता भाजपचे नेते आणि या विधानसभा निवडणुकीतील खऱ्या अर्थाने शिल्पकार म्हणवले जाणारे देवेंद्र फडणवीस हे तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. त्यानंतर महाराष्ट्रात फडणवीस पर्व 3.0 सुरु होईल.

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुका असो किंवा विधानसभा निवडणुका... सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष... राज्याच्या राजकारणात सध्या सर्वांच्याच केंद्रस्थानी एक नाव कायम आहे... ते म्हणजे देवेंद्र फडणवीस.... तब्बल 40 वर्षानंतर आपला पाच वर्षांचा मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण करणारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ठरलेले देवेंद्र फडणवीस आज महाराष्ट्रातील राजकारणाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचलेले आहेत.

नागपूर महापालिकेतून देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय करिअरला सुरुवात झाली. नागपूर महापालिकेत नगरसेवक म्हणून त्यांनी राजकीय जीवनात पाय रोवले. अवघ्या 22 व्या वर्षी ते नगरसेवक झाले होते. मग सर्वात तरूण महापौर ठरल्याची नोंद देखील फडणवीसांच्या नावावर आहे.



देवेंद्र फडणवीसांनी नागपूर विद्यापीठातून आपले एल. एल. बी. चे शिक्षण पूर्ण केले आहे. तर व्यवसाय व्यवस्थापन विषयाची त्यांच्याकडे पदव्युत्तर पदवी आहे. यानंतर त्यांनी डी. एस. ई. बर्लिन या जर्मनीतील संस्थेमधून 'डिप्लोमा इन मेथड्स अँन्ड टेक्निक्स ऑफ मॅनेजमेंट'चा अभ्यास केला.

देवेंद्र फडणवीसांनी आपला राजकीय प्रवास वार्ड संयोजक म्हणून 1989 मध्ये सुरू केला. 1990 मध्ये नागपूर पश्चिम कार्यकारिणी सदस्यपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली. 1992 मध्ये त्यांच्यावर भाजयुमो, नागपूर शहर अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली. याच काळात ते अवघ्या 22 वर्षी नगरसेवक म्हणून निवडून आले. तर अवघ्या दोन वर्षांमध्ये त्यांना भाजप युवा मोर्चाचे महाराष्ट्र उपाध्यक्षपद भूषवण्याची संधी मिळाली.

यानंतर 1997- 2001 मध्ये त्यांची नागपूरचे महापौर म्हणून निवड झाली. याच कार्यकाळात मेअर इन कौन्सिल या पदावर काम करत असताना त्यांना भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. 1999 मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. तेंव्हापासून ते सलग विधानसभेवर निवडून येत आहेत.

**राज्यातील भाजपचे पहिले मुख्यमंत्री**

2014 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस हे चारही पक्ष स्वतंत्र निवडणुकीला सामोरे गेले. यात फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आणि पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपचा मुख्यमंत्री बनला. देवेंद्र फडणवीस यांना राज्यातील भाजपचा पहिला मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला.

मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच कार्यशैलीचा अवलंब केला. वास्तविक फडणवीस यांनीही मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात अनेक संकटाचा सामना केला. पण त्यांनी केवळ पक्षांतर्गत शत्रुत्वावर नियंत्रणच ठेवले नाही तर मित्रपक्ष शिवसेनेकडून निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीलाही त्यांनी हाताळले.

देवेंद्र फडणवीस यांचा जन्म 22 जुलै 1970 रोजी नागपूरच्या मराठी ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे संघाचे प्रचारक तसेच भाजप नेते होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे गंगाधरराव फडणवीस यांना आपले 'राजकीय गुरू' मानत.

देवेंद्र फडणवीस सहा वर्षांचे असताना 1975 मध्ये देशभरात आणीबाणी लागू झाली. या कार्यकाळात त्यांचे वडील गंगाधरराव फडणवीस यांना अटक करण्यात आली. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांना इंदिरा गांधींचा तिरस्कार वाटू लागला.

मात्र, देवेंद्र हे ज्या शाळेत शिक्षण घेत होते, त्या शाळेचे नाव इंदिरा गांधी यांच्या नावावरुन इंदिरा कॉन्व्हेंट स्कूल असे होते. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी इंदिरा गांधींचे नाव असलेल्या शाळेत शिक्षण घेण्यास नकार दिला. त्यांनी ती शाळा सोडून सरस्वती शिशु मंदिर विद्यालयातून पुढील प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. तसेच धरमपीठ कनिष्ठ महाविद्यालयातून बारावी तर 1992 मध्ये त्यांनी कायद्याची पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी जर्मनीच्या बर्लिन शहरातील जर्मन फाउंडेशन फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट मधून व्यवसाय व्यवस्थापन विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली.



1987 मध्ये देवेंद्र फडणवीस 17 वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. 1989 मध्ये, महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषद म्हणजेच अइश्ढ चे सक्रिय सदस्य बनले. 1992 में नागपुर नगर पालिकेत फडणवीस नगरसेवक झाले. 1997 मध्ये वयाच्या 27 व्या वर्षी ते नागपूरचे सर्वात तरुण महापौर झाले. महापौर झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांनी देवेंद्र फडणवीस 1999 मध्ये नागपूर पश्चिम मतदारसंघातून निवडणूक जिंकून पहिल्यांदा विधानसभेत पोहोचले. 2004 मध्ये ते त्याच मतदारसंघातून पुन्हा आमदार झाले. 2009 ते 2019 पर्यंत सलग 3 वेळा नागपूर दक्षिण पश्चिममधून आमदार म्हणून निवडून आले.

महाराष्ट्र प्रदेश भाजपा सरचिटणीस (2010)
महाराष्ट्र प्रदेश भाजपाध्यक्ष (2013)
भाजपा निवडणूक प्रभारी, बिहार (2020)
भाजपा निवडणूक प्रभारी, गोवा (2022)
भाजपा केंद्रीय निवडणूक समिती, सदस्य

**राजकीय जबाबदारी**

1990 : प्रसिद्धी प्रमुख
नगरसेवक, नागपूर महापालिका (1992-97 आणि 1997- 2001)
महापौर/मेअर इन कौन्सिल, नागपूर (1997 ते 2001)
महाराष्ट्र विधानसभा सदस्य 1999 पासून आजतागायत
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (2014-2019)
विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा (2019-2022)
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (2022 पासून)

**विधिमंडळातील कार्य**

1999 पासून सलग 25 वर्ष आमदार
अंदाज समितीचे सदस्य.
नगरविकास व गृहनिर्माण विषयीच्या स्थायी समितीचे सदस्य.
सार्वजनिक उपक्रम समितीचे सदस्य
स्वयंनिधीवर आधारित शाळांबद्दलच्या संयुक्त समितीचे सदस्य
महाराष्ट्र जीवन प्राधीकरण संयुक्त विधीमंडळ समिती सदस्य

**सामाजिक योगदान**

भारतातील कृषी क्षेत्रात परिवर्तनासाठी नीती आयोगाच्या मुख्यमंत्र्यांच्या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष
सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष
अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन
सिनेट सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

**कपड्याच्या दुकानासाठी मॉडेलिंग**

देवेंद्र फडणवीस यांच्या बाबतीत एक किस्सा चांगलाच प्रसिद्ध आहे. 2006 मध्ये देवेंद्र फडणवीस आमदार होते. नागपूर शहरातील एका कपड्याच्या दुकानासाठी त्यांनी मॉडेलिंग केली. नागपूर शहरातील प्रत्येक चौकात कपड्याच्या दुकानाच्या जाहिरातीत फडणवीसांचे मोठमोठे होर्डिंग लावण्यात आले.

ही बातमी भाजपचे तत्कालीन सर्वात मोठे नेते अटलबिहारी वाजपेयींपर्यंत पोहोचली. काही दिवसांनी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना भेटण्यासाठी दिल्लीला बोलावले. वाजपेयींनी त्यांचे स्वागत केले होते आणि म्हणाले या, मॉडेल आमदार या, फडणवीसांच्या बाबतीतला अनेक किस्स्यांपैकी हा किस्सा कायच चर्चेत राहिला.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट नागपूरचे सीईओ शैलेश जोगळेकर एका मुलाखतीत सांगतात की ते 2005 पासून अमृता आणि देवेंद्र दोघांचे कॉमन मित्र आहेत. 2005 मध्ये एके दिवशी अमृता आणि देवेंद्र त्यांच्या घरी पहिल्यांदा भेटले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस दुस?यांदा आमदार झाले. अर्ध्या तासात येतो असे सांगून अमृता घरून आली होती. मात्र, देवेंद्र यांची भेट घेतल्यानंतर त्यांची बैठक सुमारे दीड तास चालली.

एका मुलाखतीत अमृता म्हणाल्या होत्या, 'देवेंद्रला भेटण्यापूर्वी मी नर्व्हस होते. मी तणाव आणि दबावात होते. मी विचार करत होते की, देवेंद्र हा कोणत्या प्रकारचा माणूस असेल. नेत्यांबद्दल माझ्या मनात नकारात्मक प्रतिमा होती, पण त्यांना भेटल्यानंतर मला वाटले की, ते एक अस्सल आणि डाउन टू अर्थ व्यक्ती आहेत. काही काळानंतर, देवेंद्र आणि अमृता यांच्या आईने मिळून लग्न निश्चित केले, त्यानंतर 17 नोव्हेंबर 2005 रोजी दोघांचे लग्न ठरले. अमृता यांनी सांगितले की, त्यांना देवेंद्रची गाणी ऐकायला आवडतात. या दोघांना दिविजा फडणवीस नावाची मुलगी आहे. अमृता रानडे फडणवीस या व्यवसायाने बँकर, अभिनेत्री आणि गायिका आहेत. त्याचे आई-वडील नागपुरात डॉक्टर आहेत.

## 'त्या' बातमीने उडाली आरोग्य विभागाची झोप

### सफाई कर्मचारी करतात रूग्णांना गोळ्या, औषधीचे वाटप




■ **महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. ४ :**
प्राथमिक आरोग्य केंद्र, कारवाफा हे आदिवासी बहुल संवेदनशील भागात रुग्णांच्या प्राथमिक सेवेसाठी कार्यरत असून, योग्य उपचार व्हावेत, यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कार्यतत्पर असणे आवश्यक आहे. तथापि, या केंद्रात औषधी संयोजकाच्या अनुपस्थितीत सफाई कर्मचारी गोळ्या आणि औषधाचे वाटप करीत असल्याचा प्रकार समोर आला.

या संपूर्ण प्रकरणाची शहानिशा करून बातमी दै. महासागरने २९ नोव्हेंबर रोजीच्या अंकात बातमी प्रकाशित केली. हे वृत्त झळकताच आरोग्य विभाग खळबळून जागे झाले असून चौकशी सुरू होण्यापूर्वीच सदर केंद्राचे कर्मचारी कामाला लागले.

प्राथमिक आरोग्य केंद्र कारवाफा येथे बाह्यरुग्ण विभागात येणारे रूग्णांना याच केंद्रातील सफाई कर्मचारी चक्क औषध व गोळ्या वाटप करीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. औषधी संयोजक अर्थात फॉर्मासिस्ट वारंवार अनुपस्थित राहत असल्याने त्याच्या गैरहजेरीत सफाई कर्मचारी रूग्णांना गोळ्या द्यायचे.

महासागरने या प्रकाराचा भंडाफोड करताच आरोग्य विभागाच्या दोन चमू कारवाफा केंद्रावर पोहचल्या. परिणामी, येथील कर्मचाऱ्यांची दाणादाण उडाली. रूग्णांनी मात्र सुटकेचा निःश्वास घेतला आहे.

एकीकडे गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य सेवा ढेपाळली असल्याने कित्येक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागले आहे. ही परिस्थिती डोळ्यासमोर असतानाही आरोग्य विभाग त्यांच्या कामकाजात सुधारणा करण्यास तयार नाही. सदर आरोग्य केंद्रात कर्मचारी अधिकारी यांचेसाठी ब्रॉडबॅन्ड आहे. मात्र सिसिटीव्ही कॅमेराची सोय नाही.

रूग्णांना तपासण्याचे काम डॉक्टर करीत असले तरी सफाई कर्मचारी औषध वाटप करीत असल्याचे त्यांच्या लक्षात कसे आले नाही? किंवा त्यांची संमती होती का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

## महाराष्ट्र निसर्ग उद्यान




मुंबई शहराच्या एकेकाळच्या क्षेपण भूमी वर तयार करण्यात आलेले निसर्ग उद्यान म्हणजे मानवनिर्मित जंगलाचे सर्वोत्तम उदाहरण आहे. ह्या मानव निर्मित जंगलालाच जोडून माहीमच्या खाडीतील तिवराची नैसर्गिक जंगले आहेत. नैसर्गिक संपदेचा वारसा टिकवून ठेवणे व त्याची संवर्धन करणे ह्या हेतुने साकारलेल्या ह्या निसर्ग उद्यानात प्रवेश केल्यापासून बाहेर पडेपर्यंत आपण मुंबईसारख्या गच्च दाटीवाटीच्या शहराच्या मध्यभागी आहोत ह्याचा आपल्याला पूर्णपणे विसर पडतो. नियमितपणे पुन्हा पुन्हा येत राहणाऱ्या प्रेक्षकांची वाढती संख्या हेच सुचवते कि, जैवविविधतेचा अभ्यास करण्यासाठी आणि निसर्गाचे नियम सोप्या पद्धतीने समजून घेण्यासाठी निसर्ग उद्यानासारखे उत्तम स्थळ नाही.

सन १९७७ च्या दशकाच्या अखेरीस महाराष्ट्र निसर्ग उद्यानाची धारावीमधील ही ३७ एकर जमीन केवळ एक गलिच्छ कचरा क्षेपण क्षेत्र होती. महाराष्ट्र शासनाच्या नागरी विभागाने सप्टेंबर, १९७९ साली मुंमप्रवि प्राधिकरण यांच्या अधिपत्त्याखाली महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या विकासासाठी एक प्रकल्प गट स्थापन केला व त्यांना ३७ एकर जागेचा विस्तृत अभ्यास करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे प्रकल्प गटाने विस्तृत अभ्यास करून प्रकल्पाचा अहवाल जून, १९८२ मध्ये शासनाकडे सादर केला. सन १९८२ - १९८३ मध्ये महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या विकासाची कामे मुंमप्रवि प्राधिकरणाने हाती घेतली.

मुंमप्रवि प्राधिकरणाच्या विनंतीनंतर जागा साफ करण्यापासून ते झाडे लावण्याचे काम डब्ल्यूडब्ल्यूएफ भारत यांच्याकडे सोपविण्यात आली. सन १९८३ साली डॉ. सलीम अली यांच्या हस्ते पहिले सदाहरित झाड उद्यानात लावण्यात आले. त्यानंतर झाडे लावण्याच्या मोहिमेत मुलांना विशेषतः शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सामावून घेतले. जून, १९८४ मध्ये महाराष्ट्र निसर्ग उद्यानामध्ये शैक्षणिक इमारत केंद्राचे काम मुंमप्रवि प्राधिकरणाने हाती घेतले. सन १९८७ मध्ये पुन्हा डॉ. सलीम अली यांनी पाच स्थानिक प्रजातीचे वृक्षारोपण केले. त्यामध्ये वड, पिंपळ, उंबर, पळस आणि आंबा या जातींचा समावेश आहे. कचरा क्षेपण भूमीचे नियोजन करणे हा आजच्या काळात मोठा जागतिक यक्ष प्रश्न आहे.

महाराष्ट्र निसर्ग उद्यान हा त्यावर शोधलेला उपाय आहे. वेगवेगळ्या देशातील तसेच शहरातील अभ्यांगत येथे केलेले प्रयत्न व त्याचे परिणाम पाहण्यासाठी येतात.

येथे केलेल्या प्रयत्नांची पराकाष्ठा पाहण्यासाठी भेट देणारे प्रत्येक मान्यवर, अभ्यांगत त्याचप्रमाणे जगातील वैज्ञानिकांनी उद्यानाची प्रशंसा केली आहे.उद्यानाच्या उत्साह व नाविन्यपूर्ण दृष्टीकोनामुळे लोकांच्या निसर्गाच्या ज्ञानाचे क्षितीज वाढत आहे व त्यामुळे लोकांना निसर्गाची गुंतागुंत समजण्यास मदत होत आहे. ■ ■

**शब्दार्थ**

**RTO**

आरटीओ ट्रान्सपोर्टशी संबंधित सरकारी डिपार्टमेंट असते. आरटीओ चा फुल फॉर्म Regional Transport Office आहे. आरटीओ भारत सरकारच्या ट्रान्सपोर्ट डिपार्टमेंटचे एक संघटन आहे, जे देशातील सर्व वाहनांचा डेटा ठेवतात. जेव्हा पण तुम्हाला तुमच्या वाहनाच्या रिलेटेड कोणती रजिस्ट्रेशन करायचे असेल म्हणजे गाडीचे लायसन्स काढणे, गाडीचे रजिस्ट्रेशन करणे, गाडी दुस?याच्या नावावर ट्रान्सफर करणे इत्यादी कामांसाठी तुम्हाला आरटीओला जावं लागेल. ■

## आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त २९ पॅरालिम्पिक चॅम्पियन्सचा सन्मान

भारतातील सर्वात मोठी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाने जागतिक अपंग दिनाच्या निमित्ताने पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक खेळांतील भारताच्या पॅरालिम्पिक विजेत्यांचा सन्मान करण्यासाठी विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन केले. या कार्यक्रमात बँकेने २९ पॅरालिम्पिक विजेत्यांना धनादेश प्रदान करून त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव केला.

या प्रसंगी एसबीआयचे अध्यक्ष सी. एस. सेट्टी म्हणाले, पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक खेळांतील भारताची कामगिरी आपल्या राष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा आहे. या खेळाडूंनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अशक्य गोष्टी साध्य करून दाखवल्या आणि संपूर्ण देशाला प्रेरित केले आहे.

एसबीआयमध्ये आम्हाला या विजेत्यांना प्रोत्साहन देण्याचा सन्मान लाभला आहे, आणि आम्ही भारतीय क्रीडेसाठी समृद्ध, सर्वसमावेशक पर्यावरण तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत.




समावेशकतेसाठीच्या आपल्या बांधिलकीच्या पार्श्वभूमीवर, एसबीआयने एएलआयएमसीओ (आर्टिफिशियल लिम्ब्स मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) सोबत आर्थिक वर्ष २०२४-२५ चा सीएसआर उपक्रमांतर्गत भागीदारी जाहीर केली. या उपक्रमाद्वारे देशभरातील २० ठिकाणी सुमारे ९००० दिव्यांगांना सहाय्य उपकरणांचे वितरण करण्यात येणार आहे.या सोहळ्यात हरविंदर सिंग, सुमित अँतिल, धरमबीर, प्रविण कुमार, नवदीप सिंग, नितेश कुमार, अवनी लेखरा यांना सुवर्णपदकाने, निशाद कुमार, योगेश कंठुनिया, शरद कुमार, अजीत सिंग, सचिन खिलारी, प्रणव सूर्मा, थुलसीमथी मुरुगेशन, सुहास यथिराज, मनीष नरवाल यांचा रौप्य पदकाने तर शीतल देवी, राकेश कुमार, प्रीती पाल, दीप्ती जीवनजी, मरियप्पन थंगावेलू, सुंदर सिंग गुर्जर, होकाटो होतोझे सेमा, सिमरन शर्मा, मनीषा रामदास, नित्या श्री शिवन, कपिल परमार, मोना अगरवाल, रुबिना फ्रान्सिस या खेळाडूंचा कांस्य पदकाने सन्मान करण्यात आला. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष रेल्वे गाड्या

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ४ :**
महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वे अमरावती ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि आदिलाबाद ते दादर दरम्यान अतिरिक्त अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे. प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन रेल्वेने अनारक्षित गाड्यांचे नियोजन केले.

मध्य रेल्वे प्रमुख मार्गावरून अनारक्षित गाड्या सोडणार आहे. अमरावती ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि आदिलाबाद ते दादर प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त अनारक्षित विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला. अमरावती - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - अमरावती अनारक्षित विशेष गाडीच्या दोन फेऱ्या होतील. विशेष गाडी अमरावती येथून ५ डिसेंबर रोजी १७.४५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०५.२५ वाजता पोहोचेल. विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ७ डिसेंबर रोजी मध्यरात्री ००.४० वाजता सुटेल आणि अमरावती येथे त्याच दिवशी १२.५० वाजता पोहोचेल.

या गाडीला बडनेरा, मूर्तिजापूर, अकोला, शेगाव, नांदुरा, मलकापूर, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, नाशिकरोड, इगतपुरी, कल्याण आणि दादर येथे थांबे राहतील. सामान्य द्वितीय श्रेणीचे १६ डबे गाडीला राहणार आहेत.

आदिलाबाद - दादर - आदिलाबाद अनारक्षित विशेष गाडीच्या दोन फेऱ्या होणार असल्याचे मध्य रेल्वेच्या वतिने सांगण्यात आले आहे.

## लाडक्या बहिणींची उलटतपासणी?

### कागदपत्रांची पुन्हा पडताळणी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**
विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरलेली लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची पुन्हा उलटतपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती आहे. खोट्या दाव्यांच्या पडताळणीसाठी अर्जदारांनी दाखल केलल्या कागदपत्रांची पडताळणी केली जाण्याची शक्यता आहे.

या उलटतपासणी अंती पात्र लाभार्थी महिलांच्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्या तर, त्यांना या योजनेपासून मुकावे लागेल. मिळालेल्या माहितीनुसार, या प्रक्रियेत राज्य आणि स्थानिक सरकारी अधिकारी, समाजकल्याण संघांसह अनेक विभागांचा समावेश असणार आहे.

विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेची रक्कम 1500 वरून 2100 रुपये केले जाईल, असे आश्वासन महायुतीने दिले होते. आता हे आश्वासन पूर्ण करणार असल्याचे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, आतापर्यंत 2 कोटींहून अधिक महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला आहे. हाराष्ट्रात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर, राज्यभरातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र आणि लाभार्थी महिलांसाठी एक तपासणी प्रक्रिया सुरू करण्याच्या तयारीत आहे.

सरकार आता केवळ पात्र महिलांपर्यंतच मदत पोहोचतेय ना? याबाबत खात्री करण्यावर भर देणार आहे. आर्थिक सहाय्य वितरणात पारदर्शकता येण्यासाठी ही प्रक्रिया केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रक्रियेद्वारे, खोटे दावे करणाऱ्या किंवा फसवणूक करणाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी अधिकृत रेकॉर्डसह सबमिट केलेल्या कागदपत्रांची उलटतपासणी होईल.



**हे लाभार्थी ठरतील अपात्र**

निवृत्तीवेतन प्राप्त करणाऱ्या किंवा चारचाकी वाहनधारक अर्जदारांना अतिरिक्त छाननीला सामोरे जावे लागेल.

ज्या महिलांच्या नावावर पाच एकरांपेक्षा जास्त जमीन आहे, अशा महिला या योजनेसाठी अपात्र ठरतील.

ज्या लाभार्थ्यांना आधीपासून लाभ मिळाला आहे, त्यांना तपासणीच्या अनेक टप्प्यांना सामोरे जावे लागणार आहे.

पहिल्या टप्प्यात ओळखीचा पुरावा, उत्पन्नाचा पुरावा आणि अर्जदारांनी दाखल केलेल्या इतर संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली जाईल. अधिकारी पडताळणीसाठी थेट लाभार्थ्यांच्या घरी भेट देतील. यामध्ये पात्रतेची पुष्टी करण्यासाठी घरोघरी सर्वेक्षणाचा समावेश असू शकतो. लाभार्थ्यांनी केलेले दावे ओळखण्यासाठी सरकार त्यांच्या डेटाची तुलना मतदार याद्या, आयकर रेकॉर्ड किंवा आधार-लिंक डेटा अशा अधिकृत डेटाबेससोबत करेल.

पडताळणी प्रक्रियेत पंचायत प्रमुख किंवा शहरी संस्थांचे प्रतिनिधी यांसारखे स्थानिक प्रतिनिधी देखील सहभागी होऊ शकतात.

शासनाने आता उलटतपासणीचा निर्णय घेतल्याने लाभ घेणाऱ्या अनेक महिला भविष्यात अपात्र ठरू शकतात.

# महासागर नागपूर वृत्तसागर

■ गुरुवार, दि. ५, डिसेंबर २०२४ ■


## हिंगणघाटच्या घरफोडी प्रकरणातील आरोपीला नागपुरात अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

वर्धाच्या हिंगणघाट परिसरात घरफोडी करून फरार झालेल्या आरोपी नागपुरात गुन्हे शाखा युनिट 5 च्या हाती लागला. संशयाच्या आधारावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता घरफोडीचे प्रकरण उघडकीस आले. पंकज बंडू सतरामवार (24) रा. विठाभट्टी चौक असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पंकजने गत 31 ऑक्टोबर रोजी साथीदार हर्ष छोटू डेहरिया (रा. शांतीनगर) याच्यासोबत मिळून हिंगणघाटच्या संत ज्ञानेश्वर वॉर्डात राहणारे सुरेश श्रीरामजी धोंगडे (47) यांच्या घराचे कुलूप तोडून दागिने चोरी केले. ही घटना उघडकीस आल्यानंतर सुरेश यांनी स्थानिक पोलिसात घटनेची तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता. या दरम्यान चोरीचा माल एका ज्वेलर्सला विकून दोन्ही आरोपी नागपूरला परतले. गुन्हे शाखा युनिट 5 चे पथक यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान पथकाला घरफोडीत सक्रीय एक इसम विनोबा भावेनगरात फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी परिसरात सापळा रचून पंकजला ताब्यात घेतले.

## राज्याच्या विकासाला गती मिळेल : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

भारतीय जनता पक्षाचे गट नेतेपदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित होताच शहरासह विदर्भातील विविध जिल्ह्यात जल्लोष केला जात असताना अनेक मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देवेंद्र फडणवीस यांची विधीमंडळाच्या नेतेपदी निवड होताच त्यांचे ट्विटरच्या माध्यमातून हार्दिक अभिनंदन केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागदर्शनाखाली आणि आपल्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाला गती मिळेल असा विश्वास व्यक्त करत गडकरी यांनी देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आनंदराव ठवरे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत त्यांच्या कार्यकाळात राज्यात विकासाला गती येईल यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. गंगाधरराव फडणवीस यांच्यासोबत भाजपच्या कार्यालयात येणारा देवेंद्र फडणवीस राज्याचा पुन्हा मुख्यमंत्री होत असल्यामुळे आम्हाला जास्त आनंद आहे. संघाचा स्वयंसेवक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता युवा मोर्चा, नगरसेवक, महापौर, आमदार , मुख्यमंत्री अशी सर्व कारकीर्द त्यांची बघितली आहे. त्यामुळे त्यांच्या मुख्यमंत्री निवडीचा आनंद असल्याचे आनंदराव ठवरे म्हणाले.

दरम्यान देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या मुख्यमंत्री निवड होणार असल्याचे जाहीर केल्यानंतर शहरातील धंतोलीतील भाजपच्या कार्यालयासमोर ढोल ताशांच्या निनादात शहर अध्यक्ष बंटी कुकडे यांच्या नेतृत्वाखाली जल्लोश करण्यात आला. धंतोली आणि गणेशपेठ येथील भाजप कार्यालयात पेढे वाटण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारे फलक शहरातील विविध भागात लावण्यात आले आहे. नागपुरातील धरमपेठेतील त्यांच्या निवासस्थानी आणि धंतोलीतील भाजप कार्यालयाच्या समोर भाजपच्या कार्यकत्यांनी ढोल ताशांच्या निनादात आणि फटाक्याची आतषबाजी करत जल्लोश केला.

देवेंद्र फडणवीस आगे बढो हम तुम्हारे साथ है. भारतीय जनता पक्षाचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. निवासस्थानासमोर जल्लोश केल्यानंतर धंतोलीतील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयासमोर भारतीय जनता युवा मोर्चा आणि महिला आघाडीने जल्लोष केला. याठिकाणी ढोल ताशांच्या निनादात आणि फटाक्याची आतषबाजी करत गुलाल उधळण्यात आला. फडणवीस यांच्या दक्षिण पश्चिम मतदार संघात प्रतापनगर चौक आणि लक्ष्मीनगर भागात तर महालातील बडकस चौक परिसरात भाजपच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

दरम्यान देवेंद्र फडणवीस यांचे मुख्यमंत्री म्हणून नाव निश्चित झाल्यानंतर उद्या गुरुवारी होणाऱ्या नव्या महायुती सरकारचा शपथविधी समारंभ मुंबईतील आझाद मैदानावर होणार असून त्यासाठी नागपूरमधून मंगळवारी खासगी आणि रेल्वेने ५०० पेक्षा अधिक कार्यकर्ते नागपूरवरुन रवाना झाले आहे.

## देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाचा नागपुरात जल्लोष

### लक्ष्मीनगर चौकात शपथविधीचे थेट प्रक्षेपण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

नागपूरचे सुपूत्र आणि महाराष्ट्राची शान देवेंद्र फडणवीस उद्या गुरुवारी ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. आज (ता.५) लक्ष्मीनगर चौकामध्ये जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता सर्व नागरिकांनी या गौरवशाली क्षणाचा आनंद साजरा करण्यासाठी लक्ष्मीनगर चौकात एकत्र यावे, असे आवाहन माजी महापौर संदीप जोशी यांनी केले आहे.

मुंबईतील आझाद मैदानावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज गुरुवारी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होता यावे यासाठी नागपूरकरांना गुरुवारी सायंकाळी ५ वाजता लक्ष्मीनगर चौकात मोठ्या स्क्रीनवर शपथविधी सोहळ्याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. यानंतर आतिषबाजी, ढोल ताशाच्या गजरात मिठाई वाटून या गौरवशाली क्षणाचा आनंद साजरा केला जाईल. नागपूरकर देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी सर्व जनतेने मोठ्या संख्येत उपस्थित रहावे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त धावणार विशेष अनारक्षित गाड्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ४ डिसेम्बर ५ डिसेम्बर आणि ७ डिसेम्बर ला नागपूर रेल्वे स्थानकावरून त्यांच्या अनुयायांच्या सोयीसाठी आणि अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे ने विशेष अनारक्षित गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - नागपूर आणि दादर - नागपूर गाड्यांची तपशील पुढील प्रमाणे आहे.



दिनांक ०४ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२६२ नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अनारक्षित विशेष ट्रेन, नागपूर रेल्वे स्थानकावरून रात्री २३. ५५ वा. सुटणार आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १५. ०५ वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ला पोहचेल. दिनांक ०५ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२६४ नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अनारक्षित विशेष ट्रेन, नागपूर रेल्वे स्थानकावरून सकाळी ८. ०० वा. सुटणार आणि त्याच दिवशी रात्री २३. ४५ वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ला पोहचेल.

दिनांक ०५ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२६६नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई अनारक्षित विशेष ट्रेन, नागपूर रेल्वे स्थानकावरून दुपारी १५. ५० वा. सुटणार आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०. ५५ वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ला पोहचेल.

दिनांक ०६ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२४९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - नागपूर अनारक्षित विशेष ट्रेन, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई रेल्वे स्थानकावरून संध्याकाळी १६. ५५ वा. सुटणार आणि दुसऱ्या दिवशी सकाळी १०. ०५ वा. नागपूरला पोहचेल. दिनांक ०६ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२५१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई -नागपूर अनारक्षित विशेष ट्रेन, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई रेल्वे स्थानकावरून संध्याकाळी १८. ३५ वा. सुटणार आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२. १० वा. नागपूरला पोहचेल.

दिनांक ०७ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२५३ दादर -नागपूर अनारक्षित विशेष ट्रेन, दादर रेल्वे स्थानकावरून रात्री ००. ४० वा. सुटणार आणि सायंकाळी १६. १० वा. नागपूरला पोहचेल. दिनांक ०७ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२५५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई -नागपूर अनारक्षित विशेष ट्रेन, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई रेल्वे स्थानकावरून दुपारी १२. ३५ वा. सुटणार आणि दुसऱ्या पहाटे ०३. ०० वा. नागपूरला पोहचेल. दिनांक ०८ डिसेम्बर २०२४ रोजी ट्रेन नं. ०१२५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई -नागपूर अनारक्षित विशेष ट्रेन, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई रेल्वे स्थानकावरून संध्याकाळी १८. ३५ वा. सुटणार आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२. १० वा. नागपूरला पोहचेल.

## ऑल इंडिया जॉइंट ॲडव्होकेट्स फोरम इंडियातर्फे राष्ट्रीय अधिवक्ता दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

ऑल इंडिया जॉइंट ॲडव्होकेट्स फोरम इंडियातर्फे राष्ट्रीय अधिवक्ता दिन साजरा करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र व गोवा पदाधिकारी अधिवक्ता अनिल गोवरदीपे, नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड अतुल पांडे, नागपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲडव्होकेट रोशन बागडे, सचिव मनीष रणदिवे, नागपूर फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲडव्होकेट आर.एन.सेन यांची विशेष उपस्थिती होती पासून उपस्थित.

यावेळी मंचाचे सर्व पदाधिकारी व बार असोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी संपूर्ण देशात वकिल संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीला पाठिंबा देत त्याची अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली. राष्ट्रीय कोअर कमिटीचे सदस्य आणि नागपूरचे अध्यक्ष अधिवक्ता छत्रपती शर्मा यांच्या नेतृत्वाखालील या



कार्यक्रमात वक्त्यांनी पुनरुच्चार केला की, आजही वकील वर्गाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वैयक्तिक सुरक्षेचा प्रश्न कायम आहे, सर्वोच्च न्यायालयानेही वकिलांना संबोधित केले आहे.

न्यायालयीन अधिकारी म्हणून, हे व्यासपीठ संपूर्ण देशात सुरक्षा कायदा लागू करण्यासाठी मोहीम राबवत आहे, ज्याला विविध राज्यांकडून योग्य पाठिंबा मिळत आहे. यावेळी व्यासपीठाचे राष्ट्रीय कोअर कमिटीचे सदस्य व महाराष्ट्राचे सहप्रभारी ॲड. छत्रपती एच. शर्मा सह-लेखक. कांचन वराडे मॅडम, अधिकारी. चंद्रशेखर राऊत, अधिकारी. पुष्कर छांगाणी, अधिकारी. गौतमी नारनवरे, अधिकारी. नयना गवई, आदित्य. अमरप्रताप सिंग, अधिकारी. प्रदीप जैस्वाल, अधिकारी. एम.जी. उपासे, आदित्य. गौतमी नारनवरे, अधिकारी. नयना गवई, आदित्य. नेहा सोनटक्के, अधिकारी. रंजना आयचित, अधिकारी. अनुराधा गवई, अधिकारी. संगीता जोगी, अधिकारी. शैलजा कुरेशी, अधिकारी. सुशांत पाटील, अधिकारी. यश शुक्ला, अधिकारी. अतिरिक्त. नवज्योत सोनी, अधिकारी. मृणाल मोरे, अधिकारी. लोकेश पवनकर, अधिकारी. प्रिया ठाकरे, अधिकारी. कुमार पवनीकर, अधिकारी जी. डी. मान्य आहे, आदित्य. राजू कडू, आदित्य. डी. जी. रामटेके आदी अनेक वकील उपस्थित होते.

## जुगार धाडीत १० जणांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

बाळाभाऊपेठ परिसरातील माता मंदिराच्या प्रांगणात जुगार खेळणाऱ्या 10 जुगाऱ्यांना पाचपावली पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर धाड टाकून अटक केली. अमोल ज्ञानेश्वर शंभरकर (35) रा. संत गजाननगर, हुडकेश्वर, सिद्धार्थ नरेश शेंडे (35), अमोल नरेश शेंडे (32), अरुण विठोबा सहारे (55), सुभाष शेषराव ठाकरे (35), सुनील शामराव ठाकरे (43), गोपाल लाला प्रजापती (53), गोविंदा गोदरू सहारे (44) सर्व रा. बाळाभाऊपेठ, आकाश सुखदेव तळेवाले (34) रा. बिनाकी मंगळवारी आणि विनोद मतगंजन शाहू (38) रा. लाभ लक्ष्मीनगर, कळमना अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

बाळाभाऊपेठच्या गणोबावाडीत दुर्गा माता मंदिराच्या प्रांगणात काही लोक जुगार खेळत असल्याची माहिती मंगळवारी रात्री 9 वाजताच्या सुमारास पाचपावली पोलिसांना मिळाली होती. वरील आरोपी ताश पत्त्यांवर बाजी लावताना रंगेहात सापडले.

## चोरांचा रोकड व दागिन्यांवर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

वेगवेगळ्या घटनांमध्ये चोरट्यांनी दोन घरांचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांसह एकूण 4 लाख रुपयांच्या मालावर डल्ला मारला. पहिली घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत उप्पलवाडीच्या एनआयटी क्वॉर्टर परिसरात घडली. पोलिसांनी चित्तरंजन विद्याधर अवनिकर (64) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

चित्तरंजन लष्करातून सेवानिवृत्त आहेत. सध्या ते समतानगरच्या एका चर्चमध्ये पादरी आहेत. रविवारी सकाळी 10 वाजताच्या सुमारास चित्तरंजन हे पत्नी उषा आणि मुलगा सॅम्युअल यांच्यासोबत चर्चमध्ये गेले होते. कार्यक्रम असल्याने ते चर्चमध्येच थांबले. ही संधी साधून अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील सोन्याचे दागिने व रोख 5,500 रुपयांसह एकूण 2 लाख रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास अवनिकर कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले.

दुसरी घटना जरीपटका ठाण्यांतर्गत अंबादे लेआऊटच्या कोहीनूर सोसायटीत घडली. पोलिसांनी रजत राहू लाहोरिया (26) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रजत हा मिहानच्या एएआर-इंडामेर कंपनीत काम करतो. रविवारी दुपारी 12 वाजताच्या सुमारास रजत घराला कुलूप लावून आईसोबत बाहेर गेला होता. दिवसाढवळ्या चोरांनी त्याच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील रोख 50 हजार आणि दागिने असा एकूण 2 लाख रुपयांचा माल चोरी करून पसार झाले. रात्री 10 वाजताच्या सुमारास रजत घरी परतला असता चोरी झाल्याचे समजले.

## बोगस कागदपत्रांद्वारे भूखंड हडपण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून भूखंड हडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रॉपर्टी डीलर्सविरुद्ध बेलतरोडी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. हरीदास बळीराम गायकवाड (67) रा. चंद्रमणीनगर, विजय पुरूषोत्तम घोडके (40) आणि रितेश श्रीराम घोडेस्वार रा. न्यू कैलाशनगर अशी आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी प्रशांत कोठीराम हाडके (43) रा. स्वावलंबीनगर यांचे आजोबा सुखदेव हाडके यांनी 1988 साली मौजा बेलतरोडीच्या खसरा क्र. 140 च्या पटवारी हल्का नंबर 38 मध्ये पुंडलिक, अनिल आणि मिलिंद यांच्याकडून शेतजमिनीचा चार एकर भाग 92 हजार रुपयांत खरेदी केला होता. तर उर्वरित साडेचार एकर भाग चुडामन महाजन यांनी खरेदी केला होता. जमिनीची दोन भागात विभागणी करण्यात आली. सातबारावर फेरफार करून महाजन यांनी आपले नाव चढवून घेतले, मात्र प्रशांतच्या आजोबांचे नाव पटवारीने चढवले नव्हते. याचा फायदा पुंडलिकच्या बहिणीचा मुलगा हरीदास याने घेतला. त्याने आई अंजनाबाई गायकवाड हिच्याशी संगणमत करून जुन्या सातबाराच्या आधारावर बनावट कागदपत्र तयार केले आणि जमीन स्वतःच्या नावावर करून घेतली. आरोपींनी संगणमताने प्रशांत आणि इतर वारसांच्या नावावर असलेल्या जमिनीवर अवैधरित्या ताबा करण्याचा प्रयत्न केला.

## समाजाच्या समस्यांचे औषध म्हणजे मनुष्य निर्माण : डॉ.वृषाली जोशी




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

समाज घटक हा विमर्षामुळे प्रभावित झालेला आहे. त्यावरील उपाय फक्त भारतात आहे. त्यासाठीं त्यांनी ६-भ लक्षात ठेवण्यास सांगितले आहे. भाषा, भुषा, भोजन,भजन,भ्रमण, भवन यामधून भारतीय विचारधारेचे महत्व सांगितले आहे. त्याचे पालन न केल्याने भेद निर्माण होतो. समोर जाणाऱ्या पिढ्यामध्ये आपल्या संस्कृतीचे रक्षण,विश्वाचे कल्याण करावे.

भारत हा वेगळा नसून समाजाप्रती समर्पण असणारा देश आहे. चांगला समाज घडविण्यासाठी चांगले विचार, चांगले आचरण व सकारात्मक विचार असणे गरजेचे आहे. भारत निर्माण करायचा असेल तर भा-म्हणजे भगवतगीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचे अनुसरण करणे व त्याचे पालन करणे हि पुढे जाणाऱ्या पिढ्यांची जबाबदारी आहे, असे उद्बोधन केले.

विश्वमांगल्य सभेच्या अखिल भारतीय संघटन मंत्री मा.डॉ.वृषाली जोशी यांनी पहिले पुष्प गुंफताना भारतीय समाजव्यवस्थे समोरील आव्हाने व उपाय या विषयावर बोलताना व्यक्त केले. त्या सेवासदन शिक्षण संस्थेद्वारा आयोजित कै.डॉ. वसंतराव वांकर व कै.डॉ. कुसुमताई वांकर पुरस्कृत 39 व्या रमाबाई रानडे स्मृती व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पात प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाला मंचावर सेवासदन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री कांचन गडकरी, सचिव मा.वासंती भागवत, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ.जेरील बानाईत उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व माता सरस्वती, वांकर दांपत्य व रमाबाई रानडे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आली. हायस्कूल विभागाच्या विद्यार्थ्यांनी यावेळी प्रज्ञाविवर्धन स्तोत्र सादर करून कार्यक्रमाचा श्री गणेशा केला कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जेरील बानाईत यांनी संस्थेच्या चढत्या कायार्चा आलेख मांडला व चांगले सुसंस्कृत विद्यार्थी घडवण्याची परंपरा यापुढेही कायम राहील. आचरणात सकारात्मकता आणल्याने समाजसमोर जाईल असे उद्बोधन केले.

कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.रिद्धी सहारे हिने "विश्व मे गुंजे भारती" हे वैयक्तिक गीत सादर केले. कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष बापू भागवत, डॉ. समय बनसोड, सहसचिव डॉ. कल्पना तिवारी (उपाध्याय), आजीव सभासद मंडळाच्या कार्यवाह डॉ. मंजिरी पाठक, डॉ.मनीषा यमसनवार, संस्थेचे कार्यकारी अधिकारी बाळकृष्ण सुरतने,संस्थेचे पदाधिकारी, विश्व मांगल्य सभेचे सदस्य, मान्यवर पालक उपस्थित होते.

## विधानसभा कामकाजासाठी शिपाई, संदेशवाहक या पदाकरिता आज मुलाखत

**नागपूर** : महाराष्ट्र विधिमंडळाचे आगामी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे होत आहे. या अधिवेशनाच्या कार्यालयीन कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरूपात लिपिक-टंकलेखकाची 10 पदे आणि शिपाई/संदेश वाहक यांची 24 पदे भरण्यात येणार आहेत. शिपाई / संदेशवाहक या पदाकरिता दिनांक 5 डिसेंबर रोजी सकाळी 11.30 वाजता विधानभवन नागपूर येथे मुलाखत असल्यामुळे सर्व उमेदवारांनी मुलाखतीकरिता मूळ कागदपत्रासह वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन सहायक आयुक्त सुनंदा बजाज यांनी केले आहे. याचबरोबर लिपीक-टंकलेखक पदासाठी सुद्धा पात्र उमेदवारांनी दिनांक 3 डिसेंबर रोजी कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह अर्ज करावेत, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

लिपिक-टंकलेखक या पदासाठी शैक्षणिक अर्हता कमीत कमी 12 वी उत्तीर्ण, टाईपिंग इंग्रजी 40 तर मराठी 30 श. प्र.मि., एमएससीआयटी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. शिपाई / संदेशवाहक पदासाठी कमीत कमी 4 था वर्ग उत्तीर्ण किंवा उच्च अर्हता आवश्यक असणार आहे.

लिपिक टंकलेखक आणि शिपाई पदाकरिता खुला संवगार्साठी वयोमयार्दा 18 ते 38 वर्ष आणि मागास वगार्साठी 18 ते 43 वर्ष (5 वर्षे नियमाप्रमाणे शिथिलक्षम) इतकी आहे.

इच्छुक पात्र उमेदवारांचे अर्ज 3 डिसेंबर पर्यन्त कार्यालयीन वेळेत सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत क्रमांक 2, दुसरा माळा, सिविल लाईन्स, नागपूर 440001 येथे स्वीकारले जातील. उमेदवारांनी कार्यालयात अजार्चा नमुना घेण्यासाठी येताना सोबत छायाचित्रे, शैक्षणिक तसेच इतर आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत.

शिपाई / संदेशवाहक या पदाकरिता मुलाखत दिनांक 5 डिसेंबर रोजी सकाळी 11.30 वाजता विधानभवन नागपूर येथे असल्यामुळे सर्व उमेदवारांनी मुलाखतीकरिता मूळ कागदपत्रासह वेळेवर उपस्थित राहावे. लिपिक-टंकलेखक या पदाकरिता होणाऱ्या मुलाखतीबाबत अधिवेशनाचा दिनांक निश्चित झाल्यानंतर कळविण्यात येईल. अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास विभाग, प्रशासकीय भवन क्र.2, दुसरा मजला, सिव्हील लाईन्स, नागपूर-440001 येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# धर्मराजने गाठला अपारचा शतप्रतिशत टप्पा

## शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते मुख्याध्यापक व शाळेचा गौरव

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. ४ :



शालेय शिक्षण विभागाच्या वतीने पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अपार आयडी लागू केली आहे. जिल्ह्यात याचे काम संथगतीने सुरू असताना धर्मराज प्राथमिक शाळा कांद्री-कन्हानने मात्र मुदतीच्या आत शतप्रतिशत टप्पा गाठून सुखद धक्का दिला आहे.

शिक्षणाधिकारी कार्यालयात प्राथमिक शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळूसे व माध्यमिक शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार यांच्या हस्ते पारशिवनी तालुक्यातील कांद्री-कन्हान येथील धर्मराज प्राथमिक शाळेला अपार अभिनंदन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी शिक्षणाधिकारी काळुसे यांनी शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा तपशील, गुणपत्रिका, विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सोयी-सुविधा, शाळाबाह्य विद्यार्थी व अध्यार्तून शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करून त्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात त्यांच्या आणण्यासाठी आता अपार (ॲटोमेटेड पर्मनंट ॲकेडमिक रेजिस्ट्री) आयडी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. डिजीलॉकरच्या मदतीने अपारमधून सर्व शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या नोंदी पाहता येतील, असे सांगितले.

शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांचा 'अपार आईडी चा आदेश काढला आणि इयत्ता १ ते १२ वी पर्यंतचे सर्वच जिल्हा परिषद, खासगी अनुदानित शिक्षक विद्यार्थी यांच्या पालकांचे आधार कार्ड गोळा करत अपार आईडीच्या कामाला लावले आहे. मात्र शासकीय व निमशासकीय शाळांमध्ये युनिक आयडी ऑटोमेटेड परमनंट ॲकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री (एपीएआर) तयार करण्याचा कामाला गती मिळत नाही,

अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याही परिस्थितीत ग्रामीण भागातील सर्वांत मोठी पटसंख्या असलेली पारशिवनी तालुक्यातील धर्मराज प्राथमिक शाळा, कांद्री-कन्हान येथील मुख्याध्यापक खिमेश बढिये यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांनी नियोजनबद्ध काम करुन ३० नोव्हेंबर २०२४ या अंतिम दिवसाच्या अगोदरच १०० % काम करुन अपार आयडी तयार करुन आघाडी घेतली.

शिक्षणाधिकारी कार्यालयात निर्धारित वेळेत अपार आयडीचे काम पूर्ण केल्याबद्दल प्राथमिक शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळूसे व माध्यमिक शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार मॅडम यांच्या हस्ते धर्मराज प्राथमिक शाळा, कांद्री -कन्हानचा स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हा पुरस्कार शाळेच्या वतीने मुख्याध्यापक खिमेश बढिये यांनी स्विकारला.

यावेळी शाळेतील सहकारी शिक्षक भिमराव शिंदेमेश्राम, गणेश खोब्रागडे, जिल्हा डाटा एन्ट्री समन्वयक तेजराम येनसकर, मुख्य लिपीक योगेश राठोड यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

धर्मराज प्राथमिक शाळेने अपारचा यशस्वी टप्पा गाठल्याबद्दल संस्थेचे संचालक श्री खुशालराव पाहुणे, उप शिक्षणाधिकारी निखिल भुयार, पारशिवनी खंडविकास अधिकारी जाधव, पारशिवनी गट शिक्षणाधिकारी कैलास लोखंडे, शिक्षण विस्तार अधिकारी सुनील कोडापे, प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख लता माळोदे यांनी अभिनंदन केले आहे.

# समर्थ कॉन्व्हेंट येथे सोशल मीडिया आणि सायबर जनजागृती कार्यक्रम




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

केडीके कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग नागपूरच्या एमसीए आणि बीसीए विभागाच्या विद्यार्थ्यांने सायबर जनजागृतीवर तज्ञ भाषण केले. विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे फायदे आणि तोटे आणि वापर यावर चर्चा केली. समर्थ कॉन्व्हेंट नागपूर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.अश्विनी वाकोडीकर यांनी केले. डॉ. अनुप भांगे विभागप्रमुख, प्राचार्या ममता मिंगरे प्राचार्य समर्थ कॉन्व्हेंट नागपूर, डॉ. व्ही.पी. वर्गीस प्राचार्य डॉ.ए.एम.बदर उपप्राचार्य केडीके महाविद्यालय यांनी या कार्याचे कौतुक केले.

राजेंद्र बी.मुळक, सचिव, बीसीवाईआरसी आणि यशराज आर. मुळक, खजिनदार, बीसीवाई आरसीयांनी हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल विभागाचे कौतुक केले.

# निलडोह येथे एड्स जनजागृती दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ४ :

उज्वल सामाजिक बहुउद्देशीय संस्थे द्वारा १ डिसेंबर रविवारी जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ उमरे तसेच डॉ हेमंत जुनेजा यांनी युवकांना एचआयव्हीच्या संक्रमणाबाबत व एचआयव्ही रोगाबाबत संपूर्ण मार्गदर्शन केले तसेच त्यांनी मार्गदर्शनावेळी युवकांना सांगितले की एच आय व्ही हा रोग कुठल्याही व्यक्तीच्या स्पशार्ने किंवा सोबत जेवल्याने किंवा त्याच्या सहवासात फिरल्याने होत नाही तर तो होतो दुसऱ्या व्यक्तीचे संक्रमित रक्त घेतल्याने, अनैतिक संबंधाने, किंवा एकाच सिरींजचा अनेक व्यक्तींवर वापर झाल्याने तरी युवकांनी एचआयव्ही बाधित व्यक्तींशी दुरावा न ठेवता त्यांच्याशी प्रेमाने वागावे, व धीर द्यावा त्यांना पण प्रेमाची गरज आहे, असे ते बोलतांना सांगितले.

या अभियानात उज्वल सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष, उज्वल हॉस्पिटल चे संचालक डॉ शितल उमरे तसेच डॉ नीतू हेड़ाऊ, डॉ सिद्धार्थ जैन, डॉ प्रसन्ना मून, डॉ हेमंत जुनेजा डॉ सविता राठोड डॉ रोहित कानिंदे डॉ ओम भुत्तमवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भुपेंद्र हरिनखेडे, अंजना गणेशप्रसाद तिवारी, आचल अशोककुमार मिश्रा, आचल ठाकरे,निशिका गौतम, ज्योती राम, शालू सिंह, प्रियंका चंद्रवंशी, खुशी हरिनखेड़े, श्रुति वाघमारे, सेजल बुराडे, सलोनी, खुशबू, अंजली, अनीश, राकेश, गंगासागर आदींनी परिश्रम घेतले.

# लोकजीवन शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी,
बेला, दि. ४ :



लोकजीवन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केलेल्या विविधरंगी कला व नयनरम्य वेशभूषेतील डान्सने प्रेक्षक विद्यार्थी, पालक व शिक्षक बेहद खुश झाले. तीन दिवशीय संमेलनाचे उद्घाटन नागपूर जि.प.च्या अध्यक्ष मुक्ता कोकुडे यांनी केले.

याप्रसंगी जि. प.सदस्य वंदना बालपांडे, पं.स.सदस्य पुष्कर डांगरे,सरपंच अरुण बालपांडे, केंद्रप्रमुख मधुकर पजई, संस्थाध्यक्ष वर्षा बाभुळकर, सचिव सुबोध देशमुख, प्राचार्य सुनील मुलेवार,सीमा बूचे, राजीव देशमुख व अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यक्रम पाहिल्यानंतर लोकजीवनच्या मुला-मुलींमध्ये उपजत सुप्त कलागुणांचा उत्कृष्ट खजिना आहे. असे मत कोकुडे यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. प्राचार्य सुनील मुलेवार यांचा सेवानिवृत्तीपर शाल, श्रीफळ देऊन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. वर्किंग मॉडेल, विजेची बचत, अपघात नियंत्रक, कचऱ्याची विल्हेवाट, विद्युत निर्मिती अशा प्रकारच्या अनेक प्रतिकृती विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केल्या. माजी विद्यार्थी सुमित जैन यांनी गुणवंत विद्यार्थ्यांसाठी रोख 21 हजार रुपयाचे पारितोषिक देण्याचे जाहीर केले.

वेदांत दांडेकर या विद्यार्थ्याने काढलेली स्व. चंपतराव देशमुख यांची हुबेहूब रांगोळी पहायला मिळाली. संस्थेच्या हितचिंतक नीलिमा आमडे यांनी पंच्याहत्तरी ओलांडल्याबद्दल त्यांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. स्नेहभोजनाने संमेलनाची उत्साहात सांगता झाली.

समारोपीय कार्यक्रमास बुलारामजी तळवेकर, दिलीप काळे, दिलीप खरबडे, सुरज कांबळे, राजेश लोहकरे, मनीषा लोहकरे, रमेश लांबट,प्रशांत लोहकरे, रमेश लांबट, प्रशांत लोहकरे, रमेश नरड, ओमप्रकाश राठोड, हेमलता बापट, दादा शेंडे उपस्थित होते. श्रद्धा साळवे व माधुरी रणनवरे यांनी संचालन केले तर उप प्राचार्य नितीन पुरी यांनी आभार मानले. लक्ष्मण खोडके यांनी पसायदान म्हटले.

# विश्वमांगल्य सभेची अखिल भारतीय बैठक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

विश्वमांगल्य सभेची अखिल भारतीय बैठक खंडेलवाल इंग्लिश प्रायमरी सरस्वती शिशु मंदिर, अकोला, महाराष्ट्र येथे संपन्न झाली. या बैठकीला १२ प्रांतातून १०५ कार्यकर्त्या उपस्थित होत्या. ही विशेष बैठक सदाचार सभा- विश्वमांगल्य सभेची मूलभूत कार्यपद्धती या विषयवर आधारित होती. या बैठकीला विश्वमांगल्य सभेच्या राष्ट्रीय अध्यक्षा रेखादेवी खंडेलवाल, राष्ट्रीय सह संघटन मंत्री गायत्री लोमटे, राष्ट्रीय सदाचार सभा संयोजिका सोनिया तऱ्हाळकर, विदर्भ प्रांत संघटन मंत्री तेजसा जोशी उपस्थित होत्या.

बैठकीचे उद्घाटन तारा हातवळणे यांच्या हस्ते झाले. विशेष आमंत्रित अर्चना शर्मा बैठकीला उपस्थित होत्या. बैठकीचे संचालन जानवी देशपांडे यांनी केले तथा आभार प्रदर्शन स्थानिक अध्यक्ष निशा डावरी यांनी केले. तारा यांनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. कार्यकर्त्यांनी अधिक वेळ आणि मैत्री भाव ठेवून कार्य करावे.

# सोनेगाव जि.प.उच्च शाळेत राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा




■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ :

सोनेगाव ( निपाणी ) जि.प. उच्च प्राथमिक शाळेत राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला. जि.प.सदस्या तथा माजी शिक्षण सभापती भारतीताई पाटील यांच्या हस्ते जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या.

यावेळी सरपंच तेजस्विनी धुर्वे, व्याहाड प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. हर्षदा फटिंग, मुख्याध्यापिका निलीमा कामथे, आरोग्य सेवक वरुण भोयर शिक्षिका हर्षा कट्यारमल, आशा वर्कर माधुरी भांडे,मनिषा भवसागर, सुनंदा धोटे, सुनंदा वाघाडे व शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी जि.प सदस्या भारती पाटील यांनी विद्यार्थीना नियमित शाळेत येणे, लवकर उठणे नियमित अभ्यास करणे शिक्षकांचे वआई वडीलांचे ऐकणे याबाबत मार्गदर्शन केले. डॉ.फटिंग यांनी हात धुणे व नियमित नखे कापणे याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका सुजाता भानसे यांनी तर आभार विषय शिक्षक दीपचंद पेंडकांडे यांनी मानले.

# डबल हेलमेटसक्ती रद्द करा



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ४ :

## हिंगणा ग्राहक पंचायतचे निवेदन

पोलीस उप आयुक्त, वाहतूक, नागपूर शहर यांनी दुचाकीस्वार व पिलीयन रायडर (मागे बसलेला इसम) यांना सुद्धा हेलमेट सक्तीचे आदेश निर्गमीत केलेले आहे. त्यामुळे जनतेमध्ये तिव्र असंतोष पसरलेला आहे.तेंव्हा मागे बसलेल्या इसमासाठी केलेली हेलमेट सक्ती ताबडतोब रद्द करावी. याकरिता हिंगणा तालुका ग्राहक पंचायतच्या वतीने हिंगणा तहसीलदार सचिन कुमावत यांना निवेदन देण्यात आले.

अ.भा.ग्राहक पंचायत विदर्भ प्रांत सदस्य विनायक इंगळे गुरुजी व जिल्हा उपाध्यक्ष हाजी बब्बुभाई शेख यांच्या मार्गदर्शनात निवेदन देण्यात आले. याप्रसंगी हिंगणा तालुका अध्यक्ष गोविंदराव बुधे, सचिव पांडुरंग काळे, ॲड.अर्चना सोनारे, महीला प्रमुख शालिनी मनोहर, निलीमा गोबाडे, प्रज्ञा रामटेके, राजेश भुते, बाबुलाल तामगाडगे, वसंता राडे उपस्थित होते. मोटार वाहन कायदा 1988 कलम 128 व 129 मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार पिलीयन रायडर म्हणजे मागे बसलेल्या इसमाला सुद्धा हेलमेट परिधान करणे अनिवार्य आहे परंतु उल्लंघन केल्यास वाहतुक विभागाच्या वतीने नमुद मोटार वाहन कायद्याची सक्तीने अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे नागपूर शहर वाहतुक पोलीस उप आयुक्त अर्पित चांडक यांनी कळविले आहे.

# जनतेच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी सदैव कटिबद्ध : राजेंद्र मुळक



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ४ :

दि.२ डिसेंबर ला सोमवार रोजी देवलापर येथील जनसंपर्क कार्यालयात माजी मंत्री राजेंद्र मुळक यांचा जनता दरबार आयोजित करण्यात आला होता. भेटीसाठी आलेल्या नागरिकांनी आपले प्रश्न त्यांच्यासमोर मांडले. जनतेचे प्रश्न जाणून घेत त्यांचे तात्काळ निवारण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधीत विभागाला दिल्या.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत रामटेक मतदार संघातील जनतेने दिलेला पाठिंबा आणि विश्वास याबद्दल त्यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

यावेळी उपस्थित नागरिकांनी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या आपुलकीने त्यांचे स्वागत केले. 'रामटेक मतदारसंघातील प्रत्येक गावच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कार्यरत राहीन' अशी ग्वाही यावेळी त्यांनी उपस्थितांना दिली. यावेळी कांग्रेस चे रामटेक तालुका अध्यक्ष कैलास राऊत,जिल्हा परिषद सदस्या शांताताई कुमरे सह आदी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# भाजपातर्फे मुख्याधिकारी संदीप बोरकर यांचे स्वागत



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ :

वाडी नगर परिषदचे नवीन कार्यरत मुख्याधिकारी संदिप बोरकर यांचे भाजपा वाडी मंडळाच्या वतीने पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. त्यांच्याकडुन सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली असुन कायम स्वरूपी कार्य करण्यात आम्ही सहकार्य करू असे आश्वासन भाजपा वाडी मंडळाचे अध्यक्ष आनंदबाबु कदम यांनी केले.

यावेळी भाजपा ट्रान्सपोर्ट आघाडी जिल्हाध्यक्ष बिमलेश सिंह, अनु-जाती मोर्चा जिल्हा महामंत्री दिनेश कोचे, ओबीसी आघाडी जिल्हा महामंत्री केशव बांदरे, महिला आघाडी जिल्हा महामंत्री सरीता यादव,वाडी मंडळ औद्योगिक आघाडी अध्यक्ष गोविंदराव रोडे, मंडळ उपाध्यक्ष कमल कनोजे,अनु-जाती मोर्चा अध्यक्ष योगेश शेंडे, मंडळ युवा मोर्चा जिल्हा मंत्री अक्षय तिडके, युवा मोर्चा वाडी मंडळ अध्यक्ष ईशांत राऊत, ओबीसी महिला आघाडी मंडळ अध्यक्षा ज्योती भोरकर, मंगला पडोळे, ऊमीर्ला चौरसिया, ट्रान्सपोर्ट आघाडी मंडळ अध्यक्ष जयदेव शेवरान, अमरेंद्र सिंह, चंद्रशेखर देशभ्रतार, अभय कुणावार रामप्रसाद पटले, विशाल डोंगरे, राहुल तायडे, लिलाधर भोयर, सुधीरसिंह राणा, पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.


## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपुर

एम.जे.सी नं. १०६/२०२४
पे.ता.: १०/०१/२०२५
प्रोसेस नं १८६४/२०२४

Applicants : 1. Sunil Bharatlal Gupta, Aged 63 Years, Occu. Business, R/o. Jai Stambh Chowk, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
---- V/S ----
Non applicant :- NIL.

मयत:-Late Smt. Sundarabai Rambharose Gupta, मयत दि २६/०७/२००६, ठिकाण-जयस्तंभ चौक, कामठी,

सदरहू अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Late Smt. Sundarabai Rambharose Gupta, मयत दि २६/०७/२००६ याचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. १०/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० बाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराना Late Smt. Sundarabai Rambharose Gupta, यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ३/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/काबि- /२०२४
दि.: / /२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ ५) आशा परसराम पाटील यांचा अर्ज दिनांक .................

ज्याअर्थी अर्जदार यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अशा परसराम पाटील यांच्या जन्मदिनांक २३/०८/१९७० रोजी राहते घरी मिशन मोहल्ला इंदोरा जरीपटका नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी उपविभागीय दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

## जाहीरनामा

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक, नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र. / एम आर सी-८१/२०२४
मौजा खैरी ता. रामटेक, जिल्हा नागपूर

ज्याअर्थी सोनिया नंदकिशोर कुकुडीया रा. मनसर माईन पो. खैरी बिजेवाडा ता. रामटेक जि. नागपूर यांनी स्वतः नामे सोनिया नंदकिशोर कुकुडीया यांचा जन्म दिनांक ०४.११.१९९८ रोजी मौजा मनसर माईन पो. खैरी बिजेवाडा ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा येथे केली नाही. त्याबाबत ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा यांनी दिनांक २३.१०.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे सोनिया नंदकिशोर कुकुडीया यांचा जन्म दिनांक ०४.११.१९९८ बाबत ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद सोनिया नंदकिशोर कुकुडीया यांचा जन्म दिनांक ०४.११.१९९८ बाबत ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तकार असल्यास आपण दिनांक १३/१२/२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०३/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक : ०३/१२/२०२४

(भोजराज बडवाईक)
नायब तहसिलदार,
रामटेक

## जाहीरनामा

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक, कार्यकारी दंडाधिकारी, रामटेक यांचे न्यायालय

प्र. क्र. २१ / एम आर सी-८१/२०२४
मौजा महादुला तालुका रामटेक

ज्याअर्थी अर्जदार जमुना ध्वजाराम चौव्हान वय २२ वर्ष रा. लोहारा यांनी त्यांचा जन्म दिनांक ०९.०४.२००२ रोजी राहते घरी मौजा लोहारा तालुका रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदाराचे जन्माची नोंद संबधीत नगर परिषद / ग्राम पंचायत कार्यालय महादूला येथे केली नाही. त्या बाबत ग्रामपंचायत/नगर परिषद महादुला यांनी प्रमाणपत्र दिले आहे. करीता नामे जमुना ध्वजाराम चौव्हान यांचा जन्माची नोंद नगर परीषद/ग्रामपंचायत महादुला ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते को, उपरोक्त जमुना ध्वजाराम चौव्हान वय २२ रा. लोहारा त्यांचा जन्म दिनांक ०९.०४.२००२ ची नोंद ग्रामपंचायत लोहारा तालुका रामटेक जिल्हा नागपूर येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १७.१२.२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०२/१२/२०२४ रोजो माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक : ०२/१२/२०२४

(भोजराज बडवाईक)
कार्यकारी दंडाधिकारी,
रामटेक

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/काबि- /२०२४
दि.: / /२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा [illegible]

[illegible]

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/काबि- /२०२४
दि.: / /२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा [illegible]

[illegible]

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/काबि- /२०२४
दि.: / /२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा [illegible]

[illegible]

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

## -: जाहिरनामा :-

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/काबि- /२०२४
दि.: / /२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा [illegible]

[illegible]

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

# शाळकरी मुलांकरिता जंतनाशक गोळ्यांचे वितरण

## मुलांमध्ये जंतसंसर्ग टाळण्याकरिता जंतनाशक गोळी आवश्यक : संजय डांगोरे

■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. ४ :

जंतामुळे मुलांना रक्तक्षय, पोटदुखी, मळमळ, भूक मंदावणे यासोबतच कुपोषण, मुलांची वाढ खुंटावणे, जंत संसर्ग जर तीव्र स्वरूपाचा किंवा दीर्घकाळ असेल तर मुले सारखी आजारी पडणे व शिक्षणात त्यांचे लक्ष न लागणे असे दुष्परिणाम जंतसंसगार्मुळे मुलांमध्ये होतात, याकरिता शासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून १ ते १९ वर्ष वयोगटातील काटोल तालुक्यातील १९० अंगणवाडी केंद्र, ११७ प्राथमिक शाळा, ४१ माध्यमिक शाळा, ५ आश्रम शाळाचे माध्यमातून आरोग्य विभागाच्या वतीने एकूण १९,४३५ मुला मुलींना आज दि,. 4 डिसें ला राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या दिवशी जंत संसर्ग टाळण्याकरीता जंतनाशक औषध खाऊ घालण्यात येणार आहे.

मुले कुपोषित होऊ नये, मुलांना रक्तक्षय होऊ नये याकरिता आपण सर्वांनी व पालकांनी



मुलांना जंतनाशकाची गोळी खाऊ घालून जनजागृती करण्याचे आव्हान काटोल पंचायत समितीचे सभापति संजयजी डांगोरे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कचारी सावंगा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र च्या वतीने आयोजित तालुकास्तरीय जंतनाशक दिनाचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विचार व्यक्त करून आव्हान केले.

यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष गोपालजी डिवरे अध्यक्ष शिक्षण समिति कचारी सावंगा तर प्रमुख अतिथि म्हणून संजयजी डांगोरे सभापती पंचायत समिती काटोल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशांक व्यवहारे , डॉक्टर कादंबरी उबरहांडे, डॉ. प्रशांत नागपुरे, कांतेश्वरजी पाटील, देवराव मानकर, रवीनाताई निशाने, वैशाली खुरपुडे, कविता कोहळे, आम्रपली पाटील, ग्राम पंचायत समिति सदस्य / शिक्षण समिति सदस्य कचारी सावंगा तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पनाताई मुसळे यांचे उपस्थितीत पार पडला.

जंतनाशक मोहीम ही सर्वच शाळा,यावेळी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, शिक्षक यांचे माध्यमातून खाऊ घातल्या जाणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ शशांक व्यवहारे, संचालन राजू बगवे सर तर आभार प्रदर्शन प्रशांत विरखरे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीते करीता सोनाली चव्हाण शाळेचे शिक्षक सोबत प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी प्रताप वाडबुदे, शुभम सोरते, पद्मिनी राव, मनमथ जायवार, विकास सानप, आंचल नगमोते, मेघा नागपुरे, सारिका धोटे यांनी परिश्रम घेतले.

# एस.व्ही. नरसेकर यांनी वेट लिफ्टिंग स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २ :

20 वी अखिल भारतीय बीएसएनएल / डबलू एल / पीएल/ बीपी स्पर्धा 2023-25 चे आयोजन इरठछ गुवाहाटी, आसाम येथे आसाम सर्कल स्पोर्ट्स अँड कल्चरल बोर्डाच्या अंतर्गत करण्यात आले होते. अखिल भारतातील 11 टेलिकॉम (बीएसएनएल) मंडळातील एकूण 45 खेळाडूंनी वेट लिफ्टिंग/पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत भाग घेतला.

कळविण्यास अतिशय आनंद होत आहे की, बीएसएनएल नागपूरचे एक खेळाडू एस.व्ही. नरसेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक नागपूर यांनी तृतीय क्रमांक मिळवून पॉवर लिफ्टिंगच्या ८३ किलो गटात कांस्यह्व पदक मिळवले. 17 व्या अखिल भारतीय बीएसएनएल / डबलू एल / पीएल/ बीपी स्पर्धेत 2017 मध्ये त्याच प्रकारात त्याला "कांस्य" पदक देखील मिळाले. धंतोली येथील प्रसिद्ध आणि 110 वर्षे जुन्या "कहाते गोखले" व्यायामशाळेचे ते खेळाडू आहेत.

बीएसएनएल नागपूरच्या वतीने यश पान्हेकर, नम्रता तिवारी, बीबीएनएल, नागपूर, प्रशांत गणवीर, उपमहाव्यवस्थापक, एस त्यांच्या विजयाबद्दल अभिनंदन केले.

## बजरंगदल पदाधिकाऱ्याच्या वक्तव्याने खळबळ

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

बांग्लादेशात हिंदू आणि मंदिरांवरून सुरू असलेल्या हिंसाचाराविरोधात रविवारी गिट्टीखदानच्या अवस्थी चौकात विविध हिंदू संघटना आणि समाजाकडून विरोध प्रदर्शन करण्यात आले. सोबतच रॅलीही काढण्यात आली. या दरम्यान बजरंगदलाच्या पदाधिकाऱ्याने मुस्लिम समाजावर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याने एकच खळबळ उडाली आहे. समाजाकडून पोलिसात तक्रार करण्यात आली. या तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी बजरंगदल नागपूर महानगरचे संयोजन कमल हरयानीविरूद्ध धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

युवा सनातन शंखनादच्या बॅनरखाली सर्व पक्षांचे नेते आणि संघटनांनी संयुक्तरित्या बांग्लादेशात हिंदूंविरोधात सुरू असलेल्या हिंसाचारावरून संयुक्तरित्या प्रदर्शन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अवस्थी चौक ते ज्वाळा मंदिरपर्यंत रॅली काढून बांग्लादेश मुदार्बादच्या घोषणाही देण्यात आल्या. या दरम्यान हरयानी यांनी एका यूट्यूब चॅनलवर मुस्लिम समाजाविरुद्ध आक्षेपार्ह वक्तव्य केले. रियाज शेखच्या यूट्यूब चॅनलवरील हा व्हीडिओ वेगाने व्हायरल झाला आणि मुस्लिम समाजामध्ये रोष पसरला. सोमवारी समाजाच्या लोकांनी डीसीपी राहुल मदने यांची भेट घेऊन निवेदन दिले आणि हरयानीविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची मागणी करण्यात आली.

तसेच युट्यूबवर हा आक्षेपार्ह व्हीडिओ व्हायरल करणाऱ्या रियाजविरुद्धही रोष व्यक्त करीत गुन्हा नोंदविण्याची मागणी केली. मदने यांनी कारवाईचे आश्वासन दिले. त्यानंतर गिट्टीखदान पोलिसांनी बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. या रॅलीदरम्यान काँग्रेस नेते शैलेष पांडे यांचाही व्हीडिओ युट्यूबवर जोडण्यात आला. याविरोधात पांडे यांनीही रियाजविरुद्ध गिट्टीखदान ठाण्यात तक्रार दिली.

# प्राचार्य मुलेवार यांना भावपूर्ण निरोप



■ महासागर प्रतिनिधी,
बेला, दि. ४ :

लोकजीवन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील मधुकर मुलेवार नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्य त्यांचा स्नेह संमेलनात शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन संस्था सचिव सुबोध देशमुख यांनी सत्कार केला. यावेळी उपाध्यक्ष राजीव देशमुख, माजी वैद्यकीय अधिकारी सीमा बूचे,माजी विद्यार्थी सुमित जैन व अनेक मान्यवर उपस्थित होते. निवृत्तीमुळे सेवाजेष्ठतेनुसार प्रा. नितीन पांडुरंग पुरी यांची शाळेच्या प्राचार्य पदी नेमणूक करण्यात आली.

मुलेवार विज्ञान शाखेच्या अकरावी, बारावीतील विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र उत्तम शिकवत. असे विद्यार्थी सांगतात. त्यांनी आपल्या उत्कृष्ट अध्यापनातून अनेक चांगले विद्यार्थी घडविले हे शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहे, असा गौरवपर उल्लेख प्रा. नितीन पुरी, राजेश शिवरकर व लक्ष्मण खोडके यांनी आपल्या भाषणातून व्यक्त करून त्यांना संस्था व शिक्षकांच्या वतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला. माजी विद्यार्थी सुमित जैन यांनी मुलेवार यांच्याप्रति असणाऱ्या कृतज्ञतेतून बारावीत विज्ञान शाखेत प्रथम येणाऱ्यास 21 हजार व रसायन शास्त्रात सर्वोत्कृष्ट येणाऱ्या विद्यार्थ्यास10 हजार रुपयाची रोख शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली. सन 1992 ते 2024 पर्यंत 32 वर्षाची दीर्घ सेवा मुलेवार यांनी शाळा व विद्यार्थ्यांना दिली.

# शिक्षीका माया बावणे यांचा सेवापूर्ती सोहळा

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ४ :

बापू शिक्षण संस्था कान्होलीबारा द्वारा संचालित श्रीकृष्ण हायस्कूल, सावंगी (आसोला) येथील शिक्षिका माया गजानन बावणे यांचा सेवापूर्ती सोहळा पार पडला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. विनय धाबे, सचिव ॲड वंदन गडकरी संस्थेचे सर्व पदाधीकारी यांच्या प्रमुख उपस्थिती होती.



ॲड. विनय धाबे यांनी सेवानिवृत्त शिक्षिका माया गजानन बावणे यांच्या २९ वर्षे सेवेचे कौतुक करुन, शाळेच्या वतीने समानचिन्ह देवून गौरवान्वीत करण्यात आले. पुढील आयुष्यासाठी अत्यंत मार्मिक शब्दात शुभेच्छा दिल्यात. सचिव ॲड. वंदन गडकरी, म.दा सोमलकर, कोषाध्यक्ष बाबुभाई पाटीदार, डॉ. संतोषकुमार मोदी, विनोद फत्तेपुरीया, गजानन बावणे, अरुणकुमार मानकर, प्रशांत मानेकर, विलास कडु, गोरख शहाकारी, मुख्याध्यापक गजानन पोले, प्रकाश पिंपळे, गजानन थेरे, देवेन्द्र राऊत, राजेन्द्र वांदिले, विनोद परांडे, प्रभाकर अडसुळ, साजन भेदानी, नानाभाऊ पेंदाम, शिवराम बेहुने, स्मिता डहाके, जितूविंग प्रामुख्याने उपस्थित होते.

# कामठी नगर परिषद कार्यालयांत दिव्यांग दिन संपन्न



■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. ४ :

काल दिव्यांग दिनाचे औचित्य साधुन कामठी नगर परिषद कार्यालयांत दिव्यांग संस्थेच्या वतीने दिव्यांग दिनाचे कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात अध्यक्षस्थान पवन कुमार शर्मा यांनी भूषविले.

या कार्यक्रमात सर्वश्री नसीम भाई, राजेश ढोके, बापू इंगळे, प्रवीण भोकरे, अमोल कारवटकर शहर समन्वयक, जैस्वाल साहेब, रत्नमाला फटिक, माधुरी घोडेस्वार, पुजा आंग्रे, रविना चवरे, प्रज्ञा फुले, यासमीन राईन, इत्यादी मोठ्या प्रमाणांत उपस्थीत होते. शहीद स्मारक संचालिका कौशल्या शर्मा यांनी कार्यक्रम उत्कृष्टपणे संचालित केला.

# लाव्हाच्या सरपंच शपथविधी कार्यक्रमासाठी रवाना

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ४ :

महायुतीचा शपथ सोहळा डोळ्यात साठविण्यासाठी मुबंई येथे होणाऱ्या गुरुवार ५ डिसेंबर रोजी महायुतीमधील शपथविधी कार्यक्रमासाठी लाव्हाच्या सरपंच ज्योत्सना सुजित निवनवरे,माजी जि.प. सदस्य सुजित नितनवरे, शेतकरी अशोक वानखेडे, युवा कार्यकर्ता जयेश नितनवरे, देवेंद्र माथनकर, दिव्यानी फुलझेले निघाले आहे.

# ट्रायसायकल आणि वॉकिंग स्टिक्स वाटप करुन जागतिक अपंग दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी, कन्हान दि. ४ :

जागतिक अपंग दिवस निमित्य आंबेडकर चौक येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, अध्यक्ष चंद्रशेखर भिमटे, प्रमुख अतिथि नगर परिषद नगराध्यक्षा करुणा आष्टणकर सह आदि मान्यवरांचा हस्ते यांचा हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

या प्रसंगी वैद्यकीय प्रभारी हंसराज ढोके, रिंकेश चवरे, मनिष भिवगडे, अजय लोंढे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अश्विन भिवगडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता रोहित मानवटकर, आनंद चव्हान, पुरुषोत्तम रोडेकर, संदीप चिंचोलवार, बलवंत पात्रे, योगेश पात्रे, रंगराव ठाकरे, शुभम मेश्राम सह आदि ने सहकार्य केले.

# युवा बिरसा ब्रिगेड तुरागोंदीच्या वतीने क्रांतीसूर्य महामानव बिरसामुंडा यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

युवा बिरसा ब्रिगेड (तुरागोंदी) ता. हिंगणा ,नागपूर च्यावतीने रविवारी क्रांतीसूर्य महामानव बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंती निमीत्ताने रॅली काढून, सप्तरंगी झेंडा पूजन करण्यात आले. आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक, शैक्षणिक, तसेच विविध विषयावर प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

गोंडी नृत्य सादर करण्यात आलेल्या चिमुकल्यांना पाहुण्यांचा हस्ते बक्षिस वितरण करण्यात




आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अंकुश मडावी आदिवासी सामाजिक कार्यकर्ते व प्रमुख पाहुणे गगांताई टेकाम जिल्हाध्यक्षा गोंगपा, अध्यक्ष आदिवासी उडाण बहु. विकास संस्था, दिनेश सिडाम अध्यक्ष नागपूर शहर गोंगपा, सचिव आदिवासी उडाण बहु. विकास संस्था, प्रशिल कोडापे आदिवासी सामाजिक कार्यकर्ते, शुभम परतेती आदिवासी सामाजिक कार्यकर्ते, राजू लक्ष्मण सलाम (शिक्षक डिगडोह) रुपचंद इनवाते (अध्यक्ष बिरसा कृती समिती दाभा) विशेष उपस्थिती पाहुणे माधूरी लाड (सचिव गट ग्रा.पं.नेरी) आरती मडावी (अंगणवाडी सेविका तुरागोंदी) पांडूरंगजी कुळमते (माजी पोलीस पाटील तुरागोंदी) तसेच कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरीक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा बिरसा ब्रिगेडचे अध्यक्ष राहुल कौरती उपाध्यक्ष आकश कोडापे सचिव तुषार टेकाम राजु कुळमते अक्षय कोडापे प्रवीण सराटे व समस्त गावकऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. संचालन विनायक कुळमते तर आभार आरती मडावी यांनी मानले.

# श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत पारायणाची सांगता

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ :

दत्तवाडी येथील श्री गजानन महाराज मंदिरात श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत पारायणांची सांगता रविवार १ डिसेंबर रोजी करण्यात आली. यावेळी २९८ भक्तांनी पारायणात भाग घेतला होता. मंदीरात सतत सोळा वषार्पासून श्रीपाद श्रीवल्लभ पारायण व दर गुरूवारी उपासनेचा उपक्रम चालविला जात आहे.

सर्वप्रथम श्री गजानन महाराज व श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांना अभिषेक करण्यात आला. वनश्री देशपांडे यांनी श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृताची अवतरणीका वाचली.



महाआरती व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी विजय देशपांडे, वनश्री देशपांडे, लीलाधर आखरे, रजनी क्षीरसागर, महिंद्र क्षीरसागर, ज्योती खराबे, मेधा हरदास, विजय हरदास, मंगला नासरे, गजानन नासरे, संध्या नायसे, किरण वाघ, रेणुका सांबारे, सुशिल सांबारे, तिनखेडे, दाभाडकर, पद्मा ठाकरे, वनमाला कराळे, मिनल कुळकर्णी, पूजा हूसनापूरे, अमित हुसनापुरे, नीता कौंडण्य, पंकज कौंडण्य, मनोरमा चवने, सुनंदा भट्टलवार, रचना बाटवे, आशीष भट्टलवार, श्रीराम बाटवे,नंदिनी शेजवलकर, संजय जूगारे, प्रणिता जूगारे, सागर गभणे, राजश्री पाटील, शोभा व्यवहारे, प्रज्ञा पांडे, सिंधू बारंगे, अंकुश गायकवाड उपस्थित होते.

# प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राजीनामा द्यावा

## नागपूर शहर युथ काँग्रेसची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

मध्य नागपूरचे काँग्रेस उमेदवार बंटी शेळके यांच्या पराभवासाठी जबाबदार असलेल्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली नाही. मात्र बंटी शेळके कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. विधानसभा निवडणूकीत काँग्रेस उमेदवारांच्या पराभवासाठी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले जबाबदार असल्याने आता त्यांनीच राजीनामा द्यावा, अशी मागणी नागपूर शहर युथ काँग्रेसचे अध्यक्ष तौसिफ खान यांनी पत्रपरिषदेत केली. यावेळी काँग्रेस अल्पसंख्याक विभाग इरफान काझी, वरिष्ठ काँग्रेस सेवादलाचे बबन दुरुगकर, अश्रफ खान, सहदेव गोसावी, उषा खरबीकर, आकाश आदी उपस्थित होते.

विधानसभा निवडणूकीत काँग्रेस उमेदवाराच्या प्रचारासाठी पदाधिकारी मध्य नागपूरात फिरकलेच नव्हते. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह बहुतांश नेतेमंडळी पश्चिम नागपुरात होते. राज्यात काँग्रेसला केवळ १६ जागा मिळाल्या, यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले जबाबदार असल्याने बंटी शेळके यांना नोटीस पाठविण्याऐवजी उमेदवारांच्या विरोधात प्रचार केलेल्या पदाधिकाऱ्यांवर कारवाईची गरज आहे. मध्य काँग्रेसचे बंडखोर अपक्ष उमेदवार राजेश पुणेकर, कलाम हे सुध्दा शेळकेंच्या पराभवासाठी कारणीभूत असल्याने त्यांच्या कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

# बुथनिहाय मतदान यादीने गावपुढाऱ्यांची होतेयं गोची...

■ महासागर प्रतिनिधी,
मौदा, दि. ४ :

नुकताच कामठी, मौदा विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर झाले. दरम्यान या निवडणूक प्रचारासाठी उमेदवारांनी शहरासह अतिदुर्गम भागात जाऊन प्रचार केला. या गावातील पुढाऱ्यांसह विविध समाजाच्या ठेकेदारांच्या अपेक्षा पूर्ण केल्या.



त्यामुळे 'भाऊ, काही काळजी करू नका, संपूर्ण गाव तुमच्याच बाजूने', असा उमेदवाराला विश्वास त्यांनी दिला होता. आता प्रशासनाकडून बुथनिहाय याद्या जाहीर झाल्याने विजयी उमेदवारांपेक्षा पराभूत उमेदवारांनी या बुथनिहाय याद्यांचे अवलोकन सुरू केल्याने वास्तविक किती मतदान झाले हे उघड होत आहे. यामुळे अनेक गावपुढारी व समाजाच्या ठेकेदारांची गोची झाली असून ते आता चांगले तोंडघशी पडले आहेत. तसेच मौदा तालुक्यात अनेक गावांमध्ये कटुताही निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या सामाजिक माध्यमातून 'संपली निवडणूक, करा नात्यांची जपवणूक' असे संदेश व्हायरल होत असले तरी बुथनिहाय मतदान बाहेर येण्याच्या सुविधेमुळे पराभूत उमेदवार काही गावे आणि वस्त्यांवर वचपा काढण्याची असल्याने शक्यता निवडणूक आयोगाने दिलेली ही सुविधा मौदा ग्रामीण भागात वादाचे कारण ठरण्याची भीतीही व्यक्त होत आहे. निवडणूक प्रचाराच्या काळात अनेक गावे आणि वस्त्यांमध्ये अमुक कामे करून द्या किंवा एखाद्या कामासाठी अमुक निधी आताच द्या, सगळे मतदार तुमच्या पाठीशी उभे राहतील, असे आश्वासन दिले.

तसेच आमचा समाज खूप मोठा असून, गठ्ठा मते असल्याने समाजासाठी काही तरी द्या, असे म्हणत समाजाच्या ठेकेदारांनीही वाहत्या गंगेत हात गावपुढारी यांनी चांगलेच धुवून घेतले. या व समाजाच्या ठेकेदारांनी एकापेक्षा जास्त उमेदवारांकडून लाभ पदरात पाडून घेतल्याची उदाहरणे आहेत. मात्र त्याचा सकारात्मक परिणाम मतपेटीतून दिसून न आल्याने आता पराभूत उमेदवारांकडून त्याचा जाब विचारायला सुरुवात झाली आहे. काहींनी प्रचाराच्या काळात पुढाकार घेणाऱ्या गाव पुढाऱ्यांची भेट घेत किंवा त्याला बोलावून याचे कारणही विचारल्या जात असल्याचे दिसून येत आहे.

अनेक गाव पुढाऱ्यांनी प्रचाराच्या काळात खुप हूशारक्या मारून स्वतःचा फायदा करून घेतला आता मतमोजणीनंतर त्या गावातील मतदान केंद्रावरील मतदानाची आकडेवारी पुढे आल्याने ज्यांनी मतांचे कंत्राट घेतले होते, अशा अनेक पुढाऱ्यांचे पितळ उघडे पडले आहे. त्यामुळे आता काहींनी आपले मोबाइल फोन बंद ठेवले तर काही उमेदवारांपासून आपले तोंड लपून फिरत असल्याचे चित्र आहे.

# स्वच्छ सर्वेक्षणासाठी मनपा सज्ज

## झोननिहाय तयारीचा अतिरिक्त आयुक्तांनी घेतला आढावा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ साठी नागपूर महानगरपालिका सज्ज झालेली आहे. यासंदर्भात बुधवारी (ता.४) अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल गोयल यांनी दहाही झोनच्या तयारीचा आढावा घेतला.

मनपा मुख्यालयातील अतिरिक्त आयुक्तांच्या सभाकक्षात आयोजित आढावा बैठकीमध्ये उपायुक्त सर्वश्री. विजय देशमुख, मिलींद मेश्राम, प्रकाश वराडे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, सर्वश्री. सहा. आयुक्त हरीश राऊत, गणेश राठोड, अशोक गराटे, नरेंद्र बावनकर, प्रमोद वानखेडे, विजय थुल, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, शिक्षणाधिकारी साधना सयाम, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, उपअभियंता राजेश दुफारे, कार्यकारी अभियंता सर्वश्री रवींद्र बुंधाडे, सुनील उईके, राजेंद्र राठोड, शिंगनजुडे, श्रीकांत वाईकर, अजय पाझारे, कमलेश चव्हाण, अजय गेडाम, मनोज




सिंग, उपद्रव शोध पथक प्रमुख श्री. वीरसेन तांबे, सर्व झोनल अधिकारी, केपीएमजी, ह्युमन मॅट्रिक्स या एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी केपीएमजी एजन्सीद्वारे सादरीकरणातून स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणासाठी आवश्यक बाबींची सादरीकरणाद्वारे माहिती दिली. शहरातील दहाही झोनमध्ये ह्युमन मॅट्रिक्स या एजन्सीच्या प्रतिनिधींद्वारे कचरा संकलन आणि स्वच्छतेबाबत नियमित जनजागृती करण्यात येत आहे.

या जनजागृतीद्वारे झोनमध्ये आवश्यक कार्यांची देखील माहिती यावेळी सादर करण्यात आली. येत्या जानेवारी महिन्यामध्ये नागपूर शहरामध्ये स्वच्छ सर्वेक्षणची चमूद्वारे पाहणी केली जाणार आहे. त्यादृष्टीने दहाही झोनमध्ये सुरू असलेले स्वच्छतेचे कार्य आणि आवश्यक कार्य याचा यावेळी अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी आढावा घेतला.

स्वच्छ सर्वेक्षणसाठी आवश्यक बाबींच्या पूर्ततेबाबत मनपाद्वारे ह्यचेकलिस्टह्ण तयार करण्यात आलेली आहे. सर्व झोनमध्ये आवश्यक बाबींच्या पूर्ततेकरिता एका कर्मचाऱ्याची जबाबदारी निश्चित करून त्याला चेकलिस्ट सोपविण्यात यावी. सदर चेक लिस्टनुसार नियमित काम होत असल्याची नियमित खात्री करून वेळोवेळी त्याचा आढावा घेण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी यावेळी दिले.

प्रत्येक झोनमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या आयईसी चमूची पुरेपूर मदत घेऊन शहरात स्वच्छतेप्रति जनजागृती अभियान राबविणे, नागरिकांना ओला-सुका विलगीकृत कचरा देण्यासाठी जागरूक करणे, अस्वच्छता असलेल्या ठिकाणचे सौंदर्यीकरण करणे, रेड स्पॉट, ब्लॅक स्पॉट शोधून ते बंद करणे यादृष्टीने कार्य करून जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेण्याबाबत देखील त्यांनी निर्देशित केले. त्यांनी झोनस्तरावर स्वच्छतेच्या संदभार्तील आवश्यक कामे देखील तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश झोन सहायक आयुक्तांना दिले. स्वच्छ सर्वेक्षणमध्ये शहराचे विविध मानक तपासून त्यानुसार गुणांकन केले जाणार आहे. त्याकरीता सर्व विभाग प्रमुख व सहा. आयुक्त यांनी तातडीने कार्य पुर्ण करण्याचे निर्देश अति. आयुक्त (शहर) यांनी दिले.

# फडणवीसांच्या नागपुरातील निवासस्थानापुढे जल्लोष



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

भाजप गटनेते पदाची घोषणा होताच देवेंद्र फडणवीसांच्या नागपुरातील घरासमोर भाजप कार्यकर्त्यांकडून मोठा उत्सव साजरा केला. देवाभाऊ आगेबढो च्या घोषणा देण्यात आल्या देवेंद्र फडणवीस यांचा नाव भाजपचे कोर कमिटीमध्ये मुख्यमंत्री पदासाठी निश्चित होताच नागपुरात त्यांच्या घरासमोर भाजपच्या युवा कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केलाय. ढोल ताशाच्या निनादात कार्यकर्ते आपला आनंद व्यक्त करत आहेत. मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच येतील असा आम्हाला विश्वास होता आणि आता हळूहळू एक एक टप्पा पार करून ती प्रक्रिया पार पडत असल्याचा आनंद असल्याचे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.

मुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेता आणि उपमुख्यमंत्री असे सर्व महत्वाचे पद भूषवलेले देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले आहेत. नागपूर महापालिकेतील नगरसेवक, महापौर ते राज्याचे मुख्यमंत्री अशी त्यांची जाज्वल राजकीय कारकीर्द आहे. फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या दरम्यान पूर्ण पाच वर्षांसाठी मुख्यमंत्रीपद भोगल्यानंतर २०१९मध्ये औटघटकेचे मुख्यमंत्रीपद वगळता ते पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. नगरसेवक, महापौर, विरोधीपक्षनेते, उपमुख्यमंत्री आणि आता पुन्हा मुख्यमंत्री अशी त्यांची राजकीय कारकीर्द आहे. विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षात त्यांनी मुख्यमंत्री, विरोधीपनेते, उपमुख्यमंत्री अशी तिन्ही महत्वाची पदे भूषविली होती.

फडणवीस यांच्या राजकीय कारकीदीर्ची सुरुवात भाजपशी संलग्न असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून झाली. ते या संघटनेचे सक्रिय सदस्य होते. त्यांनी पहिल्यांदा नागपूर महापालिका निवडणूक राम नगर प्रभागातून जिंकली. १९९७ मध्ये फडणवीस नागपूर महापालिकेचे सर्वात तरुण महापौर बनले आणि ते भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे तरुण महापौर होते.

त्यानंतर पहिल्यांदा १९९९ मध्ये ते पश्चिम नागपूर विधानसभेमधून निवडून आले. या मतदारसंघातून सलग दोनदा आमदार झाले. ते दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून चारदा विजयी झाले. १९९९ पासून ते महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत नागपूरचे प्रतिनिधित्व करत आहे.

# हिवाळ्यातही उसाच्या रसाला मोठी मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हाळ्यातील तप्त वातावरणात थंड उसाचा रस म्हणजे त्यावर उताराच असतो. थंडगार उसाच्या रसाची जी मजा उन्हाळ्यात येत असते तीच मजा आता कोरोना काळापासून बहरलेल्या बारमाही उसाच्या विक्रीमुळे हिवाळ्यात देखील येत असून ग्राहक मोठ्या चवीने आणि हौशीने उसाच्या रसाचा आस्वाद घेत आहेत.

हनुमान नगर ते मेडिकल चौक या रस्त्याने आपल्याला बाराही महिने ऊसविक्रेते हिरवेगार व काळे ऊस घेऊन त्याचा रस विकताना दिसतात. येथील ऊस विक्रेता अतुल वडस्कर सांगतात की कोरोना काळात बेरोजगारी वाढल्याने कित्येकांनी या काळात बाराही महिने उसाची विक्री सुरू केली.

ऊस हा बाराही महिने पिकवल्या जातो. पण कोरोनापूर्वी ग्राहकांची संख्या ऑफ सीझनमध्ये मंदावत असल्याने ऊस विक्री पावसाळ्यात व हिवाळ्यात होत नसे. हिवाळ्यातील ऊस हा उन्हाळ्याच्या उसापेक्षा अधिक स्वादिष्ट असतो व पावसाळ्यात ऊस वाळत नसल्याने त्याचा रस पानक्यान लागतो.

त्यामुळे पावसाळ्यात काळ्या उसाच्या रसाची विक्री केली जाते. काळा ऊस अमरावती जिल्ह्यातील




अंजनगाव सुरजी तर हिरवा ऊस मराठवाड्यातील संभाजीनगर मधून आयात केल्या जातो.

एका वेळेस अतुल वडस्कर एक टन ऊस मागवून घेतात व घरात त्याची साठवणूक केली जाते.काळ्या उसाचा रस 25 रुपये ग्लास तर हिरव्या उसाचा रस वीस रुपये ग्लास याप्रमाणे विकल्या जातो. ऑफ सीझनमध्ये काळ्या उसाचा रस वीस रुपये ग्लास प्रमाणे मिळतो. अतुल वडस्कर सांगतात की रोजचे दीडशे ग्लास विकल्या जातात.

# कापड दुकानाला आग

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

ताजबाग परिसरातील एका कापड दुकानाला आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी दुकानातील सामान जळून राख झाले होते. छोटा ताजबाग परिसरात द गॉडफॉदर नावाने एक कापडाचे दुकान आहे. मंगळवारी सायंकाळी 7.15 वाजताच्या सुमारास या दुकानात अचानक आग लागली. परिसरात धूर पसरल्याने आसपासच्या लोकांना आगीची माहिती मिळाली. दुकानासमोर बघ्यांची गर्दी जमली. अग्निशमन विभागाला घटनेची माहिती देण्यात आली. तत्काळ सक्करदरा अग्निशमन केंद्रातून एक बंब घटनास्थळी पोहोचला. तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते.

# जोती-सावित्री विचार साहित्य संमेलन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

१८ व्या शतकातील दलितांचे उध्दारक, क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले व त्यांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री शिक्षणाचे दार खुले करुन देणा-या क्रांतीज्योती सावित्रीआई फुले या फुले दाम्पत्यांचे विचार आणि कार्य समाजात सर्वदूर प्रसारित करण्यासाठी व समाजाच्या प्रगतीसाठी आणि उत्थानासाठी महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशिमबाग नागपूर सतत कार्यरत असते.

त्यासाठी संस्थेमार्फत निरनिराळे उपक्रम संस्थेमार्फत राबविल्या जातात. ८ डिसेंबर २०२४ रोजी संस्थेमार्फत जोती सावित्री विचार साहित्य संमेलन, संमेलनाध्यक्ष मा. उत्तमजी कांबळे, नाशिक, सुप्रसिध्द साहित्यिक व माजी अ.भा.म. साहित्य संमेलनाध्यक्ष, उद्घाटक रजिया सुलताना, पुणे साहित्यिक व वक्ता, स्वागताध्यक्ष प्रा. अरुण पवार, अध्यक्ष, महात्मा फुले शिक्षण संस्था, नागपूर, प्रमुख अतिथी - अशोकराव मानकर, माजी आमदार, नागपूर यांचे प्रमुख उपस्थित आयोजित केले आहे.

त्यात आपण सर्वांची उपस्थिती प्रार्थनिय आहे. संमेलनाच्या माध्यमाने फुले दाम्पत्याच्या साहित्यिक व समाज प्रबोधनात्मक कार्यावर विशेषत्वाने प्रकाश पडेल व ते विचार आपल्या सारख्या समाजहितदक्ष रसिकांमार्फत समाजात नक्कीच क्रांतीची बीजे पेरण्यास उपयुक्त ठरतील.

या संमेलनात सर्व धर्मीय/सर्वपंथीय समाज बांधवांनी उपस्थित राहण्याची विनंती संस्थेचे अध्यक्ष प्रा.अरुण पवार, संमेलन मुख्य संयोजिका डॉ.अलका झाडे, सहसंयोजक राजेंद्र पाटील व प्रा.पंकज कुरळकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी केले आहे.

# भाजपा कार्यकर्त्यांचा मिठाई वाटुन जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

देवेंद्र फडणवीस यांची गटनेतेपदी घोषणा होताच भाजप महानगरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले, शहराध्यक्ष जितेंद्र उर्फ बंटी कुकडे यांच्या नेतृत्वाखाली विभागीय कार्यालय धंतोली येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी त्यांनी प्रत्येकाला गोंड तोड करून शुभेच्छा दिल्या. ढोल ताशांच्या गजरात मिठाई वाटून संपूर्ण परिसर दणाणून गेला.

# बोखारातील जुगार अड्डयावर धाड

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने कोराडी ठाण्यांतर्गत गस्ती दरम्यान मिळालेल्या माहितीवरून बोखारा परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड टाकली. यात 3 जुगारी पोलिसांच्या हाती लागले तर 5 आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. तुषार गणेश शंभरकर (23) रा. महादुला, महेश संजय चौधरी (24) रा. ढेंगरे लेआऊट, कोराडी आणि देवेंद्र योगराज नवधिंगे (36) रा. सुरादेवी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फरार आरोपी गौरव झेले (26), करण देवकर (28) दोन्ही रा. महादुला व इतर तिघांचा शोध सुरू रविवारी सायंकाळी गुन्हे शाखा युनिट 5 चे पथक कोराडी ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान बोखाराच्या घोंगे लेआऊट परिसरात काही लोक झाडाखाली बसून जुगार खेळत असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांना पाहताच जुगाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आणि त्यांनी तेथून पळ काढला.

# प्रति थेंब पीक योजनेच्या अनुदानासाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी ठिंबक व तुषार संच खरेदीसाठी अनुदान दिले जाते. यासाठी अनुसूचित जाती, जमातीतील पात्र इच्छुक शेतकऱ्यांनी अर्ज करावेत. या योजनेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवगार्तील लाभार्थ्यांना 90 टक्के अनुदान देय आहे. सदर अनुदान हे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन मिशन योजना, बिरसा मुंडा योजना या योजनांमधून दिले जाणार आहे. या योजनेंतर्गत ठिंबक व तुषार सिंचन संचाचा लाभ घेण्यास इच्छुक शेतकऱ्याकडे मालकी हक्काचा सातबारा व आठ अ आवश्यक आहे. तसेच ओलीताची सोय असणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांने महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेचा अनूसूचित जाती, जमातीच्या लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा.

# ग्लोबल नागपूर अवॉर्डचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

नागपूर फर्स्ट आणि नागपूरकर चमकण्यासाठी सज्ज झाले आहेत कारण ते 8 डिसेंबर रोजी, किंग्सवे नागपूर येथे परवाना ऑडिटोरियम, 6.30 वा. आपल्या शहराला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणाऱ्या उत्कृष्ट व्यक्ती/संस्थांच्या कामगिरीचा गौरव करण्यात नागपूर फर्स्टला खूप अभिमान वाटतो. ग्लोबल नागपूर अवॉर्ड्स, 2 दिवसांच्या ग्लोबल नागपूर समिटचा अविभाज्य भाग, कृषी, महिला उद्योजिका, चाइल्ड प्रॉडिजी, इनोव्हेशन, विविध क्षेत्रात नागपूरकर आणि विदर्भियांच्या असामान्य जागतिक कामगिरीचे प्रदर्शन करण्यासाठी एक व्यासपीठ आहे. उद्योजक, लॉजिस्टिक, सामाजिक, क्रीडा, आरोग्यसेवा, शिक्षण, फॅशन आणि गारमेंट, मीडिया आणि चित्रपट, ग्लोबल नागपूरी जीवनगौरव पुरस्कार आणि इतर.

हा प्रतिष्ठित कार्यक्रम 20 श्रेणींमधील अपवादात्मक कामगिरीचा सन्मान करण्यासाठी जगभरातील नेते, नवोदित आणि ट्रेलब्लेझर्सना एकत्र आणेल. ग्लोबल नागपूर अवॉर्डने विविध प्रेक्षकांना आकर्षित करणे अपेक्षित आहे, ज्यामुळे संस्कृती, नाविन्य, शिक्षण, इन्फ्रा, आयटी, हेल्थकेअर आणि इतर हब म्हणून या प्रदेशाचे वाढते महत्त्व अधोरेखित होईल. नागपुरी आणि विदर्भवासियांनी निर्माण केलेल्या ग्राउंडब्रेकिंग जागतिक प्रभावाची ओळख करून पुढील पिढीतील व्यावसायिक, कलाकार, नवोन्मेषक, खेळाडू आणि इतरांना प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट आहे. उपस्थित लोक तारांकित संध्याकाळची वाट पाहू शकतात, ज्यामध्ये उल्लेखनीय प्रभावशाली व्यक्ती, सेलिब्रिटी, प्रतिष्ठित व्यक्ती किंवा उद्योगातील नेते उपस्थित असतील. भारताचे अध्यक्ष नागपूर प्रथम तनवीर मिर्झा यांनी माहिती दिली की या कार्यक्रमात क्र. आश्चर्य, नेटवर्किंग संधी, नकुल अग्रवाल पुरस्कार सोहळ्याचे नेतृत्व करत आहेत. ओरिएंट ग्रुप ऑफ हॉटेल्स, नूतनीकरण, इन्फिव्हेंट, फ्रेमएक्स, क्रिएटिफॉक्स. अधिक माहिती 9766633423 या क्रमांकावर उपलब्ध आहे.

# प्रवीण बागडे यांना माफसूचा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार प्रदान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग 1 व 2 अधिकाऱ्यांमधुन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या संचालक, विस्तार व शिक्षण विभागातील कार्यरत वरिष्ठश्रेणी लघुलेखक/स्विय सहायक प्रविण मोरेश्वर बागडे यांना 2023-24 या वर्षाकरीता उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार रजत जयंती सभागृह, पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे विद्यापीठ वर्धापन दिन निमीत्त आयोजित सोहळयात प्रदान करण्यात आला. तसेच यावेळी त्यांना पुरस्कारसह प्रमाणपत्र, शाल-श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार विद्यापीठ मुख्यालय अधिनस्त घटक महाविद्यालये/प्रक्षेत्रे/संस्थेमधील 2023-24 या वर्षाकरीता वर्ग 1 व 2 संवगार्तून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एक शिक्षकेत्तर अधिकारी, तसेच वर्ग 4 संवगार्तील कर्मचाऱ्यास पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात आले. सदर पुरस्काराचे उद्दिष्ट म्हणजे विद्यापीठ तसेच विद्यापीठ अधिनस्त घटक महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याची नोंद घेणे, कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सेवा तत्परता व विद्यापीठाप्रती आत्मीयता वाढविणे, कर्मचाऱ्यांमध्ये उत्कृष्ट आणि असाधारण योगदान देण्याची भावना जोपासने व त्यांची कार्यक्षमता




वाढविणे असे आहे.

प्रवीण बागडे यांनी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील दूधबर्डी येथे 20 हेक्टर शासकिय जमीन संपादित करून विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रासाठी शासन निर्णय काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. यापूर्वी त्यांना 2017-18 करिता उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार आणि 2023 मध्ये लम्पी योध्दा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली आहे. तसेच त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर 250 वर लेख तसेच 100 वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जैवतंत्रज्ञान विद्यापीठ, हैद्राबादचे डॉ. नियाज अहमद, मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुरचे डॉ. जितेंद्र रामगांवकर, पशुविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक (संशोधन) डॉ. नितिन कुरकुरे, संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. अनिल भिकाने, अधिष्ठाता (निम्न शिक्षण) डॉ. सचिन बोंडे, डॉ. कुलसचिव मोना ठाकुर, नियंत्रक (वित्त व लेखा) मनीषा शेंडे, विद्यापीठ ग्रंथपाल सुनील गावंडे, विद्यापीठ अभियंता आरिफ शेख, परीक्षा नियंत्रक डॉ. भूषण रामटेके, नागपुर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ आरजु सोमकुवर, मत्स्य महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. मुकुंद आमले आदींच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे संचालन डॉ. महेश जावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपकुलसचिव (आस्थापना) डॉ. अजय गावंडे यांनी मानले.

# मध्य रेल्वे नागपूर विभागातर्फे जखमी कर्मचाऱ्यांसाठी प्रथमोपचार व सीपीआर प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

मध्य रेल्वे नागपूर विभागाने प्रख्यात SPARME (रेल्वे वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी अधीनस्थ कर्मचारी संघटना) आणि ART (अँटी-रेट्रोव्हायरल थेरपी) कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक प्रथमोपचार आणि CPR प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा उद्देश रेल्वे कर्मचाऱ्यांना जीवन वाचवण्याची महत्त्वपूर्ण कौशल्ये शिकवणे हा होता जेणेकरून ते वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीला प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने सामोरे जाऊ शकतील.

ही प्रशिक्षण सत्रे वैद्यकीय तज्ञांच्या टीमने आयोजित केली



होती, ज्यात डॉ. सबा अख्तर, राहुल तायडे, मुख्य फार्मासिस्ट, पूजा थोल आणि जोगिंदर राजक यांचा समावेश होता.

तज्ज्ञांनी कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशनचे महत्त्वाचे टप्पे समजावून सांगितले आणि प्रत्यक्ष अनुभवातून त्याचे सखोल ज्ञान दिले.

सीपीआर तंत्राव्यतिरिक्त, सत्रात प्रथमोपचाराच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली, जसे की विविध जखमांसाठी योग्य ड्रेसिंग पद्धती आणि त्रिकोणी पट्टीचा योग्य वापर. प्रशिक्षकांनी फ्रॅक्चर आणि इतर दुखापतींसाठी स्प्लिंटचा वापर आणि महत्त्व स्पष्ट केले, ज्यामुळे सहभागींना वास्तविक जीवनातील परिस्थितीचे व्यावहारिक ज्ञान मिळाले.

एकूण 42 कामगारांनी या सत्रात भाग घेतला आणि कौशल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्याची क्षमता वाढली. हा प्रशिक्षण कार्यक्रम मध्य रेल्वेच्या सर्वोत्तम पद्धतींबद्दलच्या वचन बद्धतेचा पुरावा आहे, जे एक सुसज्ज कर्मचारी तयार करते, सुरक्षिततेला प्राधान्य देते आणि संपूर्ण नेटवर्कमध्ये कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न करते.

# दीडशे लीटर दारूची वाहतूक करताना पकडले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

वाडी पोलिसांनी एका व्यक्तीला दुचाकी वाहनावर 150 लीटर मोहाची दारू घेऊन जाताना अटक केली. गोकुळ चंद्रशेखर वानखडे (25) रा. चिंतामणीनगरी, भिवसनखोली असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

बोंडाळा-लाव्हा मार्गावर टायर गोदामाजवळ पोलिसांना गोकुळ संशयास्पदरित्या दुचाकीवर पोते घेऊन जाताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून पोते तपासले असता प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये एकूण 150 लीटर दारू मिळाली. चौकशीत गोकुळने साथीदार बिस्वा (रा. गोंडखैरी) याच्यासोबत मिळून मोहाची दारू बनवून विकत असल्याची माहिती दिली. पोलिसांनी दोघांविरूद्धही गुन्हा नोंदविला.